CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १० फेब्रुवारी २०२५ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ९४ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आज श्री विश्वकर्मा जयंती**



# छत्तीसगडमध्ये ३१ नक्षल्यांचा खातमा

### सुरक्षा दलांची इंद्रावती राष्ट्रीय अभयारण्यात मोठी कारवाई

### दोन जवान हुतात्मा

### यंदाच्या वर्षात ठार झालेल्या माओवाद्यांची संख्या ८१



**बिजापूर, ९ फेब्रुवारी**

नक्षलवाद्यांच्या विरोधात रविवारी मोठी कारवाई करण्यात आली. छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात झालेल्या भीषण चकमकीत सुरक्षा दलाने ३१ नक्षलवाद्यांचा खात्मा केला. चकमकीत दोन जवान हुतात्मा झाले असून, काही जण जखमी झाले.

सुरक्षा दलाच्या ६५० पेक्षा जास्त जवानांनी इंद्रावती राष्ट्रीय अभयारण्यात वेगवेगळ्या बाजूंनी प्रवेश करीत नक्षलवाद्यांच्या अड्ड्याला वेढा घातला. यावेळी भीषण चकमक झडली. त्यात ३१ नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले, अशी माहिती छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी दिली. देशात आणि राज्यात नक्षलवादाचा अंत निश्चित आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली मार्च २०२६ पर्यंत राज्य नक्षलवादापासून मुक्त होईल, असे मुख्यमंत्री विष्णुदेव साय यांनी सांगितले.


यंदाच्या वर्षात चकमकींत ठार झालेल्या नक्षलवाद्यांची संख्या ८१ झाली आहे. इंद्रावती राष्ट्रीय उद्यान परिसरातील जंगलात सकाळी वेगवेगळ्या सुरक्षा दलांच्या जवानांचे संयुक्त पथक नक्षलवाद्यांविरुद्ध कारवाई करीत असताना ही चकमक झडली. या कारवाईत जिल्हा राखीव रक्षक (डीआरजी), विशेष कृती दल (एसटीएफ), बस्तर फायटर्सचे जवान सहभागी होते, असे बस्तर रेंजचे पोलिस महानिरीक्षक पी. सुंदरराज यांनी सांगितले.

या चकमकीत जिल्हा राखीव रक्षक आणि विशेष कृती दल असे दोन जवान हुतात्मा झाले. इतर दोन जवान जखमी असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

**'ही' शस्त्रे जप्त**

आतापर्यंत नक्षलवाद्यांचे गणवेशातील ३१ मृतदेह घटनास्थळावरून ताब्यात घेण्यात आले. या व्यतिरिक्त एके-४७ रायफल, इन्सास, एसएलआर, .३०३ रायफल आणि बॅरेल ग्रेनेड लाँचर्स, स्फोटके जप्त करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

> मार्च २०२६ पर्यंत नक्षलवाद्यांचा खात्मा केला जाईल आणि त्यामुळे देशातील कोणत्याही नागरिकाला आपला जीव गमवावा लागणार नाही. आपण देशातून नक्षलवाद पूर्णपणे संपवू, या माझ्या संकल्पाचा मी पुनरुच्चार करतो. या लढ्यात सुरक्षा दलांनी त्यांचे दोन शूर जवान गमावले. देश नेहमीच या वीरांचा ऋणी राहील. हुतात्मा झालेल्या सैनिकांच्या कुटुंबीयांबद्दल मी मनापासून संवेदना व्यक्त करतो.
>
> **अमित शाह,** केंद्रीय गृहमंत्री



## महाकुंभात लाखो लोक १०-१२ तास अडकले

**प्रयागराज, ९ फेब्रुवारी**

रविवारची सुटी असल्याने महाकुंभात भाविकांची मोठी गर्दी होती. संगमला जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर १० ते १५ किमी लांबीचा जाम आहे. वाराणसी, कानपूर आणि रेवा ते प्रयागराज या मार्गांवर वाहने २५ किमीपर्यंत थांबली आहेत. संगमात स्नान करण्यासाठी जाणारे आणि तिथून परतणारे भाविक भुकेल्या आणि तहानलेल्या अवस्थेत वाहतूक कोंडी सुटण्याची वाट पाहत आहेत.

प्रयागराज जंक्शनवरील गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आपत्कालीन गर्दी व्यवस्थापन योजना लागू करण्यात आली. प्रचंड गर्दीमुळे प्रयागराज संगम स्टेशन बंद करावे लागले. परतणाऱ्या एका भाविक आकाश द्विवेदीने सांगितले की, त्यांची गाडी मलाका गावात गेल्या तीन तासांपासून वाहतूक कोंडीत अडकली आहे. (वृत्तसंस्था)

### महत्त्वाचे

## तिमाहीत एलआयसीला ११ हजार कोटींचा नफा

**मुंबई :** विमा क्षेत्रात देशातील सर्वात मोठी कंपनी असलेल्या भारतीय आयुर्विमा महामंडळ अर्थात एलआयसीने डिसेंबरअखेर सरलेल्या तिसऱ्या तिमाहित ११,०५६ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत नफ्यातील वाढ १७ टक्क्यांनी असल्याचे जारी केलेल्या निवेदनात एलआयसीने म्हटले आहे. गतवर्षी याच तिमाहित एलआयसीने ९,४४४ कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला होता. प्रीमियम उत्पन्न चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत १.०६ कोटी रुपयांवर पोहोचले, जे गेल्या वर्षीच्या याच कालावधीत १.१७ कोटी रुपये होते. डिसेंबरच्या तिमाहित एकूण उत्पन्नात घट झाली आहे, ते गेल्या वर्षीच्या २.१२ लाख कोटी रुपयांवरून २.०१ कोटी रुपयांपर्यंत खाली आले. शेअर बाजारात शुक्रवारच्या सत्रात एलआयसीचा समभाग १.५३ टक्क्यांनी घसरून ८१६.१० रुपयांवर बंद झाला. सध्याच्या बाजार मूल्यानुसार कंपनीचे ५.१६ लाख कोटींचे बाजार भांडवल आहे.

## राष्ट्रपती मुर्मू आज महाकुंभमेळ्यात

नवी दिल्ली : उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथे आयोजित करण्यात आलेल्या महाकुंभमेळ्याला आतापर्यंत कोट्यवधी भाविकांनी भेट दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही त्रिवेणी संगमावर जाऊन अमृतस्नान केले. आता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सोमवारी महाकुंभमेळ्याला जाणार आहेत. राष्ट्रपती भवन कार्यालयातून ही माहिती मिळाली आहे. प्रयागराज येथील त्यांच्या एक दिवसीय दौऱ्यात राष्ट्रपती मुर्मू संगम येथे पूजा करून पवित्र स्नान करतील. अक्षयवट आणि हनुान मंदिरात पूजा आणि दर्शन घेतील तसेच डिजिटल कुंभ अनुभव केंद्राला देखील भेट देतील.

## एअरटेलचे रिचार्ज महागण्याचे संकेत

**मुंबई :** काही महिन्यांपूर्वी एअरटेलने आपले रिचार्ज वाढवले होते. त्यानंतर कंपनीला विक्रमी नफा झाला. अशा परिस्थितीत भारती एअरटेलने पुन्हा एकदा दर वाढविण्याचे संकेत दिले आहेत. दूरसंचार क्षेत्राची आर्थिक स्थिरता राखण्यासाठी दरात आणखी वाढ करणे आवश्यक असल्याचे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक गोपाल विठ्ठल यांनी म्हटले आहे. कंपनीने त्यांच्या जागतिक व्यवसाय पोर्टफोलिओ धून होलसेल व्हॉईस आणि मॅसेजिंग व्यवसायातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. या व्यवसायातून खूपच कमी नफा मिळत असल्याने हा निर्णय घेण्यात आला.

# गडचिरोलीतून घेरले माओवाद्यांना!

**अभिजित लिखिते**

**नागपूर, ९ फेब्रुवारी**

छत्तीसगडमधील इंद्रावती राष्ट्रीय अभयारण्यात माओवाद्यांना कंठस्नान घालण्यासाठी जवळपास ५०० जवानांचा समावेश असलेल्या सुरक्षा दलांनी गडचिरोलीतून इंद्रावती नदी ओलांडत छत्तीसगडमध्ये प्रवेश केला आणि माओवाद्यांना घेरल्याची माहिती सूत्रांनी दिली.

इंद्रावती राष्ट्रीय अभयारण्यात माओवाद्यांची मोठी हालचाल काही दिवसांपूर्वी टिपण्यात आली होती. माओवाद्यांचे ठिकाण महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागात असल्याची माहिती सुरक्षा दलांना मिळाली. त्यांच्याविरोधात कारवाई करायची असल्यास छत्तीसगडमधील काही ठिकाणांवरून संयुक्त पथके एकवटून माओवाद्यांपर्यंत घेऊन जाण्यात मोठ्या प्रमाणात धोका होता. त्यामुळे इंद्रावती राष्ट्रीय अभयारण्यात जाण्यासाठी सुरक्षा दलांनी महाराष्ट्र आणि छत्तीसगड सीमेवरील इंद्रावती नदी ओलांडून छत्तीसगडमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

### मोहीम फत्ते करण्यासाठी व्यूहरचना



सुरक्षा दल गडचिरोलीतून येईल याचा मागमूसही माओवाद्यांना नव्हता. नारायणपूर किंवा बिजापूरमधून सुरक्षा दल धडक देऊ शकते. पण, तशा हालचाली झाल्यास त्याचा सुगावा निश्चितपणे लागेल, असा विश्वास असल्याने माओवादी गाफील राहिले आणि सुरक्षा दलाच्या अलगद जाळ्यात अडकले. त्यांना सगळ्याच बाजूंनी घेरण्यात आले. सुरक्षा दलांची ही व्यूहरचना माओवाद्यांना मोठा धक्का देणारी ठरली.

**बंडी प्रकाशचा खात्मा**

इंद्रावती राष्ट्रीय अभयारण्यात झालेल्या चकमकीत प्रतिबंधित सीपीआय (माओवादी) संघटनेच्या तेलंगणा राज्य समितीचा सदस्य बंडी प्रकाशचा खात्मा करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्याच्या शिरावर २५ लाख रुपयांचे बक्षीस होते. बंडी प्रकाश हा विविध नावांनी ओळखला जायचा. बंडीदादा, क्रांती, प्रभात अशी नावे त्याने धारण केली होती. तो मूळचा तेलंगणातील मंदामारी जिल्ह्यातील मंचेरियल गावचा रहिवासी होता. तेलंगणा पोलिस दल त्याच्या मागावर होते. मात्र, मागील काही वर्षांपासून बंडी प्रकाश त्यांना हुलकावणी देत होता.


## महाकुंभातील 'कल्पवासी' तंबूला आग

**महाकुंभ नगर, ९ फेब्रुवारी**

गॅस सिलेंडरमध्ये गळती झाल्याने महाकुंभातील सेक्टर १९ मधील कल्पवासी तंबूला रविवारी आग लागली. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी दहा मिनिटांत आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही.

कुंभाचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रमोद शर्मा यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, ओम प्रकाश पांडे सेवा संस्थेने उभारलेल्या तंबूत आग लागल्याची नोंद झाली होती. हा तंबू प्रयागराजमधील कर्मा येथील रहिवासी राजेंद्र जयस्वाल यांचा होता. आगीची सूचना मिळताच अग्निशमन दलाच्या तीन गाड्या तातडीने घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. दहा मिनिटांत आग विझवली असली, तरी तंबू मात्र भस्मसात झाला. (वृत्तसंस्था)



राजधानी दिल्लीतील चाणक्यपुरीच्या शांती पथ परिसरात 'दिल्ली ट्युलिप' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी या उद्यानाला अनेक नागरिकांनी भेट दिली

# मुख्यमंत्री एन. बिरेनसिंह यांचा राजीनामा

### सुरक्षा यंत्रणांना अतिसतर्कतेचा इशारा

**नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची नवी दिल्लीत भेट घेतल्यानंतर मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेनसिंह यांनी रविवारी दुपारी पदाचा राजीनामा दिला. भाजपाचे खासदार संबित पात्रा, मणिपूर सरकारमधील मंत्री आणि आमदारांसोबत त्यांनी राजभवन येथे राज्यपाल अजयकुमार भल्ला यांच्याकडे राजीनामा सादर केला.

गृह मंत्रालयाने सुरक्षा यंत्रणांना सतर्कतेचा इशारा दिला असल्याची माहिती सूत्रांनी दिली. बिरेनसिंह यांच्याविरोधात विधानसभेत सोमवारी अविश्वास प्रस्ताव सादर केला जाणार होता. मात्र, त्यापूर्वीच त्यांनी राजीनामा दिला. भाजपाचे आमदार दीर्घकाळापासून बिरेनसिंह यांच्यावर नाराज होते. त्यांना मुख्यमंत्रिपदावरून हटवण्यात यावे, अशी मागणी करीत मणिपुरातील भाजपाच्या १९ आमदारांनी मागील वर्षी ऑक्टोबरमध्ये पंतप्रधान नरेंद्र



मोदी यांना पत्र पाठवले होते. या पत्रावर विधानसभा अध्यक्ष थोकचोम सत्यव्रत सिंह, मंत्री विश्वजित सिंह आणि युमनाम खेमचंद सिंह यांनी स्वाक्षरी केली होती. राज्यात अद्याप शांतता का प्रस्तापित झाली नाही, असा प्रश्न मणिपुरातील नागरिक भाजपा सरकारकडे करीत आहेत.

**विरोधकांच्या लक्ष्यावर होते बिरेनसिंह**

राज्यात उसळलेल्या जातीय हिंसाचारामुळे बिरेनसिंह यांच्या विरोधात मोठा रोष होता. नाराज आमदारांनी पाठवलेल्या पत्रापूर्वी बिरेनसिंह यांनी राजीनामा देण्यास नकार दिला होता. मी राजीनामा का द्यावा? मी काय चोरले? माझ्यावर घोटाळ्याचा आरोप आहे का? मी देश किंवा राज्याच्या विरोधात काम केले का? असे प्रश्न त्यावेळी बिरेनसिंह यांनी उपस्थित केले होते. हिंसाचारादरम्यान त्यांनी मैतेई समाजाची पाठराखण केल्याचा आरोप कुकी संघटनांचा होता. या मुद्यावर विरोधकांनी त्यांच्या विरोधात रान पेटवले होते. (वृत्तसंस्था)

## भारतातील पहिली सर्वांत सुपर स्पेशल ट्रेन

**नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

भारतातील पहिली सर्वांत सुपर स्पेशल ट्रेन लाँच होणार आहे. ही ट्रेन वंदे भारत ट्रेनची सुपर मॉडेल असणार आहे. या ट्रेनला १६ किंवा १८ नाही तर तब्बल २४ डबे असणार आहेत. म्हणजेच एक संपूर्ण गाव या ट्रेनमधून प्रवास करू शकेल. या स्लीपर ट्रेनमध्ये प्रवाशांना चांगल्या सोईसुविधा मिळणार आहेत.

सध्या वंदे भारत ही भारतातील सर्वांत जलद आणि आलिशान ट्रेन आहे. भारतीय रेल्वे लवकरच वंदे भारत स्लीपर ट्रेन सुरू करणार आहे. काही दिवसांपूर्वीच मुंबई-अहमदाबाद मार्गाच्या ५४० किमी मार्गावर या ट्रेनची यशस्वी चाचणी घेण्यात आली आहे.

पहिल्या १६ डब्यांच्या वंदे भारत स्लीपर ट्रेनने १५ जानेवारी २०२५ रिसर्च डिझाईन ॲण्ड स्टॅण्डर्ड्स ऑर्गनायझेशनकडून घेण्यात आलेली कठोर चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली. यानंतर आता रेल्वे थेट २४ डब्यांची स्लीपर वंदे भारत ट्रेन सुरू करण्यासाठी जोरदार प्रयत्न करत आहे. २४ डब्यांची स्लीपर वंदे भारत ट्रेन ही भारतातील शाही गाडी असेल. १६ कोचच्या स्लीपर वंदे भारतमध्ये तीन वर्ग आहेत. (वृत्तसंस्था)

## आतिशींनी दिला मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा

### नवीन सरकार स्थापन होईपर्यंत कायम राहणार

**नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

विधानसभा निवडणुकीत आपचा मोठा पराभव झाल्यानंतर मुख्यमंत्री आतिशी यांनी रविवारी दिल्लीचे नायब राज्यपाल विजयकुमार सक्सेना यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा सादर केला.

कालकाजी विधानसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या आतिशी यांनी राजनिवास येथे सक्सेना यांना राजीनामा सोपवला. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत पदावर राहण्याची विनंती सक्सेना यांनी आतिशींना केल्याची माहिती राज्यपाल कार्यालयाने दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी विदेश दौऱ्यावरून परतल्यानंतर पुढील आठवड्यात भाजपा सत्तेचा दावा करेल, अशी अपेक्षा असल्याचे पक्ष नेत्यांनी सांगितले.

नायब राज्यपाल सक्सेना यांना आज मुख्यमंत्री आतिशी यांचा राजीनामा मिळाला. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत त्यांना पदावर कायम राहण्यास सांगितले, असे राजनिवासाने त्यांच्या अधिकृत एक्स हॅण्डलवरून पोस्ट करीत सांगितले. (वृत्तसंस्था)

# शिवसेनेतर्फे मोरे कुटूंबियांना ३२ लाखांची मदत

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**ठाणे दि.९ फेब्रुवारी**

तुकाराम महाराजांचे वंशज, दिवंगत कीर्तनकार शिरीष महाराज मोरे यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. आज आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांनी मोरे कुटूंबियांना ३२ लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे.

देहूमधील कीर्तनकार शिरीष महाराज मोरे यांनी गेल्याच आठवड्यात आर्थिक विवंचनेला कंटाळून आत्महत्या केली मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत आपल्यावर ३२ लाखांचे कर्ज झाले असून ते फेडणे शक्य होत नसल्याने आपण टोकाचे पाऊल उचलत असल्याचे लिहिले होते. दिवंगत मोरे यांच्या जाण्याने त्यांच्या कुटूंबाला बसलेला धक्का पाहून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मोरे कुटूंबाला मदतीचा हात देण्याचा निर्णय घेतला आहे. ही रक्कम त्यांनी आमदार विजय शिवतारे यांच्याकडे देऊन आजच शिरीष महाराज मोरे यांच्या घरी जाऊन ही मदत त्यांच्या कुटूंबियांना सुपूर्द करण्यास सांगितले आहे.

# पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया जास्त का रडतात?


### रडण्यासाठी शरीरातील हार्मोन्स जबाबदार

**लंडन, ९ फेब्रुवारी**

भावना उचंबळून आल्यानंतर आनंद किंवा दुःख अशा दोन्ही स्थितीत अश्रू ओघळणे, ही सर्वसामान्य प्रतिक्रिया असते. अश्रू हे केवळ दुःखाचे नसतात तर आनंदाचेही असतात. मात्र, आनंद किंवा दुःखाच्या या आवेगात अश्रूंनी व्यक्त होण्यात पुरुष कायम मागे पडतात. त्या तुलनेत महिलांच्या डोळ्यात चटकन अश्रू येतात, यांचे नळ केव्हाही सुरू होतात, असे गमतीने म्हटले जाते. मात्र, पुरुष आणि स्त्रियांच्या रडण्यामागेही शास्त्रीय कारण आहे.

### प्रोलेक्टिन हार्मोन्सचा परिणाम

वास्तविक, प्रोलेक्टिन हार्मोन्स मनुष्याला भावुक बनवते आणि त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहित करत असते. पुरुषांच्या शरीरात हे प्रोलेक्टिन हार्मोन्स अत्यंत कमी असते, तर महिलांच्या शरीरात याचे प्रमाण जास्ते असते. हे हार्मोन्स जास्त प्रमाणात असल्याने महिला जास्त भावनिक असतात आणि जास्त रडतातदेखील. पुरुषांमध्ये त्याचे प्रमाण कमी असते. तसेच चारचौघांत रडण्याची लाजही वाटत असल्याने पुरुष अधिक रडत नाहीत.



पुरुष आणि महिलांचे हार्मोन्स तसेच त्यांच्या रडण्यामागच्या कारणांचा छडा लावण्यासाठी २०११ मध्ये एक संशोधन झाले. या संशोधनानुसार एक महिला संपूर्ण वर्षभर ३० ते ६४ यापेक्षा जास्त वेळा रडते. तसेच, महिला या सार्वजनिक स्थळी देखील रडू शकतात, तर पुरुष संपूर्ण वर्षभरात पाच ते सात वेळा रडतात. परंतु, पुरुष हे सर्वसामान्यपणे एकांतात रडतात. असे का घडते, याचा कधी विचार केला आहे का?

रडण्यासाठी शरीरातील हार्मोन्स जबाबदार असतात. संशोधनानुसार पुरुषांमध्ये अशा प्रकारचे हार्मोन्स आहेत, जे त्यांना मजबूत बनवते. या हार्मोनचे नाव 'टेस्टोस्टेरोन' आहे. हेच हार्मोन पुरुषांत कमी किंवा जास्त बनणे हे त्याच्या लैगिंक गतिविधींना संचालित करते. हे हार्मोन्स पुरुषांना रडणे किंवा भावनिक होण्यापासून रोखतात. हे 'इमोशनल इंटेलिजन्स'चे काम करते आणि अश्रूंना वाहण्यापासून रोखते. हॉलंडच्या संशोधकांनी केलेल्या संशोधनानंतर पुरुषांना कमी रडण्यास जबाबदार असलेल्या हार्मोन्सला 'प्रोलेक्टिन हार्मोन्स' असे मानले जात आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### दिल्लीतील विमानतळावरून कोट्यवधींचे कोकेन जप्त

**नवी दिल्ली** : येथील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सुमारे ४० कोटी रुपयांच्या कोकेनची तस्करी केल्याप्रकरणी तीन विदेशी नागरिकांना अटक करण्यात आली, अशी माहिती सुमा शुल्क विभागाने रविवारी दिली. कोकेन भरलेल्या कॅप्सुलचे सेवन करणाऱ्या दोन ब्राझिलियन महिला आणि केनियाच्या एका पुरुषाला वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये अटक करण्यात आली, असे यात म्हटले आहे. पहिल्या प्रकरणात २८ जानेवारी रोजी साओ पावलो येथून पॅरिसमार्गे दाखल झालेल्या ब्राझीलमधून आलेल्या तरुणीला अडवण्यात आले. आपण मादकपदार्थ असलेल्या कॅप्सुल्स गिळल्या असल्याची कबुली तिने चौकशीत दिली. त्यानंतर तिला सफदरगंज रुग्णालयात नेण्यात आले. तिथे ९८ कॅप्सुल्समधून ८६६ ग्रॅम कोकेन जप्त करण्यात आले. याचे मूल्य १२.९९ कोटी रुपये आहे. या तरुणीला अटक करण्यात आली, अशी माहिती सीमाशुल्क विभागाने 'एक्स'वरील पोस्टमध्ये दिली. २४ जानेवारी रोजी सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी ब्राझील येथून आलेल्या आणखी एका महिला प्रवाशाला अटक करण्यात आली. मादकपदार्थ असलेल्या कॅप्सुल घेतल्याची कबुली तिने दिली. तिच्या शरीरातून १०० अंडाकृती आकाराच्या कॅप्सुल्स बाहेर काढण्यात आल्या. त्यात आढळलेली पांढरी पावडर कोकेन असल्याचा संशय असल्याचे सीमाशुल्क विभागाने दुसऱ्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

### पाच एकरवरील अफूचे पीक नष्ट

**इम्फाळ** : मणिपूरच्या चुराचांदपूर जिल्ह्यात सुमारे पाच एकरवरील बेकायदेशीर अफूची लागवड नष्ट करण्यात आली. शनिवारी जिल्ह्यातील जी मंगोलियन गावातील डोंगररांगेत सुरक्षा दलांनी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांसह बेकायदेशीर अफूची लागवड नष्ट केली. या कारवाईत जवळपास पाच एकरवरील बेकायदेशीर अफूचे पीक नष्ट करण्यात आले. यात सुमारे २५ किलो अवैध अफू मिळू शकली असती. पुरावा म्हणून अफूची दहा बोंडे जप्त करण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले.

### हुकूमशहा किमचा अमेरिका-जपानला इशारा

**प्योंगयोंग** : उत्तर कोरियाचे हुकूमशहा किम जोंग उन यांनी पुन्हा एकदा अमेरिका, दक्षिण कोरिया आणि जपानला इशारा दिला आहे. उत्तर कोरियाची राज्य वृत्तसंस्था केसीएनएनुसार, एका कार्यक्रमात बोलताना किम यांनी या तीन देशांच्या सुरक्षा आघाडीला धोकादायक म्हटले. किम यांनी या युतीची तुलना नाटोशी केली. किम यांनी त्यांचे अणुकार्यक्रम आणखी मजबूत करण्याचा इशारा दिला आहे. कोरियन पीपल्स आर्मीच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त दिलेल्या भाषणात किम म्हणाले की, अमेरिका, जपान आणि दक्षिण कोरियाची सुरक्षा युती कोरियन द्वीपकल्पात लष्करी असंतुलन निर्माण करीत आहे. हे आपल्या राज्याच्या सुरक्षेसाठी एक गंभीर आव्हान आहे.

### अलिगड मुस्लिम विद्यापीठात 'बीफ बिर्याणी'वरून वाद

**नवी दिल्ली** : अलिगड मुस्लिम विद्यापीठात नवा वादग्रस्त मुद्दा समोर आला आहे. येथे रविवारच्या दुपारच्या जेवणात चिकन बिर्याणीऐवजी बीफ बिर्याणी दिली जाईल, अशी नोटीस शेअर केल्यानंतर हा वाद निर्माण झाला. विद्यार्थ्यांना ही नोटीस सर शाह सुलेमान हॉलमध्ये आढळून आली होती, त्यानंतर ती सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाली, ज्यावर अनेकांनी प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली. या नोटीसमध्ये म्हटले आहे की, रविवारचा लंच मेन्यू बदलण्यात आला आहे आणि मागणीनुसार चिकन बिर्याणीऐवजी बीफ बिर्याणी दिली जाईल. या वादाच्या पृष्ठभूमीवर उत्तर देताना, एएमयू प्रशासनाने स्पष्ट केले की, नोटीशीत टाईप करताना चूक झाली आहे आणि नोटीस जारी करण्यास जबाबदार असलेल्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

### संगीतकार प्रीतम यांच्या स्टुडिओमध्ये चोरी

**मुंबई** : संगीतकार प्रीतम चक्रवर्ती यांच्या मुंबईतील स्टुडिओमध्ये ४० लाख रुपयांची चोरी झाली आहे. स्टुडिओचा स्पॉटबॉय आशिष सय्यल पैसे घेऊन पळून गेला असून, पोलिसांनी एफआयआर नोंदवला आहे. या प्रकरणाची तक्रार मुंबईतील मालाड पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली. प्रीतम चक्रवर्तींच्या व्यवस्थापकाने या घटनेची तक्रार केली आहे.

### तापमान/पर्जन्यमान

| | कमाल | मिमी |
|---|---|---|
| सोलापूर | ३६.२ | २२.६ |
| अमरावती | ३४.४ | १६.१ |
| भंडारा | ३३.६ | १६.२ |
| बुलडाणा | ३४.० | २०.० |
| चंद्रपूर | ३४.० | -.- |
| गडचिरोली | ३३.० | १५.६ |
| गोंदिया | ३२.६ | १६.४ |
| नागपूर | ३४.० | १५.० |
| वर्धा | ३४.२ | १६.४ |
| वाशीम | ३४.२ | २०.८ |
| यवतमाळ | ३४.६ | १८.० |

# आनंदवन मानवतेचे मंदिर : मुख्यमंत्री फडणवीस

### कृतज्ञता सोहळ्यात व्यक्त केली भावना

### आर्थिक पाठबळ देण्याची ग्वाही



मार्गदर्शन करताना देवेंद्र फडणवीस, तर मंचावर उदय सामंत, राम नाईक, डॉ. विकास आमटे, डॉ. प्रकाश आमटे व मान्यवर

**चंद्रपूर, ९ फेब्रुवारी**

समाजात ज्या कामाला मान्यता नव्हती, तिरस्कार होत होता, अशा काळात बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांच्या सेवेचे व्रत हाती घेतले. आज ७५ वर्षांनंतर अनेक प्रतिष्ठित लोक या संस्थेशी जुळले आहेत. या सर्वांना आनंदवनातून आत्मिक समाधान मिळते. आनंदवन खऱ्या अर्थाने मानवतेचे मंदिर आहे, अशा भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या.

बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांनी स्थापन केलेल्या महारोगी सेवा समितीच्या ७५ व्या वर्षपूर्तीनिमित्त आयोजित कृतज्ञता सोहळ्यात ते बोलत होते. मंचावर आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके, उद्योगमंत्री उदय सामंत, माजी राज्यपाल राम नाईक, आ. किशोर जोरगेवार, आ. करण देवतळे, महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे, डॉ. प्रकाश आमटे, डॉ. भारती आमटे, डॉ. मंदाकिनी आमटे आदी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, केवळ कुष्ठरोग्यांची सेवा नव्हे, तर जलसंधारण, पर्यावरण रक्षण आदी समाजसेवेच्या विविध क्षेत्रांत आनंदवनात प्रयोग सुरू आहेत. आपले संपूर्ण जीवन आमटे कुटुंबीयांनी या प्रकल्पासाठी समर्पित केले आहे.

सामंत म्हणाले, आनंदवन येथे दिव्यांगांसाठी कौशल्य विकास केंद्र सुरू होत असून, उद्योगांशी त्याचा समन्वय करून देण्यात आला आहे. या केंद्राच्या माध्यमातून दिव्यांगांना नोकरी मिळण्यास मदत होईल.

#### कुष्ठरोगमुक्त भारत करण्याचा पंतप्रधानांचा संकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा २०२७ पर्यंत कुष्ठरोगमुक्त भारत करण्याचा संकल्प घेतला आहे. या कामासाठी शासनाला आनंदवनसारख्या संस्थांची मोलाची मदत घ्यावी लागणार आहे. यापुढेही आपल्याला या क्षेत्रात मोठे काम करावे लागेल आणि यात आनंदवनचा मोठा सहभाग राहील, असे फडणवीस म्हणाले.

प्रास्ताविक कौस्तुभ आमटे, संचालन वसुंधरा काशीकर-भागवत यांनी केले. आभार डॉ. दिगंत आमटे यांनी मानले. (तभा वृत्तसेवा)

# आयात शुल्कातील कपातीनंतर सोने तस्करी घटली

**नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

केंद्र सरकारने सोन्यावरील आयात शुल्कात सहा टक्क्यांनी कपात केल्यानंतर या मौल्यवान धातूच्या तस्करीत जुलै २०२४ पासून मोठ्या प्रमाणात घट झाली, अशी माहिती केंद्रीय अप्रत्यक्ष आणि अबकारी कर विभागाचे (सीबीआयसी) अध्यक्ष संजय कुमार अग्रवाल यांनी दिली.



उपलब्ध माहितीनुसार, यंदाच्या आर्थिक वर्षात एप्रिल ते जून या कालावधीत कस्टम्स आणि डीआरआयच्या अधिकाऱ्यांनी ५४४ कोटी रुपयांचे ८४७ किलो सोने जप्त केले. गेल्या वर्षी जुलै महिन्यात सरकारने सोन्यावरील आयातशुल्क १५ टक्क्यांवरून घटवून सहा टक्क्यांवर आणले. म ागील वर्षीच्या अर्थसंकल्पात सोन्यावरील शुल्क कमी केल्यानंतर सोन्याच्या तस्करीत लक्षणीय घट झाली आहे, असे अग्रवाल यांनी वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितले. जप्त केलेल्या सोन्याचे प्रमाण किंवा त्याचे मूल्य अग्रवाल यांनी उघड केले नसले, तरी कोणत्याही मार्गाने होणाऱ्या मादकपदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी अधिकारी आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक, खुल्या सीमा आणि देशात येणाऱ्या व्यावसायिक मालवाहू जहाजांवर नियमित लक्ष ठेवून आहेत, असे त्यांनी सांगितले. सोन्यावर मोठ्या प्रमाणात सीमाशुल्क लादले जाते, त्यावेळी याची तस्करी करून मोठ्या प्रमाणात नफा कमावला जातो.

# राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरणाचे कार्य दुर्गम भागात पोहोचवणार

### न्यायमूर्ती भूषण गवई यांचे प्रतिपादन

### लाभार्थींना लाभाचे वाटप

### योजनांच्या माहितीसाठी स्टॉल

**धारणी, ९ फेब्रुवारी**

येत्या काळात राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरणाचे कार्य देशभरातील दुर्गम भागात पोहोचविण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यासाठी राज्य शासनाचे सहकार्य घेण्यात येत असून त्यांच्या मदतीने शासकीय सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासोबतच त्यांना लाभ देण्यात येत आहे, अशी माहिती सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दिली.



आदिवासी भगिनींशी संवाद साधताना न्या. भूषण गवई

राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा मुंबई यांच्या वतीने आयोजित धारणी येथे विधि सेवा महाशिबिर आणि शासकीय योजनांचा महामेळावा रविवारी पडला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्या. अभय ओक, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्या. अतुल चांदूरकर, न्या. रेवती मोहिते डेरे, उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूरचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, पालक न्यायमूर्ती वृषाली जोशी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, इंद्रजित महादेव कोळी, ॲड. राजीव गोंडाणे, नवनियुक्त न्यायमूर्ती प्रवीण पाटील आदी उपस्थित होते.

न्या. भूषण गवई म्हणाले, मेळघाट परिसर हा निसर्गसंपन्न आहे. या भागात आदिवासी समाज बहुसंख्येने आहे. त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी शिबिर घेण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे. समाजात राजकीय समता प्रस्थापित करण्यासाठी राज्यघटनेने संरक्षण दिले आहे. देशात ७५ वर्षे संविधानाने पूर्ण केले आहे. त्यामुळे देशात लोकशाही प्रस्थापित झाली आहे. मात्र समाजात सामाजिक आणि आर्थिक समानता प्रस्थापित होणे गरजेचे आहे.

न्या. ओक, न्या. आराधे यांच्यासह अन्य मान्यवरांनीही आपले विचार मांडले. यावेळी ज्योती पटोरकर, नारायण कासदेकर, मोहम्मद अरिफ अब्दुल हबीब, सतीश नागले, तरहाना शेख परवीन, आदर्श पटोलकर, अर्जुन पटोरकर, कमला जावरकर, रतई तारशिंगे, श्याम जावरकर, रामदास भिलावेकर, माही राठोड, पार्वती नागोरे यांना लाभाचे वाटप करण्यात आले. वनस्पतींना पाणी देऊन शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. सुरुवातीला बरडा येथील समूहाने गजली सुसून आदिवासी नृत्याने स्वागत केले. जिल्हा परिषद महाविद्यालयाने स्वागत गीत सादर केले. (तभा वृत्तसेवा)


# 'एकेका' विकासात्मक योजनेची उकल सुरू!

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या प्रयत्नांना यश

### विमानतळानंतर आता दर्शन मंडपाच्या कामावर 'फोकस'

**तभा वृत्तसेवा। अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

जिल्हाधिकाऱ्यांनी चालू वर्षातील कामाच्या सोडलेल्या संकल्पांमध्ये उजनी धरणावरील जलपर्यटन, सोलापुरातील विमानसेवा, पंढरपूर कॉरिडोर अन् भाविकांसाठीचा दर्शन मंडप उभारणी आणि शेतकरी-कामगार यांच्या हिताच्या योजना जिल्हाभर राबविणे आदींचा समावेश आहे. यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी विमानतळाच्या व्यवस्थापकांच्या पाठीशी लागून डागडुजीसाठी ६५ कोटीपर्यंत खर्च करून विमानतळ सुसज्ज केले आहे. आता विमान कधीही येवो... आपण आपले सर्व काम पूर्ण केल्याचा आनंदही त्यांनी गत महिन्यात द्विगुणीत केला. तर आता पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दर्शन मंडप उभारणी करून ते देणार आहेत. इतकेच नाहीतर हे काम निविदा प्रक्रियेत असल्याचीही माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली अन् जिल्हा विकासासाठी एकेक काम गतीने आणि नियोजनबध्द करणार असल्याचेही जिल्हाधिकारी म्हणाले.



पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात नुकत्याच आयोजित राज्यस्तरीय नियोजन समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत ८६१.८९ कोटीचा प्रारूप आराखडा समिती समोर सादर केला. शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक मर्यादित जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण करीता ६६१.८९ कोटीचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला. परंतु शिक्षण, आरोग्य, रस्ते विकास, नगरविकास, जनसुविधा यासारख्या महत्वाच्या बाबींकरीता २०० कोटींची अतिरिक्त मागणीचा पुरक आराखडा सादर केल्याचे त्यांनी सांगितले. तर सोलापूर जिल्ह्याच्या एकात्मिक प्रारूप आराखडा अंतर्गत मंजूर २८२ कोटीच्या निधीतून उजनी धरण जलपर्यटन, विनयार्ड पर्यटन, कृषी व धार्मिक पर्यटन अंतर्गत सद्यस्थिती बाबत तसेच पंढरपूर येथे दर्शन मंडप व स्कायवॉक उभारण्यात येणाऱ्या १२९.४९ कोटी रुपयांच्या कामाची सद्यस्थितीची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली आहे. सध्याही जिल्ह्यात पीएम सुर्यघर योजना, हर घर जल, आयुष्मान भारत, शिधापत्रिकाधारकांची ई-केवायसी करून घेणे यासह इतरही योजना गतीने राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यातील प्रत्येक कामात मायक्रोप्लॅनिंग करून पुढे-पुढे जात राहणे हा त्यांचा स्वभाव आहे. यामुळे प्रशासनातील विभागाप्रमुखांच्या बैठका घेवून त्यांना राज्य अन् केंद्र स्तरावरील प्रत्येक योजना गतीने राबविण्यासाठी जिल्हाधिकारी सुचना करताना दिसतात.

#### उत्साही पालकमंत्र्यांकडूनही जिल्हावासियांना अनेक अपेक्षा

जयकुमार गोरे हे अत्यंत धाडसी आणि अत्यंत उत्साही पालकमंत्री म्हणून या जिल्ह्याला मिळाले आहेत. डीपीसीमध्ये त्यांनी अवैध वाळू उपसा, आरोग्य, क्रिडा खात्यातील विषयांवर अत्यंत आक्रमक पवित्रा घेवून आपल्या कामाची चुणूक दाखविली आहे. यामुळे जिल्ह्यातील प्रलंबित असलेले विविध प्रश्न, योजना गतीने आता मार्गी लागतील अशी अपेक्षा जिल्हावासियांना लागली आहे. परवाच पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात पालकमंत्री गोरे यांनी सोलापूर जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत अतिरिक्त मागणी केलेल्या २०० कोटीच्या निधीतून जास्तीत जास्त निधी सोलापूर जिल्ह्याला विविध विकास कामांसाठी मिळावा, अशी मागणी केली. तसेच सन २०२४-२५ अंतर्गत सोलापूर जिल्ह्याला ६० टक्के निधी प्राप्त झालेला असून, उर्वरित ४० टक्के निधी लवकरात लवकर देण्याची मागणीही यावेळी त्यांनी केली.

#### या दोन महिन्यात मिळणार जिल्ह्याला उर्वरित निधी

सोलापूर जिल्ह्याला जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ सर्वसाधारण अंतर्गत आज रोजी पर्यंत ६० टक्के निधी उपलब्ध करून दिलेला आहे. उर्वरित ४०% निधी पैकी २०% निधी याच महिन्यात उपलब्ध करून देणार तर उर्वरित २० टक्के निधी पुढील महिन्यात उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी दिली आणि उपलब्ध झालेला शंभर टक्के निधी सर्व शासकीय यंत्रणांनी काटेकोरपणे नियोजन करून खर्च करावा, असेही त्यांनी निर्देशित केले. यामुळे सोलापूर शहर-जिल्ह्यातील काही विकासकामे या दोन महिन्यात मार्गी लागणार आहेत.

## रंग राजधानीचे

### अरे कोणी तरी त्याला सावरा...!

**दिल्ली** विधानसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपाने आपचे सर्वेसर्वा आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना पाणी पाजले. नंतर अस्वस्थ वाटत असलेल्या एका भाजपा कार्यकर्त्याला खऱ्या अर्थाने पाणी पाजा, अशी सूचना त्यांना करावी लागली. त्याचे झाले असे... कोणत्याही राज्यात भाजपाला विजय मिळाल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी सायंकाळी जल्लोष साजरा करण्यासाठी दीनदयाल उपाध्याय मार्गावरील भाजपा मुख्यालयात पोहोचतात. २७ वर्षांनंतर दिल्ली विधानसभेत भाजपाला नेत्रदीपक विजय मिळाल्यानंतर मोदी यांचे शनिवारी सायंकाळी भाजपा कार्यालयात आगमन झाले असता, त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी भाजपा कार्यकर्त्यांचा उत्साह ओसंडून वाहात होता. मोदी-मोदीच्या घोषणांनी संपूर्ण आसमंत दणाणून गेला होता.

मोदींचे भाषण सुरू असतानाच त्यांच्या लक्षात आले की, घोषणा देणाऱ्यांपैकी एका कार्यकर्त्यांची प्रकृती बिघडली आहे, तो चक्कर येऊन खाली पडू शकतो. मोदींनी आपले भाषण थांबवले आणि त्याच्या आजूबाजूला असलेल्या लोकांना त्या कार्यकर्त्याला सावरण्याची सूचना केली. तो अस्वस्थ दिसत आहे, त्याला आधी पकडा, पाणी पाजा, डॉक्टरांनाही बोलवा, अशा एकामागोमाग सूचनांचा मारा मोदी यांनी केला. उपस्थित कार्यकर्त्यांनी त्याला पाणी पाजले, काही मिनिटांतच तो कार्यकर्ता थोडा सावरला आणि नंतर मोदी यांनी आपले भाषण सुरू केले. गोष्ट अतिशय छोटी पण मोठा आशय सांगणारी आहे. मोदी पक्षाच्या सामान्यातील सामान्य कार्यकर्त्यांची कशी काळजी घेतात, याचे दर्शन घडवणारी आहे म्हणून मोदी हे मोदी आहेत. देशभरातील भाजपा कार्यकर्ते मोदी यांच्यावर आपला जीव का ओवाळून टाकतात, त्याचे कारण अशा छोट्याछोट्या घटनांत दडले आहे.

### सीतारामन् यांचे असेही आदरातिथ्य

**केंद्रीय** अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी अर्थसंकल्पातून देशवासीयांवर आश्वासनांचा पाऊस पाडला. १२ लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्यांना आयकरातून सवलत देण्याची त्यांची घोषणा यावेळी सर्व दैनिकांच्या पहिल्या पानाच्या अर्थसंकल्पीय बातमीचा मथळा झाला. सीतारामन् यांनी देशवासीयांवर ममतेचा वर्षाव केला, असे म्हणायलाही हरकत नाही. दुसऱ्या दिवशी सीतारामन् यांनी दिल्लीतील पत्रकारांना भोजनासाठी आमंत्रित केले. अर्थसंकल्प सादर केल्यानंतर आतापर्यंत सर्व अर्थमंत्री पत्रकारांना रात्री डिनरसाठी बोलवत होते, पण सीतारामन् यांनी त्यांना लंचसाठी बोलावले. सीतारामन् जातीने सर्व टेबलवर जात पत्रकारांची विचारपूस करीत होत्या. एवढेच नाही तर, आग्रह करून खाऊ घालत होत्या. कोणाची डिश रिकामी दिसली की, सीतारामन् लगेच वेटरांना बोलावून ती पुन्हा भरायला सांगत होत्या. आधी तुमची प्लेट भरून घ्या, मगच मी तुमच्याशी बोलते, असे त्या सर्वांना आग्रहपूर्वक सांगत होत्या. अर्थसंकल्पाबाबत पत्रकारांच्या सर्व शंकांचे आणि प्रश्नांचे निरसन त्यांनी समाधानकारक पद्धतीने केले. एरव्ही




कर्तव्यकठोर वाटणाऱ्या सीतारामन् यांच्यातील ममतेचे दर्शन यानिमित्ताने उपस्थितांना झाले.

### अन् देवेगौडा भावुक झाले...

**माजी** पंतप्रधान आणि जनता दल धर्मनिरपेक्षचे नेते एच. डी. देवेगौडा राज्यसभेचे सदस्य आहेत. ९१ वर्षीय देवेगौडा यांना चालायला त्रास होतो. वयोमानानुसार प्रकृतीची पाहिजे तशी साथ देत नाही. त्यामुळे संसदभवनात ते व्हीलचेअरवर बसून येत असतात. गुरुवारी राज्यसभेत बोलतांना देवेगौडा अचानक भावुक झाले. संसदेतील आपल्या ३३ वर्षांच्या राजकीय प्रवासाचा त्यांनी आढावा घेतला. राज्यसभा सदस्य म्हणून माझा एक वर्षाचा कार्यकाळ शिल्लक आहे, पण हा कार्यकाळ मी पूर्ण करू शकेल, असे वाटत नाही, असे म्हणताना त्यांचा गळा दाटून आला. राज्यसभेचे अध्यक्ष आणि उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांनी त्यांना टोकले. तुम्ही राज्यसभा सदस्य म्हणून तुमचा उर्वरित एक वर्षाचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण कराल, संपूर्ण सभागृहाच्या शुभेच्छा तुमच्यासोबत आहेत, तुमच्या आशीर्वादांची सभागृहातील सगळ्यांनाच गरज आहे, असे धनकड यांनी म्हणत वातावरणातील ताण हलका केले. एवढेच नाही तर, दीर्घायुष्यासाठी शुभेच्छाही दिल्या. जनता दल धर्मनिरपेक्ष सध्या रालोआत आहे. देवेगौडा यांचे पुत्र एच. डी. कुमारस्वामी मोदी यांच्या मंत्रिमंडळातही आहेत.

### आणि प्रियांकांनी भाषणास दिला नकार...

**काँग्रेस** महासचिव प्रियांका वढेरा सोमवारपासून सुरू होणाऱ्या संसदेच्या अधिवेशनात अर्थसंकल्पीय चर्चेत सहभागी होऊ शकतात. मागील आठवड्यात संसदेच्या दोन्ही सभागृहात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा झाली. दोन्ही सभागृहात या चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दमदार उत्तर दिले. धन्यवाद प्रस्तावावर काँग्रेसतर्फ अनेक नेते बोलले. प्रियांका वढेरा यांना भाषणाची संधी देण्यात आली होती. मात्र प्रियांका यांनी बोलण्यास नकार दिला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेत एकाच सत्रात सलग दोन भाषणे कोणी करू नये, असा एक नियम केला असल्याचे समजते. लोकसभेत यावेळी काँग्रेसचे ९९ सदस्य आहेत, सर्व सदस्यांना बोलता यावे, भाषण करता यावे म्हणून एका विषयावर एकाच सदस्याने बोलावे, असा नियम त्यांनी केला आहे. प्रियांका धन्यवाद प्रस्तावावर बोलल्या असत्या, तरी काँग्रेस पक्षातील कोणी आक्षेप घेतला नसता. अपवाद म्हणून सगळ्यांनीच त्याकडे पाहिले असते. पण, आपल्यामुळे आपला भाऊ अडचणीत येऊ नये म्हणून प्रियांका यांनी भाषण करण्यास नकार दिला, असे समजते. त्याची कसर आता त्या अर्थसंकल्पावरील चर्चेत भाषण करीत भरून काढतील. तसेही प्रियांका वढेरा राहुल गांधींपेक्षा भाषण चांगले करतात, असे काँग्रेस पक्षातील अनेकांचे म्हणणे आहे. राहुल गांधी यांनीही आता आपल्यात सुधारणा केली आहे. राहुल गांधी यांची हिंदीपेक्षा इंग्रजीवर जास्त पकड आहे. हिंदीत भाषण करताना ते अनेकवेळा गडबड करतात, त्यांना शब्द सुचत नाही. त्या तुलनेत इंग्रजीत त्यांचे भाषण बऱ्यापैकी प्रभावी होते, असे काँग्रेस पक्षात अनेकांना वाटते.

● दिल्लीवाला

# सहकारी संस्थांना ३२ व्यवसायाची परवानगी

**प्रफुल्ल व्यास**

**वर्धा, ९ फेब्रुवारी**

### दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक अनास्कर यांची 'तरुण भारत'ला मुलाखत

महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश आदी मोजक्याच राज्यांत सहकार चळवळ आहे. ती चळवळ सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारने नव्याने सहकार मंत्रालयाची निर्मिती केली. त्याचा फायदा होताना दिसून येत आहे. सहकारी क्षेत्र यापूर्वी शेती आणि शेतकऱ्यांवरच अवलंबून होते. त्यामुळे अनिष्ट तफावत निर्माण झाली होती. ती भरून काढण्यासाठी सहकार मंत्रालयाने विविध कार्यकारी संस्थांना ३२ प्रकारचे व्यवसाय करण्याची परवानगी दिली. त्या माध्यमातून सहकार क्षेत्र सक्षम होईल, अशी माहिती सहकार विषयाचे तज्ज्ञ व दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी दिली.

ते वर्धेत महाराष्ट्र शासन व सहकार विभागाच्या वतीने आयोजित सहकार मेळाव्याला आले असता, 'तरुण भारत'सोबत बोलत होते.

सहकारी चळवळ ही शासनप्रणीत चळवळ आहे. राज्य सरकारने १९६० ते ८० या काळात साखर कारखाने, सूत गिरण्या आणि दूध डेअरींना भरपूर मदत केली. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात सहकारी चळवळ फोफावली. विदर्भात उसाचे उत्पादन नसल्याने साखर कारखाने नव्हते. राजकीय प्रभावही नसल्याने विदर्भात सहकार चळवळ उभी राहू शकली नसल्याचे त्यांनी सांगितले.



केंद्र सरकारमध्ये कृषी आणि सहकार एकाच मंत्रालयाच्या अखत्यारीत होते. इतिहासात प्रथमच केंद्र सरकारने सहकार क्षेत्रासाठी स्वतंत्र मंत्रालयाची निर्मिती केली. अमित शाह यांच्याकडे ते खाते देण्यात आले. त्यांनी सहकार क्षेत्रातील इन बॅलन्स भरून काढण्याची मोहीम हाती घेतली. विविध कार्यकारी संस्थांना पेट्रोल पंप, गॅस एजेन्सी, शाळा, रुग्णालये आदी ३२ प्रकारचे व्यवसाय सुरू करण्याची परवानगी दिली. शेती आणि शेतकऱ्यांवर अवलंबून असल्याने या क्षेत्रात अनिष्ट तफावत होती. भारतात १२ हजार कोटींची ही तफावत असून, त्यापैकी ६ हजार कोटी फक्त महाराष्ट्रात असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय अर्थसंकल्पात सहकारासाठी तरतूद होऊ लागली आहे. राष्ट्रीय सहकारी निगम राज्य सहकारी बँकांच्या माध्यमातून सहकारी संस्थांना कर्जपुरवठा सुरू केला आहे. या माध्यमातून सहकार क्षेत्र सक्षम होईल. पर्यायाने शेती व शेतकऱ्यांचाही फायदा होईल, असा विश्वास अनास्कर यांनी व्यक्त केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## मणिपुरात तीन बंडखोरांना अटक

◆ **इम्फाळ, ९ फेब्रुवारी**

मणिपूरच्या पश्चिम इम्फाळमधून तीन बंडखोरांना अटक करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

जिल्ह्यातील नारनकोंजी परिसरातून शनिवारी युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रन्टच्या (यूएनएलएफ-पाम्बेई) दोन बंडखोरांना पोलिसांनी अटक केली. हे दोन्ही दहशतवादी खंडणी वसुली आणि शस्त्रास्त्र व दारुगोळ्याच्या तस्करीत सहभागी होते. त्यांच्या ताब्यातून .३२ पिस्तूल आणि ३,१२० रुपये जप्त करण्यात आले. खंडणी वसुलीत सहभागी असलेल्या प्रतिबंधित पीपल्स लिबरेशन आर्मीच्या एका बंडखोराला कांगजाबी लीरक माचिन परिसरातून अटक करण्यात आली, असे अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)



दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपाला ऐतिहासिक विजय मिळाला. याचा जल्लोष भाजपाचे कार्यकर्ते देशभरातच साजरा करीत आहेत. हरयाणात मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांनी हा विजय साजरा करण्यासाठी ठिकठिकाणी चक्क जिलेबी भंडाराचे आयोजन केले. यातील एका ठिकाणी त्यांनी जिलेबीचे वाटप केले

# महाकुंभात पंचतारांकित संस्कृतीला थारा नाही : महंत धर्मेंद्र दास

### खरे भाविक कुठल्याही त्रासाला सामोरे जाण्यास तयार

◆ **प्रयागराज, ९ फेब्रुवारी**

ग्लॅमरस आणि पंचतारांकित संस्कृतीचा भाग असलेले अनेक प्रभावशाली व्यक्ती, मॉडेल आणि अभिनेते व अभिनेत्री महाकुंभात आले. त्यांना अनेक किमी पायी चालावे लागले, तर काहींना गैरसोयीला सामोरे जावे लागल्याने प्रसार माध्यम आणि समाज माध्यमांवर त्यांचे व्हिडीओ व्हायरल झाले. यावर अनेकांनी टीकाटिप्पणी केली. यावरून महंत धर्मेंद्र दास म्हणाले, महाकुंभ पंचतारांकित संस्कृतीचा भाग नाही. संत, भाविक आणि सनातनचे केंद्र आहे. जे खरे भाविक असतात, ते कुठल्याही त्रासाला सामोरे जाण्यास तयार असतात, ते भक्तीपासून विचलित होत नाही.



अखिल भारतीय उदासीन अखाड्याचे अध्यक्ष महंत दास वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले, प्रसार माध्यमे साधू, संतांची सेवा करणाऱ्या भाविकांबद्दल कधीही माहिती देत नाही. अनेक भाविक पहाटे स्नान करता यावे यासाठी संगमस्थळी रात्रभर खुल्या आकाशाखाली थंडीची पर्वा न करता राहतात. सोयी-सुविधेबद्दल ते कधीही तक्रार करीत नाही. त्यांना चमकधमक, ग्लॅमरस आणि पंचतारांकित संस्कृतीबद्दल रस नाही. सोयीसुविधा असलेल्या तंबूमध्ये राहण्यासदेखील त्यांची तयारी नाही. उपलब्ध परिस्थितीत संतांचे दर्शन आणि स्नान करण्याची त्यांची इच्छा कौतुकास्पद असून, त्यांची दखल माध्यमे कधीही घेत नाही. त्याऐवजी महाकुंभात येणारे प्रभावशाली लोक, मॉडेल आणि अभिनेत्रींबद्दल सातत्याने वृत्त दिले जाते. जे भाविक श्रद्धेने येतात, कुठलीही तक्रार करीत नाही तसेच आहे त्या परिस्थितीत स्नान करून दर्शन घेतात त्यांनाच मोक्ष प्राप्त होतो. (वृत्तसंस्था)

### भक्तीचा दिखावा नको

महाकुंभ सुरू झाल्यापासून त्रिवेणी संगमावर स्नान करण्यासाठी मॉडेल राहिलेली साध्वी हर्षा रिचारिया, पूजेची साहित्य विकणारी मोना लिसा, आयआयटी बाबा अभय सिंह आणि अभिनेत्री ममता कुलकर्णी यांचे वृत्त प्रसार माध्यमांनी प्राधान्यांनी दिले. यावर महंत दास यांनी नाराजी व्यक्त केली. महाकुंभात पंचतारांकित संस्कृतीला थारा नाही. कुठलाही दिखावा न करता आराधना करणारेच खरे भाविक आहेत. उन, वारा, पाऊस, थंडीची पर्वा न करता स्नान करणारे खरे शिवभक्त असून, त्यांच्यासंदर्भात माध्यमांना काहीही देणेघेणे नाही, ही शोकांतिका असल्याचे महंत दास म्हणाले.

# गोपनीय माहिती मिळविण्याचा बायडेन यांचा अधिकार संपुष्टात

### ट्रम्प म्हणाले, स्मरणशक्ती चांगली नसल्याने निर्णय घेतला

◆ **वॉशिंग्टन, ९ फेब्रुवारी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी माजी राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांचा देशाशी संबंधित गोपनीय माहिती मिळविण्याचा अधिकार संपुष्टात आणला. ट्रम्प यांनी शनिवारी समाज माध्यमावर पोस्ट करीत म्हटले की, बायडेन यांना गोपनीय माहिती मिळविण्याची आवश्यकता नाही. त्यांची स्मरणशक्ती कमकुवत झाल्याने निर्णय घेतला आहे.



ट्रम्प यांनी पोस्टमध्ये म्हटले की, न्याय विभागाच्या अहवालात बायडेन यांची स्मरणशक्ती कमकुवत असल्याचे उघड झाले आहे. अशा परिस्थितीत संवेदनशील माहिती त्यांच्याकडे जाणे देशासाठी धोकादायक ठरू शकते. त्यांच्यावर विश्वास ठेवता येणार नाही. मी नेहमीच आपल्या राष्ट्रीय सुरक्षेचे रक्षण करण्यासाठी प्रतिबद्ध आहे.

फेब्रुवारी २०२४ मध्ये आलेल्या हुर संस्थेच्या अहवालात बायडेन यांना त्यांच्या मुलाच्या मृत्यूचे वर्ष आणि बराक ओबामा यांच्या कारकीर्दीतील उपराष्ट्रपतिपदाच्या अनेक महत्त्वाच्या घटना विसरल्याचे सांगण्यात आले होते. तथापि, बायडेन यांनी हा अहवाल फेटाळून लावला होता.

**५० अधिकाऱ्यांचाही समावेश**

ट्रम्प यांनी ५० पेक्षा अधिक आजी-माजी अधिकाऱ्यांचा गोपनीय माहिती मिळविण्याचा अधिकार संपुष्टात आणला आहे. या सर्वांवर २०२० च्या निवडणुकीत बायडेन यांना मदत केल्याचा आरोप होता. त्यात माजी वरिष्ठ अमेरिकन लष्करी कमांडर मार्क मिले यांचा समावेश आहे. अमेरिकेचे नवे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी मार्क मिली यांची चौकशी करण्याचा आदेश दिला आहे. (वृत्तसंस्था)

### ट्रम्प यांच्या निर्णयाने काय होणार?

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना सुरक्षा मंजुरीची आवश्यकता नसते आणि त्यांच्या पदामुळे त्यांना गोपनीय माहिती मिळते. अमेरिकेत माजी राष्ट्राध्यक्षांना पारंपरिकपणे गोपनीय माहिती मिळत आली आहे; मात्र त्यांना माहिती मिळू देणे हे राष्ट्राध्यक्षांच्या विवेकबुद्धीवर अवलंबून असते. गोपनीय माहिताच्या अधिकाराद्वारे माजी राष्ट्राध्यक्ष जगात काय चालले आहे, याची माहिती मिळवू शकतात. विशेषतः अमेरिकेच्या हितसंबंधांशी संबंधित इतर देशांची गोपनीय माहिती या अधिकारांतर्गत मिळू शकते. याअंतर्गत जगात कोणते धोके उद्भवू शकतात, हे त्यांना समजण्यास मदत होते.

## आता १९ राज्यांत रालोआचे सरकार

◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

२७ वर्षांनंतर भाजपाने दिल्लीत सत्ता प्रस्थापित केली आहे. यामुळे आता भाजपा आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे देशातील १९ राज्यांत सरकार स्थापन झाले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्या टर्ममध्ये पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर देशात आठ राज्यांत झालेल्या निवडणुकीत भाजपा आणि रालोआला पाच राज्यात सत्ता मिळाली आहे. आंध्रप्रदेश, अरुणाचलप्रदेश, ओडिशा, हरयाणा आणि महाराष्ट्र या पाच राज्यांत भाजपा आणि मित्रपक्षांचे सरकार आहे. सिक्कीम, जम्मू-काश्मीर आणि झारखंडमध्ये पराभव पत्करावा लागला. २०१८ मध्ये भाजपा आणि रालोआला २१ राज्यांमध्ये सत्ता प्राप्त झाली होती. यामुळे रालोआने माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळातील काँग्रेस राजवटीचा विक्रम मोडीत काढला होता. त्रिपुरा, मेघालय, नागालँडमध्ये सत्ता मिळाल्यामुळे त्यावेळी रालोआला २१ राज्यात सत्ता मिळाली होती. हिमाचल आणि झारखंडमध्ये सत्ता मिळाली असती, तर रालोआची सत्ता असणाऱ्या राज्यांची संख्या २१ झाली असती. (वृत्तसंस्था)

# अवामी लीग नेत्याच्या घरावर हल्ला; ४० जणांना अटक

◆ **ढाका, ९ फेब्रुवारी**

ढाकाच्या बाहेरील भागात अवामी लीग नेत्याच्या घराची तोडफोड करण्यात आली. या तोडफोडीदरम्यान विद्यार्थी गटाच्या कार्यकर्त्यांवर कारवाई करण्यात आली. बांगलादेशमध्ये सुरू केलेल्या कारवाईत ४० जणांना अटक करण्यात आली आहे, असे एका माध्यम वृत्तात म्हटले आहे.

शुक्रवारी रात्री गाझीपूर जिल्ह्यात विद्यार्थी व नागरिकांवर झालेल्या हल्ल्यानंतर मुख्य सल्लागार प्रोफेसर मुहम्मद युनूस यांच्या सरकारने शनिवारी 'ऑपरेशन डेव्हिल हंट'चे आदेश दिले.

युनायटेड न्यूज ऑफ बांगलादेशने दिलेल्या वृत्तानुसार, या कारवाईचा भाग म्हणून जिल्ह्याच्या काही भागांतून ४० जणांना ताब्यात घेण्यात आले आहे, असे गाझीपूरचे पोलिस अधीक्षक चौधरी जाबेर सादेक यांनी सांगितले.



शुक्रवारी पदच्युत पंतप्रधान शेख हसीनाच्या अवामी लीग पक्षाच्या सर्व खुणा नष्ट करण्यासाठी निघालेल्या जमावाशी संबंधित किमान १४ जण जखमी झाले. माजी स्वातंत्र्ययुद्ध मंत्री मोझम्मेल हक यांच्या निवासस्थानावरील हल्ल्यादरम्यान हा हिंसाचार झाला.

जखमींना तातडीने शहीद ताजुद्दीन अहमद मेडिकल कॉलेज रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. नंतर त्यापैकी काहींना ढाका मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. या घटनेच्या निषेधार्थ भेदभाव विरोधी विद्यार्थी चळवळ आणि राष्ट्रीय नागरिक समितीने गाजीपूरमध्ये एक दिवसभर निदर्शने व रॅली काढली. या निदर्शनानंतर सायंकाळी साडेसहाच्या सुमारास उपायुक्त कार्यालयासमोर समाजकंटकांनी केलेल्या गोळीबारात एक विद्यार्थी जखमी झाला. (वृत्तसंस्था)

## अमेरिकेत ७.२५ लाख अवैध स्थलांतरित

◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

अमेरिकेत अवैध नागरिकांची धरपकड सुरू आहे. यात भारतीयांनाही पकडण्यात आले. अमेरिकन लष्करी विमानाने भारतीयांची पहिली १०४ जणांची तुकडी भारतात परतली. प्यू रिसर्चनुसार, अमेरिकेत ७ लाख २५ हजारांवर अवैध स्थलांतरित राहतात.

इमिग्रेशन आणि कस्टम्स एन्फोर्समेंटने (आयसीई) अहवाल दिला की, त्यांनी आतापर्यंत वैध कागदपत्रांशिवाय २०,४०७ भारतीय ओळखले आहेत. यापैकी २,४६७ भारतीय इमिग्रेशन आणि कस्टम एन्फोर्समेंट अटक केंद्रात होते. त्यापैकी १०४ जणांना भारतात पाठवण्यात आले. याशिवाय १७,९४० भारतीयांना अटक करण्यात आलेली नाही, पण त्यांच्या पायात डिजिटल ट्रॅकर बसवले आहे. आयसीई त्यांचे स्थान २४ तास ट्रॅक करते. (वृत्तसंस्था)




## पारंपरिक वेशभूषेत निघाली मिरवणूक

**हजारो जनजातींनी केले पवित्र स्नान**

जनजाती भागातून महाकुंभासाठी आलेल्या हजारो भाविकांनी नुकतेच भव्य मिरवणुकीनंतर त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केले. १० फेब्रुवारीपर्यंत अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रमतर्फे जनजाती समागम स्वरूपात महाकुंभ परिसरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

'वनवासी कल्याण आश्रम' आयोजित युवाकुंभानंतर हजारो जनजाती बांधन भव्य मिरवणुकीतून काठाकडे निघाले. स्वामी अवधेशानंद गिरीजी महाराज यांनी भगवा झेंडा दाखवून मिरवणुकीला रवाना केले. तेव्हा भाविक भगवान शंकर, श्री राम, श्री कृष्ण आणि भारत मातेचा जयघोष करीत संगम तीरावर पोहोचले. नागालँड, मिझोरम ते अंदमान आणि केरळ तसेच हिमाचलपर्यंत हजारो जनजाती भाविक त्यांच्या पारंपरिक पोशाखात या मिरवणुकीत सहभागी झाले होते.

जनजाती विहंगम दृश्य महाकुंभात पाहायला मिळाले. १० हजारांहून अधिक जनजाती समाजाचा सहभाग भव्य आणि शिस्तबद्ध मिरवणुकीत एक आकर्षक आणि संस्मरणीय देखावा होता.

# भारताशी नाळ जोडलेले पाकिस्तानी हिंदू महाकुंभात

प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभात जगाच्या कानाकोपऱ्यातून भाविक त्रिवेणी संगमात स्नान करण्यासाठी येत आहेत. महाकुंभात आतापर्यंत ४१ कोटी भाविकांनी स्नान केल्याची माहिती आहे. त्याच अनुषंगाने सनातनवर श्रद्धा असलेले पाकिस्तानातील हिंदू बांधवही महाकुंभात पवित्र स्नानासाठी पोहोचले आहेत. पाकिस्तानच्या सिंध आणि पंजाब प्रांतातील ६८ हिंदू भाविकांचा समूह प्रयागराज येथे आला आहे. महाकुंभाची व्यवस्था आणि भव्यता पाहून सर्व पाकिस्तानी भाविक भारावून गेले होते.



महाकुंभ हा केवळ सनातन श्रद्धेचाच नव्हे, तर धर्म आणि अध्यात्माचा जगातील सर्वांत मोठा कार्यक्रम आहे. भक्तांसोबत आलेल्या रामनाथ यांनी सांगितले की, यापूर्वी सर्वजण हरिद्वारला गेले होते. तिथे त्यांनी सुमारे ४८० पूर्वजांच्या अस्थिकलशांचे विसर्जन केले. त्यांच्या आत्म्याला सद्गती प्राप्त होण्यासाठी प्रार्थना केली.

पाकिस्तानातून आलेले भाविक म्हणतात की, सनातनच्या श्रद्धेचा धागा आणि महाकुंभात स्नान करण्याच्या इच्छेने त्यांना येथे खेचून आणले. त्यांची अनेक वर्षांची ही इच्छा होती, पण त्यांच्या पूर्वजांचीही अशी आशा होती की, त्यांनी कुंभमेळ्यात सहभागी होऊन त्रिवेणी संगमात पवित्र स्नान करावे. सनातन आस्थेच्या दिव्य आणि भव्य कार्यक्रमात सहभागी होण्याचा बहुमान मिळाल्याबद्दल भारत सरकार आणि उत्तरप्रदेश सरकारचे आभार.

# 'आरोग्य मुख कुंभा'चे उद्घाटन

**'एआय'च्या साहाय्याने कर्करोगाचे निदान**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह डॉ. कृष्णगोपाल यांनी प्रयागराज येथे 'नेत्र कुंभ' संकुलात 'आरोग्य मुख कुंभा'चे उद्घाटन केले. याठिकाणी एक महिन्यापर्यंत तोंडाच्या कर्करोगाची प्राथमिक स्तरावर आर्टिफिशियल इंटेलिजेंसच्या माध्यमातून तपासणी केली जाईल.

आरोग्य मुख कुंभाच्या उद्घाटनानंतर डॉ. कृष्णगोपाल यांनी हे आरोग्य केंद्र सर्वसामान्यांसाठी खूप फायदेशीर ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी एम्सच्या कर्करोग विशेषज्ज्ञ डॉ. दीपिका मिश्रा आणि इतर वरिष्ठ डॉक्टर उपस्थित होते. महाकुंभ नगरमधील सेक्टर ६ येथील बजरंगदास मार्गावरील नेत्र कुंभच्या सेमिनार हॉलमध्ये आरोग्य मुख कुंभाचे उद्घाटन करण्यात आले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरू आणि ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य मुख कुंभ महिनाभर चालणार आहे. येथे देशातील नामवंत कर्करोग विशेषज्ज्ञ आणि शास्त्रज्ञ आपली सेवा देतील.

नेत्र कुंभ आयोजन समितीचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रवीण रेड्डी यांनी सांगितले की, मुख कुंभात प्राथमिक स्तरावर रुग्णांची तोंडाच्या कर्करोगाची तपासणी केली जाणार आहे. सोबतच त्याचा डेटाही तयार केला जाणार आहे, जेणेकरून कॅन्सरच्या रुग्णांवर उपचार सर्व माहिती डॉक्टरांना उपलब्ध होईल.

आयोजक समितीच्या माध्यम समन्वयक डॉ. कीर्तिका अग्रवाल यांनी सांगितले की, मुख कुंभात तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे लोकांच्या आरोग्यावर काय परिणाम होतो, याचाही अभ्यास केला जाणार आहे. तंबाखूचे सेवन हे तोंडाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण आहे.




## महाकुंभात महाजामसारखी स्थिती

महाकुंभात भाविकांची अलोट गर्दी होत आहे, वाहतूक ठप्प होत आहे. प्रयागराजला जोडणाऱ्या रस्त्यांवर अनेक किलोमीटरपर्यंत महाजामची स्थिती दिसते. भाविकांची गर्दी व व्हीआयपींची ये-जा यामुळे मार्ग काढणे सातत्याने आव्हानात्मक ठरत आहे. जाममुळे १० किलोमीटर चालण्यासाठी तासन्तास खोळंबा होत आहे.

महाकुंभात पोलिसांनी भाविक तसेच वक्त्यांवर लाठी चालवल्याचे पहिल्यांदाच घडले आहे. त्यामुळेच अलाहाबाद उच्च न्यायालयाने वाहतुकीचा खोळंबा व भाविकांच्या गैरव्यवस्थेवर नाराजी व्यक्त केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून वाहतूक व्यवस्थेवर १४ फेब्रुवारीपर्यंत शपथपत्र मागवले. वाहतुकीच्या नावाखाली अकारण बॅरिकेडिंग का केली, असे कोर्टाने विचारले.

**अलोट गर्दीचे हेही कारण**

२९ जानेवारीच्या चेंगरोचेंगरीनंतर सरकारने भाविकांच्या मनातील भीती प्रचार-प्रसारातून घालवली. ५ तारखेपासून आखाडे परतू लागले. म्हणूनच संतांच्या दर्शनाची भाविकांना घाई झाली आहे. गर्दी पाहून अनेकांनी ५ फेब्रुवारीनंतर येण्याचे ठरवले. यातून पुन्हा संगमावर गर्दी पाहायला मिळते. हवामान बदलून थंडी कमी होताच लोक वाढले.

## नागा साधूंनी अनुभवला क्रिकेटचा थरार

प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यात साधूंचा क्रिकेट खेळतानाचा व्हिडीओ सध्या धुमाकूळ घालत आहे. धार्मिक विधी आणि श्रद्धेच्या वातावरणात हा हलकाफुलका क्षण लोकांना अतिशय आवडत आहे. एक्सवर जितेंद्र प्रतापसिंग यांनी हा व्हिडीओ शेअर केला असून, त्यात साधू क्रिकेटचा आनंद घेताना दिसत आहेत. काही साधू बॅटिंग करीत आहेत तर काहीजण फिल्डिंग आणि बॉलिंग करताना दिसतात. चौकार आणि षटकारांचा वर्षाव पाहून गर्दीत जमलेले लोकही जल्लोष करीत आहेत. नेटकऱ्यांनी यावर सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत. बहुतांश लोकांनी यावर आनंद व्यक्त केला. यापेक्षा चांगले काय असू शकते, असेही काहींनी लिहिले आहे.

## चित्रपट वार्ता

### श्रुती हासनने मोडलेल्या नाकासह केला पहिला चित्रपट



मुंबई : अभिनेत्री श्रुती हासन अनेकदा तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल उघडपणे बोलत असते. एका मुलाखतीत तिने तिच्या नाकाच्या शस्त्रक्रियेबद्दल आणि फिलर्सबद्दल सांगितले. ती म्हणाली की, तिने नाकाची शस्त्रक्रिया केली असेल, तर त्यात काय चूक आहे? श्रुतीने कबूल केले की, तिला फिलर्स आणि नाकाची शस्त्रक्रिया करावी लागली होती, जी दुखापतीनंतर आवश्यक होती. जेव्हा ती चित्रपटसृष्टीत आली, तेव्हा तिचे नाक मोडले होते; परंतु अनेकांनी ते निमित्त मानले. आधी माझे नाक मोडले आणि वेगळे होते. मी माझा पहिला चित्रपट शस्त्रक्रियेशिवाय केला, तेव्हा लोक म्हणायचे की, मी डिविएटेड सेप्टमचे निमित्त करीत आहे. पण, माझ्या नाकात एक डिविएटेड सेप्टम होता आणि तो खूप वेदनादायक होता. मी ते सुंदर बनवू शकत होते आणि मी ते बनवले.

### फराह म्हणाली, पहिल्या भेटीत पतीला गे समजले!



**मुंबई** : कोरिओग्राफर फराह खानने खुलासा केला आहे की, जेव्हा ते पहिल्यांदा भेटले, तेव्हा तिने शिरीष कुंदरला समलैंगिक समजले होते. यामुळे तिला शिरीषचा खूप तिरस्कार होता. नंतर दोघांची मैत्री झाली आणि त्यांनी लग्न केले. अलिकडेच फराह अर्चना पूरण सिंगच्या व्लॉगमध्ये दिसली. अर्चनाने फराहला शिरीषसोबतच्या तिच्या भेटीबद्दल विचारले, तेव्हा ती म्हणाली, मला त्याचा तिरस्कार होता. पाच महिने मला तो समलैंगिक वाटला. यावर अर्चनाने गमतीने विचारले, तुला अजूनही शिरीषचा तिरस्कार आहे का? फराह हसली आणि म्हणाली, नाही, मला आता त्यांची सवय झाली आहे. आम्हाला एकत्र राहून २० वर्षे झाली. सुरुवातीला तो रागावायचा. जेव्हा तो रागावायचा, तेव्हा तो गप्प बसायचा आणि बोलत नसायचा; यामुळे त्याला खूप वेदना होत असत.

### शेतावर राहण्याचा मृण्मयीचा खर्च नगण्य

**मुंबई** : मृण्मयी देशपांडे आणि तिचा पती स्वप्निल राव यांनी शेती घेतली असून, ते बहुतांश काळ तिथेच घालवतात. दोघेही विविध प्रकारची पिके घेत असतात. त्याविषयी एका मुलाखतीत मृण्मयीने सांगितले की, शेतात आल्यानंतर आमचा जो आठवड्याचा खर्च आहे, तो जवळजवळ ५००-६०० रुपये आहे. महिन्यात आम्ही २००० रुपयांत आनंदात जगतो. गेल्या पाच वर्षांत मला आठवत नाही की, मी वारंवार कपडे विकत घेतले. माझा वर्षाचा कपड्यांचा खर्च जवळजवळ २० हजार रुपये असेल. माझ्या प्रोफेशनला हा खर्च नगण्य आहे. त्याव्यतिरिक्त मला काही लागतच नाही, असे म्हणत अभिनेत्रीने तिचा महिन्याचा खर्च सांगितला. त्यांनी त्यांच्या शेतीविषयीदेखील माहिती दिली. एकाचवेळी ते विविध प्रकारची उत्पादने घेत असल्याचे म्हटले. स्ट्रॉबेरीसह विविध इतर फळे, फळभाज्या, कांदा, झेंडू, माठ, लसून, मिरची अशी विविध उत्पादने घेत असल्याचे या जोडप्याने सांगितले. त्यांनी सेंद्रिय पद्धतीने शेती करण्यास सुरुवात केली आहे.



## अग्रलेख...

# ...अखेर कमळाचा वनवास संपला


लोकचळवळीतून उभ्या राहिलेल्या पक्षाला आपल्या उद्देशाचा विसर पडला आणि इतर पक्षांसारखेच आपण वागू लागलो, तर लोकांचा भ्रमनिरास होतो, याचेही भान न राहिलेल्या आम आदमी पार्टीला दारुण पराभवाचे तोंड पाहावे लागले आहे. त्यामुळे लोक मग मूळ पक्षाकडे वळतात, हा दिल्लीच्या निकालाचा अर्थ आहे. भाजपाच्या विरोधात एकत्र आलेल्या पक्षांना आपण एकत्र कशासाठी आलो, याचे भान राहिले नाही. पराभव भाजपाचा करायचा की आघाडीतील पक्षांचा, याचे तारतम्य राहिले नाही. बेडकाचा फुगून बैल होत नसतो, याचा विसर 'इंडिया' आघाडीच्या नेत्यांना पडला. 'आप' आणि काँग्रेस एकमेकांविरुद्ध लढले, एकमेकांसोबत आले आणि परत परस्परांविरोधात लढले आणि त्यातच संपले. आताही दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसमुळे 'आप'च्या अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया यांच्यासह १० नेत्यांचा पराभव झाला. मध्यमवर्गीयांच्या चेहऱ्यांवरून 'आप'चा उदय झाला आणि तो राष्ट्रीय पक्ष झाला. त्याच मध्यमवर्गीयांनी 'आप'ला धडा शिकवला. योगेंद्र यादव, प्रशांत भूषण, कुमार विश्वास यांच्यासह अन्य नेत्यांना अक्षरशः हाकलून लावले. मारामाऱ्या झाल्या. स्वाती मालिवाल यांचे ताजे उदाहरण तसेच आहे. १२ वर्षांच्या सत्तेमुळे मतदारांत झालेली नाराजी आणि 'आप'च्या नेत्यांचे उर्मट, आढ्यताखोर वर्तन यामुळे 'आप'ला पराभव पत्करावा लागला. यापूर्वी गुजरातमध्ये काँग्रेस 'आप'ला 'मत कटवा' पक्ष म्हणत होती. आता तीच भूमिका काँग्रेसने निभावली. केजरीवाल यांच्याबाबतीत कालचक्र १२ वर्षांनी फिरले. शीला दीक्षित यांनाच थेट आव्हान देऊन निवडून आलेले केजरीवाल यांना मद्यधोरण आणि त्यांचा शीशमहल नडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'आप'चा उल्लेख 'आपदा' असा केला होता. ही 'आपदा' दिल्लीकरांनी दूर केली. गैरव्यवहाराचे आरोप असलेले 'आप'चे बहुतांश नेते पराभूत होत असताना दिल्लीच्या मावळत्या मुख्यमंत्री आतिशी मात्र विजयी झाल्या. 'आप'चा गडही गेला आणि सिंहही गेला, अशी स्थिती आहे. दिल्लीच्या विधानसभा निवडणुकीबाबत यावेळी प्रथमच बहुतांश मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्ष बरोबर आले असून, काँग्रेसला मात्र गेल्या १२ वर्षांत खाते उघडता आले नाही. यावेळी झालेली दिल्ली विधानसभा निवडणूक आम आदमी पक्षासाठी प्रतिष्ठेचा विषय होती. गेल्या वर्षीच केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता आणि आतिशी यांच्याकडे कमान सोपवली होती. यावेळी प्रचारादरम्यान भाजप अधिक बोलका होता. भ्रष्टाचाराविरुद्धच्या चळवळीतून उदयास आलेल्या पक्षावर घोटाळ्याचे गंभीर आरोप झाले. व्हीआयपी संस्कृती नाकारणारे अरविंद केजरीवाल शीशमहालच्या मुद्यावर अडकले.

भाजपा २७ वर्षांनी येथे पुन्हा सत्तेत येत आहे. २७ वर्षांपूर्वी भाजपाच्या सुषमा स्वराज ५२ दिवस दिल्लीच्या मुख्यमंत्री होत्या. केजरीवाल यांच्या राजीनाम्यानंतर आतिशी यांनी दिल्लीच्या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. केजरीवाल यांच्या राजीनाम्यानंतर दिल्ली निवडणुकीचे चित्र बदलले. भाजप बोलका झाला. त्याच वेळी, काँग्रेसनेही अशा पद्धतीने तिकिटे वाटली की, आम आदमी पक्षाला अनेक निवडणुका सहज जिंकता आल्या नाहीत. केजरीवाल यांनी सलग तीन वेळा दिल्लीत आम आदमी पक्षाचे सरकार स्थापन केले. त्यांच्या सरकारच्या लोकाभिमानी धोरणांमुळे ते सत्तेत राहिले. संपूर्ण पक्ष केजरीवालांभोवती फिरत होता; परंतु दिल्लीच्या दारू धोरणाशी संबंधित एका प्रकरणात अटक आणि तुरुंगवास झाल्यानंतर, सप्टेंबर २०२४ मध्ये त्यांची सुटका झाल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. सत्येंद्र जैन आधीच तुरुंगात गेले होते. त्याच वेळी माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया आणि संजय सिंह यांनाही बराच काळ जामीन मिळू शकला नव्हता. आम आदमी पक्षाच्या मोठ्या नेत्यांचे तुरुंगात जाणे आणि न्यायालयीन अटींमुळे बांधील होणे ही निवडणुकीपूर्वीची एक मोठी कलाटणी होती. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे भ्रष्टाचाराविरुद्धच्या चळवळीतून उदयास आलेल्या केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षावर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले. केजरीवाल नेहमीच 'व्हीआयपी' संस्कृतीवर प्रश्न उपस्थित करत आले आहेत; परंतु यावेळी त्यांच्यावर शीशमहालबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. भाजपा आणि काँग्रेसने 'आप'ला घेरले. मोफत योजना हा सर्वांत मोठा फायदा होता; पण प्रत्येकाने हा जुगार खेळला. दिल्लीत 'आप'च्या लोकप्रियतेचे प्रमुख कारण मोफत वीज आणि पाणी यासारख्या योजना मानल्या जाऊ शकतात. या निवडणुकीपूर्वी भाजप मोफतच्या घोषणांविरुद्ध आवाज उठवत होता. केजरीवाल यांनी या वस्तुस्थितीचा फायदा घेतला आणि देशभरात मोफत वीज आणि वैद्यकीय उपचारांसारखे मुद्दे उपस्थित केले; परंतु निवडणुकीत भाजपानेही 'आप'सारखीच चाल खेळली आणि महिला, मुले, तरुण आणि अगदी ऑटोरिक्षा चालकांसाठी निवडणूक आश्वासनांमध्ये मोठ्या घोषणा केल्या. यासोबतच काँग्रेसनेही अशीच आश्वासने दिली. त्यामुळे 'आप'साठी आव्हान वाढले. भाजपाने शीशमहाल वाद धाडसीपणे उपस्थित केला. दिल्लीतील मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान आलिशान पद्धतीने बांधण्याचा आणि त्यावर कोट्यवधी रुपये खर्च करण्याचा मुद्दा भाजपाने उपस्थित केला. भाजपाने या मुद्यावर अनेक पोस्टर्स जारी करून केजरीवाल यांना घेरले. काँग्रेसनेही हा मुद्दा उपस्थित केला. देशाच्या संसदेतही पंतप्रधान मोदी यांच्यासह अनेक नेत्यांनी या मुद्यावरून 'आप'ची कोंडी केली. यमुनेची स्वच्छता, रस्ते आणि पाणी साचणे यासारख्या मुद्यांवरूनही 'आप' अडचणीत आला होता. केजरीवाल यांनी यमुनेच्या विषारी पाण्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी यासाठी हरयाणा सरकारला जबाबदार धरले. याला प्रत्युत्तर देत हरयाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांनी यमुनेचे पाणी प्यायले. निवडणूक आयोगानेही या मुद्यावर केजरीवाल यांना कठीण प्रश्न विचारले. याशिवाय, दिल्लीतील खराब रस्ते आणि पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या यामुळेही केजरीवाल यांच्या अडचणी वाढल्या. या मुद्यावरून भाजपा आणि काँग्रेस दोघांनीही केजरीवाल आणि 'आप' यांना घेरले. भाजपाने पावलापावलावर केजरीवाल आणि त्यांच्या पक्षाला लक्ष्य केले. शेतकऱ्यांच्या हिताचे काम असो किंवा आयुष्मान योजना; केंद्राचा प्रत्येक उपक्रम दिल्लीतील 'आप' सरकारने लागू न केलेल्या योजनेचे इतर राज्यांना होणारे फायदे भाजपाने दिल्लीतील लोकांना सांगितले. भाजपाने 'आप'च्या विरोधी वृत्तीला 'आपत्ती' म्हटले. या निवडणूक घोषणेसह भाजपाने 'आप'ला आव्हान दिले. गेल्या दोन विधानसभा निवडणुकांत काँग्रेसला एकही जागा जिंकता आलेली नाही. लोकसभेत विरोधी एकतेचा नारा देऊन भाजपाला आव्हान देणारे 'आप' आणि काँग्रेस विधानसभा निवडणुकीत वेगळे झाले. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने आपली सर्व ताकद पणाला लावली. त्याचा परिणाम निकालांवर दिसून येतो. काँग्रेसच्या मतांच्या टक्केवारीत वाढ झाल्यामुळे 'आप'ला तोटा सहन करावा लागत असल्याचे दिसून आले आहे. २०१५ मध्ये ६७ जागांसह दणदणीत विजय मिळविणारा आम आदमी पक्ष अवघ्या १० वर्षांनी दिल्लीत सत्तेबाहेर पडला. केजरीवाल यांचा पक्ष भ्रष्टाचारविरोधी चळवळीतून उदयास आला; परंतु अवघ्या १० वर्षांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप लावण्यात आले. दारू घोटाळ्यात केजरीवाल, सिसोदिया आणि संजय सिंह यांना तुरुंगातही जावे लागले. 'आप'वर केलेल्या गंभीर आरोपांची कहाणी पक्षाला संपवता आली नाही. याशिवाय, 'कॅग'च्या अहवालातही आपवर रुग्णालय बांधकाम इत्यादींमध्ये भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. कॅगच्या अहवालावर चर्चा करण्याऐवजी आपने तो दडवण्याचा प्रयत्न केला. केजरीवाल फक्त लाभार्थी मतदारांवर अवलंबून होते. गेल्या दोन निवडणुकांमध्ये केजरीवाल मोफत वीज आणि पाण्याद्वारे आपले राजकारण पुढे नेत होते. हे लाभार्थी मध्यम आणि कनिष्ठ वर्गातील होते. दिल्लीच्या लढाईपूर्वी भाजपाने या मतदारांना आकर्षित करण्यात यश मिळविले. पक्षाने १२ लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त करून केजरीवाल यांच्यावर कडी केली. गेल्या दोन निवडणुकांमध्ये आम आदमी पक्षाला मुस्लिम आणि दलितबहुल भागात मोठा विजय मिळाला होता; परंतु यावेळी दोन्ही भागांत हे मतदार 'आप'पासून दूर गेले. ▌▌

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# अमेरिकेचे 'ट्रम्प कार्ड'



बर्नार्ड लेविस हा ब्रिटिश-अमेरिकन इतिहास अभ्यासक. १०१ वर्षे जगलेल्या बर्नार्डने अमेरिकेत एक मार्मिक टिप्पणी केली होती, 'अमेरिकेशी शत्रुत्व घेणे धोकादायक आणि अमेरिकेशी मैत्री करणे घातक!' बर्नार्डच्या या एका विधानाची प्रचीती राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प जणू करून देत आहेत आपल्या शत्रूंना आणि मित्रांनाही. राष्ट्रपतिपदाची सूत्रे हाती घेत, केवळ तीन आठवड्यांच्या आत त्यांनी आपल्या मित्रांविरुद्ध आणि शत्रूविरुद्धही व्यापारयुद्ध सुरू केले आहे आणि ते आता लष्करी युद्ध सुरू करण्याच्या तयारीत आहेत.

**भारत आणि कॅनडा** : भारत आणि कॅनडा हे अमेरिकेचे मित्रच. पहिल्या दिवसापासून त्यांनी या दोन्ही देशांना धमकावणे सुरू केले. आता तर कॅनडाच्या विरोधात २५ टक्के शुल्क लावण्याची घोषणाही केली. नंतर त्यांनी आपला निर्णय महिनाभरासाठी स्थगित केला. कॅनडा-अमेरिका सीमा जगातील सर्वांत मोठी सीमा मानली जाते. कॅनडा हा एक प्रकारचा अमेरिकेचा जिवलग मित्र. पण, ट्रम्प यांनी त्याच्या विरोधातही २५ टक्के शुल्क लावण्याची घोषणा केली म्हणजे कॅनडातून अमेरिकेत येणाऱ्या सर्व वस्तू २५ टक्क्यांनी महाग होणार. याला कॅनडाने प्रत्युत्तर दिले आहे. त्यानेही अमेरिकन वस्तूंवर शुल्क लावण्याची घोषणा केली. या व्यापारयुद्धाचा फटका कॅनडाला कमी व अमेरिकेला जादा बसण्याची शक्यता आहे. मोटारी, मोटारींचे सुटे भाग याचे अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. या एकूण उत्पादनांपैकी ५५ टक्के उत्पादन कॅनडा-मेक्सिको या दोन देशांमध्ये निर्यात केले जाते. म्हणजे या वस्तूंच्या किमती २५ टक्के वाढणार! याने अमेरिकेचा मोटार उद्योग हादरला आहे. मेक्सिको-कॅनडातील आपली बाजारपेठ जपान, दक्षिण कोरिया या देशांनी काबीज केली तर? अमेरिकन मोटार उद्योग जगत या प्रश्नाच्या उत्तराने गारठला आहे. हीच बाब कृषिक्षेत्राबाबत आहे. ट्रम्प यांनी कृषी उत्पादनांवरही २५ टक्के शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेला लागणाऱ्या कृषी उत्पादनांपैकी २३ टक्के पुरवठा एकट्या मेक्सिकोतून होतो. त्यावर आता मेक्सिको २५ टक्के शुल्क आकारणार आहे.

**कारण मादक द्रव्यांचे** : कॅनडा व मेक्सिकोतून अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर मादक द्रव्यांची चोरटी आयात होते. त्याच्या विरोधात आपले हे निर्णय असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. यावर या देशांचा युक्तिवाद आहे, 'जोवर 'मागणी' तोवर 'पुरवठा' हे चालू राहणार आहे. अमेरिकेत मादक द्रव्यांची मागणी वाढत आहे आणि त्याचा पुरवठा कॅनडा व मेक्सिको या दोन सीमेलगतच्या देशांमधून होत आहे. ही बाब काही नवी नाही. मागील अनेक दशकांपासून हे सुरू आहे. यात आमचा काय दोष असा या देशांचा सवाल आहे.

**कॅनडा-अमेरिका विलीनीकरण** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी एकीकडे कॅनडावर २५ टक्के शुल्क लावण्याचा आदेश जारी केला आहे. दुसरीकडे ते कॅनडाला अमेरिकेत सामील होण्याचे निमंत्रण देत आहेत. त्यांच्या या भूमिकेने कॅनडाही हैराण झाला आहे. कॅनडाने अमेरिकेचे ५१ वे राज्य व्हावे, असे निमंत्रण ट्रम्प वारंवार देत आहेत.

**भारत-चीन** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी मेक्सिको-कॅनडा या मित्र राष्ट्रांवर २५ टक्के शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला असताना, चीन या अमेरिकेसाठी 'शत्रुराष्ट्रा'वर मात्र फक्त १० टक्के शुल्क लावण्याचा निर्णय घेतला.

**भारताला इशारा** : 'ब्रिक्स' संघटनेच्या सभासद देशांनी 'डॉलर'ला प्रतिसाद देण्यासाठी एखादे नवे चलन सुरू करण्याचा प्रयत्न केल्यास या देशांविरुद्धही 'टेरिफ' नावाने हत्यार उपसले जाईल, असा इशारा राष्ट्रपती ट्रम्प वारंवार देत आहेत. भारत, रशिया, चीन, दक्षिण आफ्रिका, ब्राझील हे 'ब्रिक्स' चे संस्थापक सदस्य देश आहेत.

**रुपया घसरला** : राष्ट्रपती ट्रम्प यांच्या या धमक्यांचा परिणाम म्हणजे भारत, कॅनडा, मेक्सिको, कॅनडा या देशांचे चलन-डॉलरच्या तुलनेत घसरले. रुपयाची मागील काही महिन्यांत जी घसरण सुरू आहे, ती अधिक वेगवान झाली. ८६ रुपयांवरून ८७ रुपये प्रती डॉलर हा प्रवास रुपयाने फार कमी वेळात पूर्ण केला. याचा अर्थ डॉलर रुपया विनिमय दर लवकरच एका डॉलरसाठी ९० रुपये झालेला असेल, असे तज्ज्ञांना वाटते. म्हणजे याचाही थोडा फार विपरीत परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर झालेला असेल.

**नवी चिंता** : जगाच्या अर्थकारणाला भेडसावणारी नवी चिंता म्हणजे पनामा कालवा ताब्यात घेण्याची राष्ट्रपती ट्रम्प यांची प्रबळ इच्छा. पनामा कालवा अमेरिकेने अमेरिकेच्या हितासाठी बांधला होता. आज हा कालवा चीनच्या हितासाठी- व्यापारासाठी वापरला जात आहे आणि ही बाब अमेरिकेला मान्य नाही, असे प्रतिपादन ट्रम्प वारंवार करीत आहेत. मात्र, आता त्यांनी एक पाऊल पुढे टाकत यासंदर्भात लवकरच मोठी कारवाई झालेली असेल, असे म्हटले आहे. राष्ट्रपती ट्रम्प लष्करी बळाचा वापर करून हा कालवा ताब्यात घेणार काय, असा प्रश्न त्यांच्या विधानांनी उपस्थित केला आहे. ट्रम्प यांची वाटचाल पाहता ते असा निर्णय करू शकतात.

**चीन बळकट होणार?** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी घेतलेले निर्णय पाहता जागतिक राजकारणात चीनची स्थिती बळकट होऊ शकते, असे मानले जाते. माजी राष्ट्रपती बायडेन यांनी अमेरिकेच्या समर्थक देशांना एकत्र बांधून ठेवले होते. बायडेन यांच्या कार्यकाळात 'नाटो' ही संघटना केवळ बळकटच झाली नाही तर या संघटनेचा विस्तारही झाला. राष्ट्रपती ट्रम्प यांना 'नाटो'ची भूमिकाही मान्य नाही. युक्रेनने रशियाशी युद्ध न पत्करता शरणागती पत्करावयास हवी होती, असे त्यांनी वारंवार म्हटले आहे. म्हणजे अमेरिकेने आपल्या मित्रराष्ट्रांना झिडकारल्यास, 'नाटो'ला नाकारल्यास रशिया-चीन यांचे फावणार आहे. रशिया-चीन या दोन साम्यवादी-हुकूमशाही देशांवर नियंत्रण ठेवण्याची व जागतिक सत्ता संतुलन कायम ठेवण्याची भूमिका अमेरिकेने बजावावी, असे या देशाकडून अपेक्षित होते. पण, राष्ट्रपती ट्रम्प यांच्या कार्यकाळाचा प्रारंभ पाहता अशी अपेक्षा करणे चुकीचे ठरणार आहे.

**वादग्रस्त मस्क** : अमेरिकेच्या राजकारणात येऊ घातलेल्या नव्या वादळाची बीजे ट्रम्प यांनी रोवली आहेत असे दिसते. त्यांचे सल्लागार की मित्र उद्योगपती ॲलन मस्क यांची कार्यपद्धती अतिशय वादग्रस्त ठरणार आहे. व्हाईट हाऊसची संवेदनशील माहिती मस्क यांना कशी काय मिळत आहे, असा प्रश्न आता विचारला जाऊ लागला आहे. ट्रम्प यांच्या विरोधातील काही प्रमुख वार्ताहरांना त्यांच्या पदावरून हटविले जाऊ लागले आहे. हा सारा घटनाक्रम अमेरिकेसाठी व जगासाठी शुभ मानला जात नाही. राष्ट्रपती ट्रम्प यांनी मस्क यांच्याकडे एक विशिष्ट काम सोपविले असले, तरी ते स्वतःला त्यापुरते मर्यादित ठेवतील, असे होताना दिसत नाही. त्यांनी जारी केलेले काही आदेश यापूर्वीच वादग्रस्त ठरले आहेत. ज्या काही कर्मचाऱ्यांना बरखास्त करण्याचे आदेश मस्क यांनी जारी केले, त्यांनी ते आदेश मानण्यास नकार दिला आहे. अमेरिकेत अशी स्थिती कधी उद्‌भवली नव्हती.

**मोकाट सांड?** : राष्ट्रपती ट्रम्प यांची सध्याची स्थिती मोकाट सांडासारखी आहे. त्यांना पुन्हा निवडणूक लढवायची नाही. त्यांच्यावर अन्य कोणतीही बंधने वा निर्बंध नाहीत. घटनात्मक शिष्टाचारांचे पालन करण्याची त्यांची मानसिकता नाही आणि त्यांना वेसण घालण्याची कुणाची ताकद नाही. आता ट्रम्प किती आणि कसे उधळणार, एवढाच प्रश्न बाकी आहे. यातून जो धुराळा उडत आहे, त्याने जागतिक समीकरणांच्या सीमारेषा धूसर-पुसट झाल्या *(पान ५ वर)* ▶

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# सज्जनांचे तारणहार पोलिस तणावात!

जितक्या अपेक्षा कमी त्या प्रमाणात मनाला अधिक शांतता लाभते. पण प्रत्यक्षात पृथ्वीतलावरील माणूस अपेक्षांच्या चक्रव्यूहात फसला आहे. त्याने कुवतीपेक्षा जास्त अपेक्षा करणे सुरू केले आहे. येथेच सर्व गणित चुकत आहे. याच चुकलेल्या गणितामुळे मग मनाचे संतुलन बिघडते आणि माणूस तणावात राहतो. 'सद्‌रक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीद स्वीकारून सामान्य जनतेच्या सुरक्षेसाठी ३६५ दिवस आणि चोवीस तास कार्यरत पोलिस यंत्रणेतील बहुतांश कर्मचारी, अधिकारी चक्क तणावात वावरत आहेत. याच तणावात आलेल्या काही पोलिसांनी चक्क आत्महत्येचा सोपा मार्ग निवडला. वस्तुतः पोलिस म्हणजे अनेकांसाठी तारणहार आहेत. मग हेच तारणहार, सज्जनांसाठी संकटमोचकांनी आत्महत्येचा सोपा मार्ग का निवडला.

ज्यांनी आत्महत्या केली ते कर्जाच्या विळख्यात अडकले होते. तर काहींनी शेअर्स बाजारात गुंतवणूक केल्याचेही समोर आले आहे. एकाने भूखंड खरेदी केला, पण विक्रीपत्रासाठी पैशाची जुळवाजुळव न झाल्याने त्याने आत्महत्या केली. तणावात असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना त्यावेळी ही कारणे खरोखरच महत्त्वपूर्ण वाटली असतील. पण त्यावर आत्महत्या हाच उपाय नव्हता. तसे पाहता कर्ज काढणे ही एक जड वस्तू डोंगरमाथ्यावरून खाली लोटून देण्याइतकं सोपे आहे. परंतु ते कर्ज फेडणे म्हणजे तीच वस्तू खालून डोंगरमाथ्यावर वाहून नेण्याइतके कष्टप्रद आहे. याची जाणीवच अनेकांना नाही. समजा ते त्यांना माहीत असेल तर त्यांना वाटते की, सरकारी नोकरी आहे ना, कुठूनही जुगाड करू आणि कर्ज फेडून टाकू. पण समोर भविष्यात आपल्या पुढ्यात काय वाढून ठेवले आहे, याचे त्यांना भानच नसते. अनेकांना श्रीमंती मिरवण्याचीही हौस असते. मात्र श्रीमंत होण्यापेक्षा गुणवंत होण्याचा प्रयत्न करायला हवा, तीच बाब ते कटाक्षाने टाळतात. पोलिस खात्यासह सरकारी नोकरीत असलेले १०० पैकी ९९ जण आज पैशाच्या मागे धावत आहेत. चांगला सातवा वेतन आयोगाचा पगार मिळत असतानाही एवढी पैशासाठी हाव का? याचेही आत्मचिंतन ते करायला तयार नाहीत. एक सांगतो, पैशाचे नाव अर्थ पण तो करतो मोठा अनर्थ. हाच फॉर्म्युला ते विसरल्याने त्यांच्या आयुष्यात तणावाचा शिरकाव झाला आहे. शिवाय घरात विनाकारणचे खर्चही त्यांनी वाढवून ठेवले आहेत. कुटुंबीयांनीही आपल्या अपेक्षा पोलिस खात्यात कार्यरत पित्यावर, मातेवर अक्षरशः लादल्या आहेत. त्याचीच प्रतिपूर्ती करताना संबंधितांची दमछाक होत आहे.

पूर्वजांनी आपल्याला बचतीचा मंत्र सांगितला. तो आपण अंधानुकरणाच्या नादात पायदळी तुडविला. शिवाय खर्चही वाढवण्यावर आपणच भर दिला. एक वाहन असताना आणखी गाड्या घेत आपण इंधनासह कर्जाचा हप्ता वाढविला. आता हेच पाहा ना. मनोरंजनासाठी भारत सरकारची डीटीएच फ्री टू एअर ही यंत्रणा कार्यरत आहे. पण आपण खाजगी कंपन्यांच्या मागे लागून दर महिन्याला पाचशे-हजार रुपयांचे पॅक घेऊन काय साध्य करीत आहोत. मोबाईलची खूप गरज असल्याचा आव आणत त्यातील नेटपॅकवर हजारो रुपयांची उधळपट्टी घराघरात सुरू आहे. थोडाफार बदल झाल्याचे पाहताच वारंवार महागडे हॅण्डसेट विकत घेतले जातात. घरात आईने आवडीची भाजी न केल्यास पटकन बाहेरून खाद्यपदार्थ बोलावले जातात. हे सर्व छोटे खर्च वाटतात, पण जेव्हा त्यांची गोळाबेरीज केली जाते, तेव्हा तो आकडा लाखांत जातो. मग डोळे उघडतात पण तोपर्यंत वेळ हातून गेलेली असते. याच स्वरूपातील अनेक खर्च सहजतेने टाळता येतात. मात्र ते न करता अधिक खर्च वाढविले जातात. कुटुंबातील सदस्यही कमावणाऱ्यांचा विचार करीत नाहीत. तसे पाहता मुला-मुलींनी येणारा पैसा किती, जाणारा किती आणि बचत नेमकी किती व्हावी याची गोळाबेरीज करायला हवी. प्रत्येक गोष्ट कमावणाऱ्यानेच करावी असा कुठे नियम आहे का? उत्तम व्यवहारे धन घ्यावे । उत्तम कार्यासाठी लावीत जावे । जेणे परस्परांचे कल्याण व्हावे । तैसेचि करावा व्यवहार ॥ ही शिकवण आपल्याला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी दिली. मग त्या शिकवणीचे काय? जेव्हा घराघरात असा विचार करून बचतीची सवय सर्वांना लागेल, तेव्हा कमावणारा तणावात येणार नाही. जेव्हा तणावच संपेल तेव्हा त्याच्या डोक्यात आत्महत्येचा विचारच येणार नाही. आपोआपच गरजा कमी होतील अन् तोही पैशाच्या मागे धावणार नाही. जेव्हा तो तणावात नसेल तेव्हाच कर्तव्याच्या माध्यमाने सर्वोत्तम अशी लोकसेवा करेल. आपल्याला सर्वोत्तम लोकसेवा करणारा आणि विशेष म्हणजे तणावमुक्त निरोगी सुदृढ मनाचा पोलिस दादा हवा आहे, नाही का? ▌▌

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# देशाला आधुनिक विश्वकर्मांची गरज



विश्वकर्मा हे देवांचे शिल्पकार होते. असे म्हणतात की, सोन्याची लंका त्यांनी बनवलेली होती. हीच लंका पुढे रावणाने कुबेराकडून हस्तगत केली. विश्वकर्मा हे प्रसिद्ध वास्तुशिल्पी होते. अनेकानेक भवनांचे, देवतांसाठी राजप्रासादांचे व पुष्पक विमानाचे निर्माण त्यांनी केलेले होते. जसे भारतामध्ये पूर्वी सिव्हिल इंजिनीअरिंग म्हणजे स्थापत्य अभियांत्रिकी ही एक शाखा होती, त्यानंतर अभियांत्रिकीच्या इतर शाखा निर्माण झाल्या तसेच प्राचीन काळी शिल्पकार हे सर्व प्रकारचे यंत्र आणि वास्तुशिल्प बनवायचे. आजही आपल्या देशामध्ये विश्वकर्मा जयंती साजरी केली जाते. कारखान्यांमध्ये विश्वकर्मांची पूजा करून प्रसाद वाटला जातो. सगळ्या कारागिरांचे, अभियंत्यांचे आदर्श विश्वकर्मा आहेत. त्यांनी निर्माण केलेले सर्व शिल्प लोककल्याणासाठी होते. त्यामुळे प्रत्येक श्रमजीवी माणसाने आपल्या अंगी असलेल्या कलागुणांच्या आधारावर लोककल्याणासाठी, समाजासाठी काम केले पाहिजे, अशा पद्धतीचा अर्थ यामागे आहे.

प्राचीन काळी भारतामध्ये बाराबलुतेदार अशी पद्धती होती. गाव हे स्वावलंबी होते. जगामध्ये यांत्रिक क्रांती झाली आणि वेगवेगळ्या पद्धतीच्या यंत्रांचा शोध लागू लागला. विविध प्रकारचे कारखाने सुरू झाले. हे कारखाने साधारणतः शहरांमध्ये होते. कारण शहरांपर्यंत रेल्वेचे जाळे पसरलेले होते. स्वातंत्र्यानंतर शहरांचा विकास अधिक तीव्र गतीने झाला. शहरांमध्ये कारखाने वसविण्यात आले. त्यामुळे गावखेड्यातील सर्वसामान्य तरुण काम मिळविण्यासाठी शहरात आला व तो शहरात राहू लागला. गवंड्याचा पोरगा शहरात आला, सुताराचा पोरगा शहरात आला अन् लोहाराचा पोरगाही शहरात आला. हळूहळू गावामध्ये असलेली बाराबलुतेदार पद्धती समाप्त होत गेली. शहरात तर ज्याला जो व्यवसाय वाटेल तो करीत होता. हळूहळू वंशपरंपरागत येणारे ज्ञान लोप पावत गेले. प्रत्येक पिढी स्वतःचा मार्ग शोधू लागली. वंशपरंपरेने येणारे ज्ञान पुढल्या पिढीला मिळण्याचा मार्ग बंद होत गेला. पूर्वी भारतामध्ये उत्तम शेती, मध्यम धंदा व कनिष्ठ नोकरी असे म्हटले जात होते. इंग्रजांच्या काळामध्ये त्यांनी केलेल्या विविध कामांसाठी त्यांना नोकरांची आवश्यकता निर्माण झाली. रेल्वे, टपाल खाते इत्यादीमध्ये मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या निर्माण होऊ लागल्या व थोडेफार शिकलेले लोक नोकरीमध्ये त्यावेळेस जाऊ लागले. यातून पुढे आई-वडील गावामध्ये व मुले नोकरीच्या ठिकाणी असे होत गेले. उत्तम नोकरी, मध्यम व्यवसाय आणि कनिष्ठ शेती असा क्रम झाला.

मागील १० वर्षांमध्ये मोदी सरकारने देशाची ही अडचण लक्षात घेऊन विविध प्रकारच्या योजनांवर काम करायला सुरुवात केली. कोरोनामध्ये चीनवरून अनेक देशांचा विश्वास उडाला. अनेक मोठमोठ्या कंपन्यांनी चीनमधून आपले बस्तान उचलायला सुरुवात केली. त्यांना एका सुरक्षित भूमीची आवश्यकता होती. त्यासाठी त्यांच्यासमोर व्हिएतनाम, भारत यांसारखे पर्याय होते. जमीन, वीज, पाणी याबरोबरच कुशल मनुष्यबळ ही त्यांची प्रमुख आवश्यकता आहे. भारत हा सध्यातरी तरुणांचा देश आहे. या तरुणांना जर कुशल बनविले गेले तर भारताचीच नाही तर जगाची सेवेची आवश्यकता हे तरुण पूर्ण करू शकतात.

वंशपरंपरेने चालू असलेले विणकाम, गवंडी काम, सुतार काम, लोहार काम हे सर्व नष्ट होऊ नये. त्यांनी आपापल्या व्यवसायाला समोर न्यावे यासाठी मोदी सरकारने प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना सुरू केली. यामध्ये गावखेड्यातील तरुणांना त्यांच्याच व्यवसायाचे परंतु आधुनिक यंत्रांचा उपयोग करून शिक्षण देण्यात येते. कौशल्य शिकविण्यात येते. त्यासाठी वित्त पुरवठा केला जातो. त्यांनी बनविलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते तसेच विक्री साहाय्य पुरविले जाते.

भारतासारख्या देशाला आपल्या करोडो लोकांच्या हाताला काम देणे हेच फार मोठे आव्हान आहे. त्यासाठी भारतामध्ये एक विश्वकर्मा विभाग निर्माण होणे आवश्यक आहे. भारतासारख्या एवढ्या मोठ्या देशामध्ये एकाच ठिकाणी देशासाठी वस्तू निर्माण होण्यापेक्षा देशाच्या विविध कानाकोपऱ्यात वस्तूंचे निर्माण होणे आवश्यक आहे. यामुळे व्यवसायाचे सृजन देशाच्या कानाकोपऱ्यात होईल. एकाच ठिकाणी मोठमोठे कारखाने लागल्यामुळे जिथे कारखाना आहे तिथे देशातील कामगार, अभियंते यांना एकत्र यावे लागते. लोक जर आपले गाव सोडून जिथे काम मिळते तिथे जाऊ लागले तर स्थानिक सभ्यता, संस्कृती, साहित्य, सण, रीतिरिवाज या सगळ्याच गोष्टींवर त्याचा परिणाम होतो. जुन्या गोष्टी नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो.

या सर्व समस्यांवर विश्वकर्मा विभाग हेच चांगले उत्तर आहे. स्थानिक विश्वकर्मांना स्थानिक स्तरावरच रोजगार मिळणे, त्यांनी तेथील जैवविविधता, परंपरा, वन उपज, भूमी उपज, खनिज या सर्वांच्या आधारावर आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करणे गरजेचे आहे. जर हे लोक तिथे राहिले व त्यांनी आपले वैशिष्ट्य टिकवून ठेवले तर जगासाठी ते एक आकर्षणाचे केंद्र राहील. भिवापूरमध्ये जर लोकांनी मिरची लावणे बंद केले तर काही दिवसांनी भिवापुरी मिरची नष्ट होऊ शकते. वायगावची हळद नष्ट होऊ शकते. रामटेकचे विड्याचे पान नष्ट होऊ शकते. जळगावची ओळख त्यांच्या केळींवरून राहणार नाही व नाशिकची ओळख द्राक्षांवरून राहणार नाही. जेथे जे पिकते ते विकण्याची व्यवस्था करणे फार गरजेचे आहे.

विश्वकर्मा हे सर्व कारागिरांचे दैवत आहे. म्हणजे त्याची पूजा करणारे लोक आमच्या देशात होते. आमचा देश हा शिल्पकलेचा, वास्तुकलेचा, विविध प्रकारच्या शोधांचा देश होता. विविध प्रकारच्या आक्रमकांमुळे, मुघलांच्या शासन काळामध्ये आणि इंग्रजांच्या शासन काळामध्ये अनेक गोष्टी नष्ट झाल्या. लोप पावल्या. आता पुन्हा एकदा विश्वकर्मांच्या देशामध्ये विश्वकर्माच्या पूजकांना म्हणजे कारागिरांना सन्मान देण्याची, काम देण्याची व त्यांनाही चांगले दिवस दाखविण्याची आवश्यकता आहे. ▌▌

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### आता तरी ट्रम्प यांचा कित्ता गिरवावा

अमेरिकेत ट्रम्प पुन्हा स्थानापन्न होताच त्यांनी अवैध परदेशी नागरिकांवर कठोर कारवाई करत त्यांच्या हकालपट्टीस जलदगतीने सुरुवात केलेली आहे. खरे तर अवैध मार्गाने आपली मायभूमी सोडून दुसऱ्या देशात घुसखोरी करणे हे अत्यंत चुकीचेच आहे. ट्रम्प यांच्या व्यक्तिमत्त्वाबाबत अनेक वादप्रवाद असले तरीही त्यांनी परदेशी अवैध घुसखोरांबाबत घेतलेली भूमिका मात्र निश्चितच स्वागतार्ह आहे. लोकांना रोजगार मिळवून देतो अशी खोटी आश्वासने देणारे दलाल आणि आपले सर्वस्व पणाला लावून विदेशात जाऊन भरपूर पैसा मिळवण्याचे स्वप्न बाळगणारे मूर्ख लोकही याला जबाबदार आहेत. आपल्या देशातही वर्षानुवर्षे सीमारेषा ओलांडून आलेले लगतच्या देशातील घुसखोर नागरिक असंख्य आहेत. या संबंधात फक्त मतपेट्यांचे राजकारण होते आणि सोयीनुसार भूमिका घेतली जाते. आताही घुसखोर नागरिकांबाबत काँग्रेस कशी जबाबदार आहे याविषयी सत्ताधाऱ्यांकडून फक्त टीकेचे राजकारण सतत सुरू असते. २०१४ नंतर अखंड सत्ता भाजपाला मिळाली आहे हे वास्तविक सगळ्या राष्ट्रभक्तांसाठी अभिमानास्पद आहे. म्हणून आतातरी अमेरिकेत ट्रम्प यांनी परदेशी घुसखोरांबाबत घेतलेल्या कणखर भूमिकेचा आपणही कित्ता गिरवणे आवश्यक आहे.

**राम राजे**/९४२१७७९९४५

●● ●●

### म्हणे, मोदी दिल्ली जिंकू शकणार नाहीत...

दिल्ली विधानसभा निवडणुकीनंतर आलेल्या बहुतांश सर्वेक्षणातून भारतीय जनता पक्षास स्पष्ट बहुमताचे संकेत होते. आणि मतमोजणीतून हे सारे अंदाज खरे ठरले. मुळात अण्णा हजारे यांच्या आंदोलनातून वेगळे होऊन आम आदमी पक्षाचा जन्म झाला हा इतिहास संपूर्ण देशासमोर आहे. काही तरी वेगळे करून दाखवण्याचे स्वप्न लोकांसमोर ठेवत आम आदमी पक्षाने सत्ता प्राप्त केली. अल्पावधीतच पक्षास मोठे यश मिळाले, सलग तीन वेळा अरविंद केजरीवाल मुख्यमंत्री झाले. परंतु याच आम आदमी पक्षाचा प्रमुख केव्हा खास झाला हे कळलेच नाही. काही महिन्यांपूर्वीच भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली केजरीवाल यांना तुरुंगात जावे लागले, स्वतःची आम आदमी अशी प्रतिमा लोकांसमोर ठेवणाऱ्या केजरीवालांचे शीशमहल देशभरात चर्चेचा विषय ठरले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आव्हान देताना त्यांचा अहंकार टोकाला गेलेला दिसला, नरेंद्र मोदी या जन्मात तरी आम आदमी पक्षाला दिल्लीत हरवू शकणार नाही असे म्हणणाऱ्या केजरीवाल यांना स्वतःची जागा सुद्धा राखता आली नाही. मोदींना आव्हान देणाऱ्या केजरीवालांना जनतेने जागा दाखवली. परंतु हा पराभव अगदी सहज स्वीकारण्याइतके परिपक्व केजरीवाल नक्कीच नाहीत. येणाऱ्या काळात आता ईव्हीएम, निवडणूक आयोग, मतदारयाद्या यांना लक्ष्य केले जाईल. लोकांचे लक्ष वेधण्यासाठी देशव्यापी आंदोलनही होईल. पावित्र्य अबाधित राखायचे असेल तर जनादेश स्वीकारावाच लागेल. कुठलीही पळवाट या देशातील सुजाण मतदार खपवून घेणार नाही.

**अखिल देशपांडे**/अकोला

●● ●●

### आता जशास तसे वागले पाहिजे

'बांगलादेशातील चिंताजनक परिस्थिती' हा अग्रलेख वाचला. सध्याच्या परिस्थितीत बांगलादेशच्या काळजीवाहू सरकारलाही तेथील जनतेचे काहीच सोयरसुतक राहिलेले नाही. उगीचच इतर देशातील काही नतद्रष्ट मंडळीच्या नादाने आपल्या जीवनाचा सत्यानाश करीत आहेत. बांगलादेशातील अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांना शांततेच्या नोबेल पुरस्काराने गौरविण्यात आले होते. त्यांनी केलेले सामाजिक कार्य आणि बचतगटाच्या माध्यमातून जनतेचे जीवनमान उंचावले होते. अशा व्यक्तीलाही तेथील जनता किंमत देत नसेल तर काय म्हणायचे?

आधीच्या पंतप्रधान शेख हसीना यांना पदावरून खाली खेचले तरी अराजकता का संपली नाही? या परिस्थितीमागे कोण आहे हे सगळ्यांना समजले आहे. आता त्याचा बंदोबस्त करायला हवा! पाकपुरस्कृत ज्या संघटना आहेत त्यांना धडा शिकवायला हवा. आधीच तेथील हिंदूंवरील अत्याचार थांबत नाही. मग या छुप्या पद्धतीने केले जाणारे अत्याचार आता सहन करू नये. सगळे उपाय करायला पाहिजे. बांगलादेशचा वापर करून आपली पोळी भाजणाऱ्यांना आता धडा शिकविणे गरजेचे आहे. शांत आहे म्हणजे कमजोर आहे असे समजणे सोडून दिले पाहिजे. आता जशास तसे वागलेच पाहिजेत. ▌▌

**संतोष राऊत**/सातारा


वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सूर्यघर योजनेच्या माध्यमातून ३,५५७ नागरिकांचे ३०० युनिट पर्यंतचे विज बिल झिरो

सोलापूर जिल्ह्यात पीएम सूर्यघर योजना अंमलबजावणीसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे देशभरातील एक कोटी कुटुंबांना दरमहा ३०० युनिट पर्यंत मोफत वीज पुरवठा करणे आहे. सोलापूर जिल्ह्यात या योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी वीज वितरण कंपनीला योग्य नियोजन करून प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. वीज वितरण कंपनीकडून ही योजना जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकाला पर्यंत पोहोचवण्यासाठी नियोजन केले जात आहे. सध्या या योजनेची अंमलबजावणी सुरू झाली असून, सोलापूर जिल्ह्यात महावितरणच्या पोर्टलवर ९ हजार ५३९ अर्ज प्राप्त झाले आहेत, यात ७ हजार ४९४ अर्जांना मंजुरी देण्यात आली आहे. तर ३ हजार ९३५



सोलर पॅनलचे काम सुरू झाले असून, ३ हजार ५५७ पॅनलचे काम पूर्ण झाले आहेत. उर्वरित प्रकल्पांचे काम त्वरित मार्गी लावण्याचे निर्देश दिले गेले आहेत. पूर्ण झालेल्या कामातून १२.५८ मेघा वॅट विजेची निर्मिती सौर ऊर्जेच्या माध्यमातून झालेली आहे.

**-सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर.**

## बँकांनाही दिल्या योग्य सुचना

सोलापूर जिल्ह्यात प्रधानमंत्री सुर्य घर योजनेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, यासाठी प्रशासकीय स्तरावर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी वीज वितरण कंपनी व संबंधित शासकीय विभाग प्रमुखाच्या नियमितपणे आढावा बैठका घेऊन या योजनेला गती देण्याचे काम केले जात आहे. तसेच बँकांकडून या योजनेच्या लाभार्थ्यांना कर्ज पुरवठा करताना अडचणी निर्माण करू नये व सुरळीत कर्ज पुरवठा करावा या अनुषंगाने आवश्यक निर्देश त्यांनी दिले आहेत. तसेच जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांनी या योजनेच्या कर्ज प्रकरणाच्या अनुषंगाने योग्य ती दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सुचित केलेले आहे.

## सौजउर्जेमुळे आमचे वीज बिल झिरो!

महावितरण कंपनीकडून आम्हाला प्रति महिना दीड ते २ हजार वीज बिल येत होते. ग्रामीण भागात असूनही हे लाईट बिल आमच्यासाठी खूप होते, त्यामुळे आम्ही पर्यायाची विचार करत असताना प्रधानमंत्री सूर्यघर योजनेविषयी वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडून माहिती मिळाली. महावितरणच्या पोर्टलवर अर्ज केला व आमचा अर्ज मंजूर होऊन आठ दिवसातच सौर ऊर्जा पॅनल माझ्या घरावर बसवण्यात आले. तर शासनाकडून अनुदानाची रक्कम ७८ हजार रुपये एका महिन्यातच मिळाले. सध्या आम्हाला प्रतिमहिना जे दीड ते दोन हजार लाईट बिल होते येत होते ते झिरो झाले आहे. त्यामुळे आमची आर्थिक बचत होत आहे. आमच्या गावातही १५ ते १६ नागरिकांनी सौर ऊर्जा पॅनल बसवून घेतलेले आहे.

**-लता कमलाकर जाधव हिपळे,**
**ता. दक्षिण सोलापूर**

## पात्रता आणि अनुदान

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराकडे स्वतःचे घर असणे आवश्यक आहे, तसेच घराच्या छतावर सोलर रुफ टॉप सिस्टिम बसवण्यासाठी पुरेशी जागा असावी लागेल. योजनेसाठी अर्ज करणे आणि आवश्यक कागदपत्रे जमा करणे आवश्यक आहे. योजनेअंतर्गत विविध क्षमतेच्या सौर प्रणालीसाठी सबसिडी उपलब्ध आहे, जसे की: - ० ते १५० युनिट वापरासाठी १ ते २ किलो वॅट क्षमतेची सौर प्रणालीसाठी ३०,००० ते ६०,००० रुपये सबसिडी. - १५० ते ३०० युनिट वापरासाठी २ ते ३ किलो वॅट क्षमतेची सौर प्रणालीसाठी ६०,००० ते ७८,००० रुपये सबसिडी.- ३०० युनिटपेक्षा जास्त वापरासाठी ३ किलो वॅट क्षमतेच्या सौर प्रणालीसाठी ७८,००० रुपये सबसिडी

## वेंडरची घेतली स्वतंत्र बैठक

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सूचनेप्रमाणे वीज वितरण कंपनीने जिल्ह्यात प्रधानमंत्री सूर्यग्रहण योजनेची मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी होण्यासाठी सौर पॅनलचा पुरवठा करणाऱ्या वेंडरची स्वतंत्र बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यात सौर पॅनल पुरवठा करणाऱ्या २८ वेंडरची स्वतंत्र यादी तयार करून नागरिकांनी यापैकी एकाची निवड करून आपल्या घरावर पॅनल बसवण्यासाठी वीज वितरण कंपनीकडून संपूर्ण सहकार्य केले जात आहे.

## ग्रामपंचायत मानेगाव, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत मानेगाव ता. माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिष - जनसुविधा योजना २०२३-२४**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मानेगाव ते वाकाव रस्ता ते बेडगे वस्ती रस्ता मुरमीकरण करणे | ४,९९,९८९/- | - | ५००/- | ३ महिने | सु.बे. |

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी १०/०२/२०२५ सकाळी १० पासून
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक १६/०२/२०२५ पर्यंत सकाळी १०.०० ते १८.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय मानेगाव
३ निविदा उघडण्याचा दिनांक १९/०२/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री. एच.ए. बनाते**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत मानेगाव**
**ता. माढा, जि. सोलापूर**

**सही/-**
**श्री. तानाजी धनाजी लांडगे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत मानेगाव**
**ता. माढा, जि. सोलापूर**

मनोरमा परिवार अंतर्गत

**श्री सदाशिव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर**

कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

श्री. पुरुषोत्तम अनंत साखरे, चेअरमन (मो. ९१७५३६३९४५)
श्रीमती अनिता सुरेशराव जगताप, व्यवस्थापिका (मो. ८७८८३७४४३६)

# गर्दीचा फायदा घेत प्रवासी महिलेचे दागिने चोरले




**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

एसटीमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत एका महिला प्रवासीचे दागिने चोरून नेण्याची घटना दि.७ फेब्रुवारी रोजी सोलापूर बस स्थानकात घडली.या घटनेची हाकिकत अशी की,प्रियांका सुनील कांबळे (वय-३२,रा.भांडुप मुंबई) या शुक्रवारी दुपारी बाराच्या सुमारास सोलापूर बस स्थानकातून धाराशिवकडे जाण्यासाठी उमरगा बस मध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत फिर्यादीच्या साईड बॅग मध्ये असलेले सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेले. यात सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याचे नेकलेस, कानातील फुले, कानातील काड्या, सोन्याची लहान वाटी, मणी असा जवळपास ९७ हजार रुपयेचा ऐवज होता.फौजदार चावडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

# जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी क्लिनिकची सुरुवात

**सोलापूर :** कॅन्सरचा प्रतिबंध आणि लवकर निदान करण्याच्या दिशेने एक वेगवान पाऊल टाकत, बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलतर्फे जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून प्रिव्हेंटिव्ह ऑन्कोलॉजी क्लिनिकची सुरुवात केली आहे.या क्लिनिकचे उद्घाटन डॉ.मुक्ता पुणतांबेकर यांच्याहस्ते करण्यात आले आणि त्यांनी कॅन्सर रुणांच्या प्रवासातील कॅन्सरच्या लवकर निदानाचे महत्त्व आधोरेखित केले. त्यांच्या सह डॉ.अमीत पारसनीस,डॉ.लखन कश्यप आणि डॉ.करण चंचलानी यांनी अत्याधुनिक निदान पध्दती आणि प्रतिबंधात्मक योजनां बद्दलची माहिती दिली.याविषयी आनंद मोटे यांनी सांगितले,या क्लिनिक मुळे आम्ही प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या धोक्या विषयी सांगून जीवनशैलीतील योग्य बदल समजावून त्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी संरचनात्मक पाऊले उचलण्यावर भर देणार आहोत.

## ग्रामपंचायत मानेगाव, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत मानेगाव ता. माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिष - १५वी वित्त आयोग ग्रा.पं.स्तर**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोरे गल्ली, अंगणवाडी दुरुस्ती | १,००,०००/- | - | ५००/- | ३ महिने | सु.बे. |
| २ | जि.प. प्राथ. शाळा, मानेगाव कंपाऊंड वॉल व दुरुस्ती | २,०३,७८८/- | | | | |
| ३ | भीम नगर समाजमंदिर दुरुस्ती | ९९,२८२/- | | | | |
| ४ | अण्णाभाऊ साठे नगर समाजमंदिर दुरुस्ती | ५०,०००/- | | | | |
| ५ | अण्णाभाऊ साठे नगर समाजमंदिर दुरुस्ती | ५०,०००/- | | | | |

**एकूण ५ कामांची एकत्रित निविदा मागविणेत येत आहे.**

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी १०/०२/२०२५ सकाळी १० पासून
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक १६/०२/२०२५ पर्यंत सकाळी १०.०० ते १८.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय मानेगाव
३ निविदा उघडण्याचा दिनांक १९/०२/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री. एच.ए. बनाते**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत मानेगाव**
**ता. माढा, जि. सोलापूर**

**सही/-**
**श्री. तानाजी धनाजी लांडगे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत मानेगाव**
**ता. माढा, जि. सोलापूर**

## कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर

**ता. माळशिरस जि.सोलापूर**

### जाहीर निवेदन

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील सभासद, बिगर सभासद आणि या हंगामात ऊस गाळपासाठी कारखान्याकडे नोंद केलेल्या, न केलेल्या सर्व ऊस उत्पादकांना कळविणेत येते की, आपल्या कारखान्याचा गळीत हंगाम २०२४-२५ हा अंतीम टप्यात असून साधारणपणे फेब्रुवारीच्या १८ ते २० तारखेदरम्यान बंद होणार आहे. आजपर्यंत ज्या ऊस उत्पादकांच्या ऊसाची तोड झालेली नाही अशा ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी त्वरीत शेती विभागाशी संपर्क साधावा त्याचप्रमाणे शुगर केन कंट्रोल ऑर्डर १९६६ नुसार त्यांचा ऊस स्वतः तोड, वाहतूक करुन कारखान्याकडे गाळपास आणावा अन्यथा त्यांचा ऊस रस्त्याच्या अडचणीमुळे, कायदेशीर बाबीमुळे, ऊस तोडणेस अयोग्य असलेस किंवा अन्य काही कारणामुळे गाळपाविना शिल्लक राहील्यास त्यास कारखाना जबाबदार राहणार नाही. कारखान्याकडे ऊस गाळपासाठी नोंद केलेल्या, सर्व सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, ऐनवेळी ऊस गाळपास घेणेसाठी अर्ज केलेले शेतकरी यांनी नोंद घेवून आपला ऊस वरील जाहिर तारखेपुर्वी स्वतः तोड, वहातुक करुन कारखाना कार्यस्थळावर पोहोच करावा ही विनंती.

**डॉ. यशवंत कुलकर्णी**
**कार्यकारी संचालक**

## ग्रामपंचायत मानेगाव, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत मानेगाव ता. माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिष - १५वी वित्त आयोग ग्रा.पं.स्तर**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कार्यालय विस्तारीकरण | ५,००,०००/- | - | ५००/- | ३ महिने | सु.बे. |

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी १०/०२/२०२५ सकाळी १० पासून
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक १६/०२/२०२५ पर्यंत सकाळी १०.०० ते १८.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय मानेगाव
३ निविदा उघडण्याचा दिनांक १९/०२/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री. एच.ए. बनाते**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत मानेगाव, ता. माढा, जि. सोलापूर**

**सही/-**
**श्री. तानाजी धनाजी लांडगे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत मानेगाव, ता. माढा, जि. सोलापूर**

# पैशाचा अपहार केल्याप्रकरणी शाखाधिकाऱ्यावर गुन्हा

**सोलापूर :** अधिकाराचा गैरफायदा घेत संस्थेच्या पैशाचा अपहार करून संस्थेची व ठेवीदार, ग्राहकांची फसवणूक केल्याप्रकरणी शाखाधिकारी श्रीकांत विश्वनाथ मिसाळ (रा.बुधवार पेठ,तरटी नाका पोलीस चौकी जवळ सोलापूर) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की, जनकल्याण को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी बाळे येथे शाखाधिकारी पदावर कार्यरत असताना श्रीकांत मिसाळ यांनी १ जुलै २०२४ ते ८ जानेवारी २०२५ दरम्यान हा पैशाचा अपहार केला.राजेंद्र पुंडलिक हजारे (रा.लोकमंगल विहार,बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात शाखाधिकारी मिसाळ याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.अधिक तपास साह.पोलिस नि. पाटील हे करत आहेत.

# मूल होत नसल्याने छळ; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी**

तुला मूल होत नाही. तुला नीट जेवण बनवता येत नाही. तू वांजोटी आहेस. आमच्या खानदानामध्ये असली बायको नाही, असे टोचून बोलून मारहाण करत चारित्र्यावर संशय घेत मानसिक त्रास दिल्याप्रकरणी सासरकडील मंडळीवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी प्रतिमा राजेंद्र शेरखाने (रा.कोटा नगर,सोलापूर) या सासरी नांदत असताना पती राजेंद्र शेरखाने, सासू विमल शेरखाने, सासरे सुरेश शेरखाने (रा. सर्वजण कोटा नगर, सोलापूर) तसेच नणंद मनीषा देशमुख उर्फ कांबळे (रा.विडी घरकुल सोलापूर) या सर्वांनी मिळून विवाहितेचा छळ केला. अधिक तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल कटके हे करत आहेत.

## ग्रामपंचायत मानेगाव, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत मानेगाव ता. माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिष - १५वी वित्त आयोग ग्रा.पं.स्तर**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जि.प. प्राथमिक शाळा, कदम वस्ती कंपाऊंड वॉल | १,००,०००/- | - | ५००/- | ३ महिने | सु.बे. |
| २ | जि.प. प्राथमिक शाळा, कदम वस्ती कंपाऊंड वॉल | २,००,०००/- | | | | |
| ३ | जि.प. प्राथमिक शाळा आनंद नगर वॉल कंपाऊंड | २,०३,९६८/- | | | | |
| ४ | जि.प. प्राथमिक शाळा आनंद नगर वॉल कंपाऊंड | १,००,०००/- | | | | |

**एकूण ४ कामांची एकत्रित निविदा मागविणेत येत आहे.**

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी १०/०२/२०२५ सकाळी १० पासून
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक १६/०२/२०२५ पर्यंत सकाळी १०.०० ते १८.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय मानेगाव
३ निविदा उघडण्याचा दिनांक १९/०२/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री. एच.ए. बनाते**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत मानेगाव, ता. माढा, जि. सोलापूर**

**सही/-**
**श्री. तानाजी धनाजी लांडगे**
**सरपंच**
**ग्रामपंचायत मानेगाव, ता. माढा, जि. सोलापूर**

# रोडस्टर एक्स सीरीज केली लाँच

**सोलापूर :** भारतातील सर्वात मोठी प्युअर-प्ले ईव्ही कंपनी ओला इलेक्ट्रिकने आज रोडस्टर एक्स सीरीज लाँच करून ईव्ही मोटरसायकल सेगमेंटमध्ये प्रवेश केला आहे. या मोटरसायकली प्रभावी कामगिरी आणि एक रोमांचक रायडिंग अनुभव देतात. कंपनीच्या स्केलेबल मोटरसायकल प्लॅटफॉर्मवर बनवलेली,पूर्णपणे नवीन रोडस्टर एक्स सीरीज रोडस्टर एक्ससाठी ७४,९९९, रोडस्टर एक्स+ ४.५ केडब्ल्यूएच साठी १,०४,९९९ आणि रोडस्टर एक्स+ ९.१ केडब्ल्यू एच साठी १,५४,९९९ च्या सुरुवातीच्या किमतीत सादर केली जात आहे.

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनीः** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइटः** http://www.truhomefinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**शाखा कार्यालय:** कार्यालय क्र. एफ-३, पहिला मजला, कनाले प्लाझा, डफरिनचौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर – ४१३००१

**परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अँण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा भौतिक ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात** )सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली नमूद केलेले कर्जदार व जामीनदारांकडून ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात ) यांना देय असलेली खाली तक्त्यात नमूद रक्कम वसुलीकरिता खाली दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि २८.०२.२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वा** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन व ज्ञात अधिभार ,ताबा प्रकार , आरक्षित मुल्य व इसारा रक्कम आणि वाढीव मूल्याचे तपशील खालीलप्रमाणे :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | तारीख व रक्कम १३ (२) डिमांड सूचनेनुसार | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | अनामत राशी ठेवींचा (ईएमडी ) तपशील | लिलावाची तारीख व वेळ | व्यक्तींचे संपर्क आणि सर्वेक्षण तारीख |
|---|---|---|---|---|---|
| **(१). श्री अर्जुन दशरथ आसदे (कर्जदार ),**<br>**(२). सौ. रेणुका अर्जुन आसदे (सह-कर्जदार)**<br>**सर्वांचा निवास पत्ता येथे आहे:**<br>**फ्लॅट नं. १, पहिला मजला, "यशश्री अपार्टमेंट" प्लॉट क्र. १५, एस. क्र. १३२/1A (नवीन) {जुना क्र. ३०५}, नरसिंग नगर, केएलई शाळेच्या मागे, मजरेवाडी, जुळे सोलापूर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर- ४१३००४ आणि**<br>**येथे पत्ता देखील आहे: बी.एल. क्रमांक २६, बापूजी नगर, महालक्ष्मी मंदिराजवळ, सोलापूर-४१३००३**<br>**लॅनः SHLHSOLR0000227**<br>**ताबा दिनांक व ताबा प्रकार**<br>**५ जुलै २०२४ भौतिक ताबा**<br>**ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | **मागणी सूचना**<br>**दिनांक: २०.०६.२०२३**<br>दिनांक १२/०६/२०२३ रोजी कर्ज खाते क्र. SHLHSOLR0000227 अंतर्गत रु. २७,४६,९५०/- (रुपये सत्तावीस लाख छचाळीस हजार नऊशे पन्नास फक्त) संविदात्मक दराने पुढील व्याजासह, उक्त सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत . | रु. २२,५०,०००/- (बावीस लाख पन्नास हजार रुपये)<br>**बोली वाढविणे :**<br>रु. १०,०००/- आणि त्यापटीने<br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )**<br>रु. २,२५,०००/- (रुपये दोन लाख पंचवीस हजार फक्त)<br>**ईएमडी सादर करण्याची अंतिम ता: २७ फेब्रु २०२५ वेळ : सकाळी १० ते सायं. ५.००** | ईएमडी रक्कम खाली नमूद केलेल्या खात्याच्या तपशिलानुसार आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात जमा करावी:<br>**बँकेचे नाव-** ॲक्सिस बँक लिमिटेड<br>**शाखा:** वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई<br>**बँक खाते क्रमांक-** चालू खाते क्रमांक ९११०२००४५६ ७७६३३<br>**आयएफएससी कोड-** यूटीआयबी ०००००२३० | **२८ फेब्रुवारी २०२५**<br>**वेळ : सकाळी ११ वा. ते दुपारी १२ .००** | **सुनील मानेकर ८९९९३४४८९७**<br>**अश्फाक पत्का- ९८१९४ १५४७७**<br>**मयूर भोजने ८८९८५२७०७६**<br>**निरीक्षण तारीख: १५ फेब्रुवारी २०२५ वेळ: दुपारी १२..०० वा. ते ३.००** |

**संपत्तीचे विवरण**

स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, फ्लॅट क्र.०१, पहिल्या मजल्यावर, कार्पेट क्षेत्रफळ ३८.२८ चौ. मीटर, "यशश्री अपार्टमेंट" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, प्लॉट क्र. १५ सर्व्हे नं.३०५ (जुना) आणि १३२/१ ए (नवीन) वर बांधण्यात आलेले असून ते मजरेवाडी, जुळे सोलापूर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर, येथे स्थित आहे आणि खालीलप्रमाणे सीमा:- उत्तर:- फ्लॅट क्रमांक २ आणि फ्लॅट क्रमांक ११, दक्षिण:- ९ मीटर रस्ता आणि आकाशात मोकळा. पूर्व:- फ्लॅट क्रमांक ४, पश्चिम:- प्लॉट क्रमांक १७ नरसिंग नगर,

**विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, बोली फॉर्म आणि इतर माहितीसाठी ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.ऑनलाइन लिलाव आमची लिलाव एजन्सी सी १ इंडिया प्राइवेट लिमिटेडच्या https://www.bankeauctions.com या वेबसाईट वर पाडला जाईल .पत्ता : प्लॉट न. ६८ , ३ रा मजला, सेक्टर ४४ , गुरुग्राम,हरियाणा -१२२००३ कोणत्याही सहाय्यसाठी तुम्ही , tn@c1india.com, support@bankeauctions.com. या ई-मेल आय डी वर ई-मेल पाठवू शकता . दूरध्वनी:+९१-१२४-४३०२०२०फॅक्स:+९१-१२४-४३०२०१०. www.c1india.com**
**कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत बोलीदाराने वरील तक्त्यात नमूद केलेल्या अधिकाऱ्याशी संपर्क साधावा.**
**· टीप: कृपया लक्षात ठेवा की सुरक्षित धनको सर्व कर्जदार/जामीनदार/गहाणखतदारांना विक्रीची सूचना जलद/नोंदणीकृत पोस्टाने जारी करणार आहे. जर कोणत्याही पक्षाला ती प्राप्त झाली नाही, तर विक्री सूचना प्रकाशन ही सेवा पर्यायी पद्धत म्हणून मानली जाऊ शकते.**
**सरफेसी कायदा , २००२ च्या नियम ८ (६) अन्वये वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना.**
**· लिलावापूर्वी गहाणखतदार/कर्जदारांना एकूण देय रक्कम अतिरिक्त व्याजासह भरण्याची शेवटची संधी दिली जाते, अन्यथा वरील वेळापत्रकानुसार सुरक्षित मालमत्ता विकली जाईल.· गहाणखतदार/कर्जदारांना मालमत्तेच्या आत असलेल्या सर्व जंगम वस्तू परत घेण्याची विनंती आहे.**

ठिकाण - सोलापूर
दिनांक - १०-०२-२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### दुखापतग्रस्त बेथेलच्या जागी टॉम बँटनला बोलावले



**कटक :** इंग्लंडने रविवारी अहमदाबाद येथे होणाऱ्या भारताविरुद्धच्या तिसऱ्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यासाठी जखमी अष्टपैलू जेकब बेथेल याच्या जागी पर्याटी खेळाडू म्हणून फलंदाज टॉम बँटनला बोलावले आहे. नागपूर येथे झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडच्या चार गड्यांनी झालेल्या पराभवात अर्धशतक झळकावणारा व एक बळी टिपणारा बेथेल याच्या डाव्या मांडीला दुखापत झाली.बेथेलच्या दुखापतीचे अधिक मूल्यांकन सोमवारी अहमदाबादमध्ये पोहोचल्यावर केले जाईल. बुधवारी तिसरा एकदिवसीय सामना खेळला जाणार असून या सामन्यासाठी बेथेलच्या जागी टॉम बँटनला पाचारण करण्यात आले, असे इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट मंडळाने (ईसीबी) रविवारी प्रसिद्ध केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. २६ वर्षीय यष्टिरक्षक-फलंदाज टॉम बँटनने सहा एकदिवसीय सामने खेळले असून यात त्याने सर्वाधिक ५८ धावा केल्या आहेत. ऑगस्ट २०२० मध्ये इंग्लंडकडून शेवटचा सामना खेळलेला बँटन टी-२० फ्रॅन्चायझी क्रिकेटमध्ये उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. तो सध्या यूएई आयएलटी-२० स्पर्धेत आघाडीचा धावा करणारा फलंदाज आहे व त्याने ११ डावांमध्ये ५४.७७ च्या सरासरीने दोन शतकांसह ४९३ धावा केल्या आहेत, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. बँटन सोमवारी भारतात येणार आहे. इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतभारत १-० ने आघाडीवर आहे.

# भारताचा इंग्लंडवर रोमहर्षक विजय

### रोहित शर्माला अखेर सूर गवसला
### गिलचे अर्धशतक
### पदार्पणात वरुणचा १ बळी



| शुभमन गिल | धावा | ६० | चौकार | ९ |
|---|---|---|---|---|
| | चेंडू | ५२ | षट्कार | १ |

◆ **कटक, ९ फेब्रुवारी**

बाराबती स्टेडियमवर चुरशीत खेळल्या गेलेल्या दुसऱ्या एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात कर्णधार रोहित शर्माचे शतक (११९) व शुभमन गिलच्या (६०) अर्धशतकाच्या बळावर भारताने इंग्लंडवर ३३ चेंडू शिल्लक ठेवत ४ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच भारताने इंग्लंडविरुद्धची तीन सामन्यांची वन-डे मालिका २-० ने जिंकली. आता मालिकेतील तिसरा सामना १२ फेब्रुवारी रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणारआहे.

इंग्लंड संघाचा कर्णधार जोस बटलरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडने तडाखेबंद फलंदाजी करत ४९.५ षटकांत सर्वबाद ३०४ धावांचा डोंगर उभा केला. भारताने चोख प्रत्युत्तर देत ४४.३ षटकांत ६ बाद ३०८ धावा काढून आपला विजय साकार केला.

मालिकेत बरोबरी साधण्याच्या उद्देशाने इंग्लंडच्या फलंदाजांनी जबरदस्त फलंदाजी केली. फिल सॉल्ट (२६) व बेन डकेटने ८१ धावांची सलामी भागीदारी करत इंग्लंडच्या डावाची झकास सुरुवात केली. वन-डेमध्ये पदार्पण करणाऱ्या वरुण चक्रवर्तीने फिल सॉल्टला आपल्या फिरकीत अडकवले. मात्र त्यानंतर बेन डकेट (६५), जो रूट (६०), हॅरी ब्रुक (३१), कर्णधार जोस बटलर (३४) व लियाम लिव्हिंगस्टोनने (४१) छोट्या-छोट्या भागीदारी करत इंग्लंडच्या धावसंख्येला आकार दिला. डकेटने ५६ चेंडूंत १० चौकारांसह ६५ धावांची, तर रुटने ७२ चेंडूंत ६ चौकारांसह ६० धावांची अर्धशतकी खेळी केली. भारताकडून रवींद्र जडेजाने ३ बळी, तर मोहम्मद शमी, हर्षित राणा, हार्दिक पांड्या व वरुण चक्रवर्तीने प्रत्येकी १ बळी टिपला.

विजयासाठी ३०५ धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाचा कर्णधार व सलामीवीर रोहित शर्माला सूर गवसला. रोहितने शुभमन गिलसोबत १३६ धावांची भागीदारी करत भारताच्या विजयाचा पाया भक्कम केला. दरम्यान शुभमन गिलने आपले अर्धशतकही साजरे केले, मात्र याचदरम्यान ओव्हरटनने गिलचा त्रिफळा उडवला. गिलने ३२ चेंडूंत ९ चौकार व एका षट्कारसह ६० धावांची खेळी केली. विराट कोहलीने ५ धावा केल्या.

**रोहित शर्माने झळकावले ३२ वे वन-डे शतक**

पुढे रोहित शर्मा व श्रेयस अय्यरने इंग्लंडच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेत भारताच्या विजयाच्या आशा पल्लवीत ठेवल्या. दरम्यान फॉर्मात आलेल्या रोहित शर्माने आपले ३२ वे शतक साजरे केले. रोहित व श्रेयसने ७० धावांची भागीदारी करून भारताला २२० धावांचा टप्पा गाठून दिला असताना रोहित लियाम लिव्हिंगस्टोनच्या फिरकी गोलंदाजीला बळी पडला. रोहित शर्माने अवघ्या ९० चेंडूंत १२ चौकार व ७ षट्कारांच्या मदतीने ११९ धावांची शतकी खेळी केली.

पुढे श्रेयस अय्यरने अक्षर पटेलच्या सहकार्याने धावांची गती कायम राखत संघाला विजयाच्या दिशेने नेले. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ३८ धावांची भर घातली. एक चोरटी धाव घेण्याच्या नादात श्रेयस धावबाद झाला. श्रेयसने ४७ चेंडूंत ३ चौकार व एका षट्कारसह ४४ धावांची भर घातली. केएल राहुल व हार्दिक पांड्या प्रत्येकी १० धावा काढून तंबूत परतले. त्यामुळे भारताची स्थिती ४२ षटकांत ६ बाद २८६ झाली होती व भारताला उर्वरित ४८ चेंडूंत केवळ १९ धावा काढण्याची गरज होती. अक्षर पटेल व रवींद्र जडेजावर भिस्त होती व दोघांनीही नाबाद खेळी केली. भारताने ४४.३ षटकांत ६ बाद ३०८ धावा केल्या. अक्षरने नाबाद ४१ धावांची, तर जडेजाने नाबाद ११ धावांची खेळी केली. (वृत्तसंस्था)

**रोहितचा षट्काराचा पराक्रम**

या बरोबरच रोहितने वन-डे क्रिकेटमध्ये सर्वाधिक षट्कार ठोकण्याच्या बाबतीत ख्रिस गेलला मागे टाकत दुसरा क्रमांक प्राप्त केला. रोहितने ३३४ षट्कार हाणले, तर गेलने ३३१ षट्कार ठोकलेत.

# तामिळनाडू १९४ धावांनी पिछाडीवर

### रणजी करंडक उपांत्यपूर्व सामना
### आंद्रे सिद्धार्थची ६५ धावांची खेळी
### विदर्भाच्या आदित्य ठाकरेचे ४ बळी

◆ **नागपूर, ९ फेब्रुवारी**

व्हीसीए स्टेडियमवर सुरु असलेल्या तामिळनाडूविरुद्धच्या रणजी करंडक पाच दिवसीय उपांत्यपूर्व सामन्यात दुसऱ्या दिवशी करुण नायर व हर्ष दुबेच्या दमदार भागीदारीच्या बळावर विदर्भाने १२१.१ षटकांत ३५३ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तर देताना तामिळनाडूने दिवस अखेर ४६ षटकांत ६ बाद १५९ धावांपर्यंत मजल मारली. तामिळनाडू अजून १९४ धावांनी पिछाडीवर आहे. विदर्भाचा मध्यम गती गोलंदाज आदित्य ठाकरेने अवघ्या १८ धावांच्या मोबदल्यात ४ बळी टिपण्याची किमया केली.

विदर्भाने दुसऱ्या दिवशी ६ बाद २६४ धावांवरून पुढे आपल्या डावास सुरुवात केली व ८९ धावांची भर घातली. विदर्भाने पहिल्या डावांत १२१.१ षटकांत सर्वबाद ३५३ धावा उभारल्या. नाबाद शतकवीर करुण नायर व हर्ष दुबेने तडाखेबंद फलंदाजी करत संघाची धावसंख्या वाढविली.



आदित्य ठाकरे

हर्षनेही आपले अर्धशतक साजरे केले. करुण नायरने २४३ चेंडूंत १२२ धावांचे योगदान दिले, यात त्याने तब्बल १८ चौकार व एक षट्कार खेचला. हर्ष दुबेनेही लौकीकास साजेशी खेळी करत १३२ चेंडूंत ९ चौकारांच्या मदतीने ६९ धावा ठोकल्या.


तामिळनाडूकडून सोनू यादव व विजय शंकरने प्रत्येकी ३ बळी, मोहम्मद मोहम्मदने २ बळी, तर अजित राम व मोहम्मद अलीने प्रत्येकी १ बळी टिपला.

विदर्भाच्या ३५३ धावांना प्रत्युत्तर देताना तामिळनाडूच्या डावाला प्रारंभीच आदित्य ठाकरेने जोरदार हादरे दिले. आदित्यने सामन्याच्या दुसऱ्याच षटकांत सलामीवीर मोहम्मद अलीचा (४) त्रिफळा उडवला. त्यानंतर साई सुदर्श (७) व भूपती कुमारला (०) लवकरच तंबूत परत पाठविले. मध्यम गती गलंदाज नचिकेत भुतेने सलामी जोडीदार नारायण जगदिशनला (२२) तायडेकडून झेलबाद केले. त्यामुळे तामिळनाडूची १२.१ षटकांत ४ बाद ३८ अशी दयनीय अवस्था झाली होती. मात्र त्यानंतर विजय शंकर व सी. आंद्रे सिद्धार्थने संयमाने फलंदाजी करत आपल्या संघाची पडछड थांबविली. या दोघांनी पाचव्या गड्यासाठी ९५ धावांची भागीदारी केली आणि संघाला शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला. दरम्यान सिद्धार्थने आपले अर्धशतक साजरे केले. आदित्य ठाकरेनेच ही जमलेली जोडी फोडली, त्याने विजय शंकरला (२२) वाडकरकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. पुढे हर्ष दुबेने सिद्धार्थची घोडदौड रोखली. सी. आंद्रे सिद्धार्थने ८९ चेंडूंत १० चौकार व २ षट्कारांसह ६५ धावांची खेळी केली.

दिवस अखेरपर्यंत प्रदोष रंजन पॉल (नाबाद १८) व कर्णधार साई किशोरने (नाबाद ६) नाबाद खेळी करत आपल्या तामिळनाडू संघाला ४६ षटकांत ६ बाद १५९ धावांपर्यंत मजल मारून दिली.

विदर्भाकडून आदित्य ठाकरेने ४ बळी, नचिकेत भुते, हर्ष दुबेने प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश मिळविले. (वृत्तसंस्था)

# राफ्टिंगमध्ये महाराष्ट्राची प्रथमच रुपेरी कामगिरी



देवेंद्र कुमार, राखी गेहलोत, वैष्णवी शिंपी व कौशिक कुमार

◆ **तनकपूर, ९ फेब्रुवारी**

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी धाडसी क्रीडा प्रकारातही कौतुकास्पद वाटचाल कायम राखली आहे. स्पर्धेत प्रथमच समाविष्ट करण्यात आलेल्या धाडसी राफ्टिंग खेळात महाराष्ट्राने रूपेरी यशाला गवसणी घातली.

नेपाळ बार्डर जवळील बूम मंदिर नदीच्या किनाऱ्यावर सुरू असलेल्या राफ्टिंग प्रकारात देवेंद्र कुमार, राखी गेहलोत, कौशिक कुमार व वैष्णवी शिंपी यांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र संघाने सात किलोमीटर शर्यतीत पदकासाठी शर्थ केली. ३५ मिनिटे ३१.७६१ सेकंदात शर्यत पूर्ण करीत महाराष्ट्राने दुसरे स्थान संपादन केले. कर्नाटक संघाने ही शर्यत ३४ मिनिटे ७.९६७ सेकंदात पार करीत सुवर्णपदक जिंकले. हिमाचल प्रदेशच्या संघाने कांस्यपदकाची कमाई केली.

सांघिक मिश्र प्रकारात महाराष्ट्र संघाने प्रथमच राफ्टिंग क्रीडा प्रकारातील पदक जिंकण्याचा पराक्रम केला. सात किलोमीटरची शर्यत तेलागंणा, दिल्ली, हरयाणा, हिमाचल प्रदेश, चंदिगड, उत्तराखंड, कर्नाटकासह ८ संघादरम्यान रंगली. सुरूवातीपासून महाराष्ट्राच्या खेळाडूंनी दुसरे स्थान कायम राखत रूपेरी यशावर नाव कोरले. पात्रता फेरीतच महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर होता. महाराष्ट्र संघास कर्नल सचिन निकम व संघ व्यवस्थापक विनोद यांचे यांचे मार्गदर्शन लाभले. रौप्यपदक विजेत्या महाराष्ट्राच्या संघात पुण्याच्या वैष्णवी शिंपीने चमकदार कामगिरी केली. (वृत्तसंस्था)

### दुखापतीमुळे सिंधूची आशिया मिश्र सांघिक स्पर्धेतून माघार

**नवी दिल्ली :** दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने पायाच्या दुखापतीमुळे चीनमध्ये होणाऱ्या बॅडमिंटन आशिया मिश्र सांघिक अजिंक्यपद (बीएएमटीसी) स्पर्धेतून माघार घेतली आहे. सिंधूच्या माघारीमुळे या प्रतिष्ठित स्पर्धेत भारताला आपल्या पदकाचा रंग सुधारण्याच्या संधीला मोठा धक्का बसला आहे. ही स्पर्धा ११ ते फेब्रुवारी दरम्यान किंगदाओ येथे खेळवली जाणार आहे. भारतीय बॅडमिंटनपटू सध्या गुवाहाटी येथील प्रशिक्षण शिबिरात सराव करत आहेत. सिंधूशिवाय शिबिरात इतर आघाडीचे खेळाडू लक्ष्य सेन व एच. एस. प्रणॉयसह सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी ही दुहेरी जोडी आहे. सिंधू ही बीएएमटीसी स्पर्धेच्या मागील आवृत्तीत कांस्यपदक जिंकणाऱ्या संघाचा भाग होती. मी जड अंतःकरणाने सांगते की मी बीएएमटीसी-२०२५ स्पर्धेसाठी संघासोबत प्रवास करणार नाही. ४ फेब्रुवारी रोजी गुवाहाटी येथे सराव करत असताना, माझ्या पायाच्या स्नायूंना दुखापत झाली. मला पुन्हा तंदुरुस्त होण्यासाठी थोडा जडास्त वेळ लागणार आहे, असे २९ वर्षीय सिंधूने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. बर्मिंगम येथे झालेल्या २०२२ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत महिला एकेरीचे पहिले सुवर्णपदक जिंकल्यापासून सिंधू दुखापतींशी झुंजत आहे.

### दिमुथ करुणारत्नेला निरोप

**गॅले :** दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून श्रीलंकेला पराभव पत्करावा लागला व ऑस्ट्रेलियाने दोन सामन्यांची कसोटी मालिका २-० ने जिंकली. श्रीलंकेला सलग चौथ्या पराभवाला सामोरे जावे लागले. ३६ वर्षीय सलामीवीर दिमुथ करुणारत्नेचा हा १०० वा व शेवटचा कसोटी सामना होता. या सामन्यानंतर करुणारत्नेला निरोप देण्यात आला. माझ्यासाठी खूप भावनिक दिवस. हा एक दीर्घ कारकिर्दीतील दिवस होता, असे करुणारत्ने म्हणाला. करुणारत्नेने १६ शतकांसह ३९.२५ च्या सरासरीने ७,२२२ धावा केल्या.

# भारतानंतर न्यूझीलंड सर्वात मजबूत संघ : आर. अश्विन

◆ **नवी दिल्ली, ९ फेब्रुवारी**

चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघानंतर न्यूझीलंड हा सर्वात मजबूत संघांपैकी एक आहे, परंतु इतर संघांनी ऑस्ट्रेलिया संघाला कमी लेखण्याची चूक करू नये. त्यांनी दुखापतीमुळे काही प्रमुख ऑस्ट्रेलियन खेळाडू गमावले असले तरी ते आयसीसीच्या महत्त्वपूर्ण स्पर्धेत आपला अव्वल दर्जाचा खेळ सादर करतात, असा इशारा भारताचा अव्वल फिरकी गोलंदाज आर. अश्विनने दिला आहे.

आयसीसी चॅम्पियन्स चषक स्पर्धा १९ फेब्रुवारीपासून पाकिस्तानमध्ये सुरू होत आहे. या स्पर्धेत भारतीय संघ आपले सर्व सामने दुबईमध्ये हायब्रिड मॉडेलनुसार खेळणार आहे.



दुबईमध्ये भारताला घरच्या मैदानावर फायदा आहे आणि जवळजवळ प्रत्येक संघ भारताविरुद्ध अवे सामना खेळत असल्यासारखेच आहे. हे निश्चितच इतर संघांसाठी अडचणीचे ठरणार आहे, असे अश्विन म्हणाला.

पाकिस्तान, न्यूझीलंड व दक्षिण आफ्रिका पाकिस्तानच्या परिस्थितीत खेळत आहेत, ज्यामुळे त्यांना चॅम्पियन्स चषकांत मदत होईल. भारतीय संघ केवळ भारतात इंग्लंडविरुद्ध खेळला आणि शिवाय, दुबईमध्ये टी-२० खेळण्याच्या आठवणी फारशा सुखद नाही. दुबईमध्ये नाणेफेक जिंकणे महत्त्वाचे ठरते, असेही तो म्हणाला.

ट्रेंट बोल्ट व टिम साउदी या दीर्घकाळ सेवा देणारी वेगवान गोलंदाजांची जोडी अनुपस्थित राहूनही न्यूझीलंड भारतासमोर आव्हान उभे करेल, असेही तो म्हणाला.

भारतानंतर, न्यूझीलंड चॅम्पियन्स चषकातील सर्वात मजबूत संघांपैकी एक आहे. साऊदी व बोल्टसारखे खेळाडू खेळत नसल्यामुळे न्यूझीलंडच्या गोलंदाजी आक्रमणाबद्दल प्रश्नचिन्ह आहे, असेही तो म्हणाला.

त्यांच्याकडे मायकेल ब्रेसवेल व ग्लेन फिलिप्ससारखे अनुभवी फिरकी गोलंदाज आहेत. मिशेल सॅण्टनर कर्णधार आहे. न्यूझीलंड हा निश्चितच एक मजबूत संघ आहे. भारताला आव्हान देणाऱ्या संघांपैकी ते एक आहेत. ऑस्ट्रेलिया संघही आयसीसीच्या स्पर्धेत ऐन मोक्याच्या क्षणी एक मजबूत संघ म्हणून समोर येतो, असेही तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

### तलवारबाजी : महाराष्ट्राची विजयी घोडदौड

**हल्दवानी :** ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत तलवारबाजी मधील दोन्ही प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंची विजयी घोडदौड कायम राखली आहे. सायबर व फॉईल या दोन्ही क्रीडा प्रकारांमधील वैयक्तिक गटात पदकाच्या आशा आहेत.

महाराष्ट्राच्या कशिश भरड हिने तामिळनाडूच्या बेनी क्युभेई हिच्यावर मात करीत विजयी सलामी दिली. सुरुवातीपासूनच तिने आक्रमक खेळ करत ही लढत सहज जिंकली. तिची सहकारी शर्वरी गोसवडे हिने केरळच्या एस. सौम्या हिच्यावर नेत्रदीपक विजय मिळविला. गौरी मंगलसिंग या महाराष्ट्राच्या खेळाडूने रीष युथुसेरी या केरळच्या खेळाडूला सहज पराभूत केले. महाराष्ट्राच्या श्रुती जोशी हिला पहिल्या फेरीत पुढे चाल मिळाली.

पुरुष गटात मिलिंद जहागीरदारने बिहारच्या तुषार कुमार याला पराभूत केले. त्याचा सहकारी शकीर अंबीर याने हरियाणाच्या सचिन कुमार याचे आव्हान संपुष्टात आणले. महाराष्ट्राच्याच मनोज पाटील याला पुढे चाल मिळाली. मात्र तुषार आहेर या महाराष्ट्राच्या खेळाडूचे आव्हान राजस्थानच्या गजेन चौधरी याने संपुष्टात आणले.

# तेजस, ऐश्वर्याला विक्रमी सुवर्णपदक

### ३८ वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, उत्तराखंड
### सिद्धांत थिंगलियाचे रौप्यपदक हुकले

◆ **डेहराडून, ९ फेब्रुवारी**

प्रबळ दावेदार असलेल्या महाराष्ट्राच्या तेजस शिर्से याने ११० मीटर अडथळ्याच्या शर्यतीत लौकिकास साजेशी कामगिरी करत ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत विक्रमासह सुवर्णपदकावर नाव कोरले. मात्र, छत्रपती संभाजीनगरच्या तेजसला तुल्यबळ लढत देणारा महाराष्ट्राचा सिद्धांत थिंगलिया (मुंबई) अर्ध्या शर्यतीत अडखळून खाली पडल्यामुळे त्याचे रौप्यपदक हुकले. महिलांच्या ४०० मीटर शर्यतीत मुंबईची ऐश्वर्या मिश्रा हिने नवीन स्पर्धा विक्रमासह सुवर्णपदकाला गवसणी घातली.



गंगा आंतरराष्ट्रीय ॲथ्लिट स्टेडियममध्ये रंगलेल्या या लढतीत तेजस शिर्से याने १३.६५ सेकंद वेळेसह निर्विवाद वर्चस्व गाजवीत नव्या स्पर्धा विक्रमासह सुवर्ण पदकावर आपले नाव कोरले. त्याने याआधीचा राष्ट्रीय स्पर्धेतील स्वतःचा २०१५ साली केलेला १३.७१ सेकंद वेळेचा विक्रम मोडीत काढला. मात्र, त्याच्या पाठोपाठ धावणारा त्याचा सहकारी सिद्धांत थिंगलिया तीन अडथळे शिल्लक असताना अडखळून खाली पडला अन् त्याचे पदक जिंकण्याचे स्वप्न क्षणात धुळीस मिळाले. या गडबडीत तमिळनाडूच्या आर.मानव याने १४.०३ सेकंद वेळेसह रौप्यपदक जिंकले, तर केरळच्या महंमद लाझान याने १४.२३ सेकंद वेळेसह कांस्यपदक जिंकले.

महिलांच्या ४०० मीटर्स शर्यतीत ऐश्वर्या मिश्रा हिने स्वःतचाच स्पर्धा विक्रम मोडीत काढत ५१.१२ सेकंद सुवर्णपदकावर मोहोर उमटवली.



या प्रकारातील राष्ट्रीय विक्रम हिमा दास हिच्या नावावर अबाधित आहे. तिने तो २०१८ साली केला होता. ऐश्वयनि या स्पर्धेत २०२२ मध्ये केलेला ५२.५० सेकंद वेळेचा विक्रम स्वतः मोडीत काढला. तमिळनाडूच्या विथया रामराज हिने ५४.४३ सेकंद वेळेसह रौप्य, तर गुजरातच्या देवयानी झाला हिने ५४.४४ सेकंद वेळेसह कांस्यपदक मिळविले.

**सुवर्णपदकाची खात्री होती : तेजस**

मला ही शर्यत जिंकण्याचा सुरुवाती पासूनच आत्मविश्वास होता. तरीही माझा सहकारी सिद्धांत थिंगलिया याच्याकडून मला चिवट लढत अपेक्षित होती. दुर्दैवाने मध्येच पडल्यामुळे सिध्दांत याला शर्यत अर्धवट सोडावी लागली. अन्यथा अधिक चांगल्या वेळेत मी ही शर्यत जिंकली असती, असे सांगून ११० मीटर्स हर्डल्स विजेता तेजस म्हणाला, अर्थात येथील सुवर्णपदकाचा मला विशेष आनंद झाला आहे. कारण मी महाराष्ट्राला हे यश मिळवून दिले आहे. आशियाई इनडोअर स्पर्धेतील विजेतेपदाचा मला येथे फायदा झाला. भावी करिअरसाठी येथील यश मला प्रेरणादायी ठरणार आहे. पुढील वर्षी होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्याचे माझे ध्येय आहे, असे तो म्हणाला.

**मोसमाची सुरुवात सोनेरी यशाने झाली : ऐश्वर्या**

ऐश्वर्या ही मुंबईतील कांदिवली येथे असलेल्या भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या प्रशिक्षण केंद्रात सुमित सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते सन २०२२ मध्ये झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक जिंकले होते. २५ वर्षीय खेळाडू ऐश्वर्या हिची राज्य शासनाने नुकतीच जिल्हा क्रीडा अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. प्रत्येकाला आपल्या स्पर्धात्मक मोसमाची सुरुवात सर्वोच्च यशाद्वारे असे वाटत असते आणि मी देखील त्यास अपवाद नाही. येथे मला सुवर्णपदक मिळाल्यामुळे खूपच आनंद झाला आहे. या सुवर्णपदकामुळेच माझ्या यंदाच्या मोसमाची सुरुवात झाली आहे असे ४०० मीटर्स धावण्याच्या शर्यतीत विजेतेपद मिळवणारी ऐश्वर्या मिश्रा हिने सांगितले. मला यंदा अनेक स्पर्धांमध्ये भाग घेत पुढील वर्षी होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी पात्रता करण्याचे माझे नियोजन आहे कारण आशियाई क्रीडा स्पर्धेत पदक मिळवण्याचे माझे ध्येय आहे असे ऐश्वर्या हिने सांगितले. (वृत्तसंस्था)

# मानांकित खेळाडूंची विजयी सलामी

### 'शिवछत्रपती चषक' बुद्धिबळ स्पर्धा खेळाडूंचा उत्स्फुर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

'शिवछत्रपती चषक' बुद्धिबळ स्पर्धेत मानांकित खेळाडूंनी विजयी सलामी दिली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शंभूराजे बहुउद्देशीय संस्था, श्री. रामराव शिंदे मित्र परिवार व सोलापुर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने आयोजीत केलेल्या या स्पर्धेत खुल्या, १२ व ८ वर्षाखालील गटात १८ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंसह सोलापुर व जिल्हयासह धाराशिव येथील १८३ खेळाडूंनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

पहिल्या फेरीत अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय खेळाडू मानस गायकवाड, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त विजय पंगुडवाले, भारत संचार निगमचा राष्ट्रीय खेळाडू चंद्रशेखर बसारगीकर, बार्शीचा शंकर साळुंके, प्रसन्न जगदाळे, दत्तात्रय गोरे, आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वराली हातवळणे, अमित मुदगुंडी, प्रज्वल कोरे यांनी खुल्या गटात



विजयी सलामी दिली तर १२ वर्षाखालील गटात मानांकित आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त वेदांत मुसळे, बार्शीची सानवी गोरे, श्रेयस कुदळे, पृथा ठोंबरे, मनस्वी क्षिरसागर यांनी आकर्षक विजय मिळविले. तसेच ८ वर्षाखालील गटात नमन रंगरेज, नियान कंदीकटला, पाच वर्षीय मिश्का चीट्टे या उदयोन्मुख खेळाडूंसह जिल्हा परिषद शाळेतील अंशुमन गायकवाड, सिद्धांत कसबे, संस्कृती चंदनशिवे, पंचशीला शिंदे यांनीदेखील उत्कृष्ट खेळ केला.

स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर जिल्हा प्राथमिक पतसंस्थेचे चेअरमन तानाजी गुंड व महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनाचे जिल्हाध्यक्ष राम राव शिंदे यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने झाली. यावेळी बार्शीचे दत्तात्रय गोरे, माजी चेअरमन राजन ढवण, स्वाभिमानी शिक्षक परिवाराचे नेते उमाजी जाधव, जुनी पेन्शन संघटनेचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष राजेंद्र सूर्यवंशी, सहकार्याध्यक्ष विक्रम जाधव, टाकळीकर मंगल कार्यालयाच्या व्यवस्थापिका नीलम उपाध्ये, आंतरराष्ट्रीय पंच व संस्थेचे सचिव सुमुख गायकवाड, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, वरिष्ठ राष्ट्रीय बुद्धिबळ पंच उदय वगरे, रोहिणी तुम्मा, यश इंगळे, पद्मजा घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. संतोष पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

# ऑस्ट्रेलियाने १४ वर्षानंतर श्रीलंकेत पहिल्यांदाच कसोटी मालिका जिंकली

◆ **गॅले, ९ फेब्रुवारी**

ऑस्ट्रेलियाने रविवारी गॅले येथे दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात चौथ्या दिवशी श्रीलंकेवर ९ गड्यांनी विजय नोंदवून दोन सामन्यांची कसोटी मालिका २-० ने जिंकली. ऑस्ट्रेलियाने १४ वर्षानंतर श्रीलंकेत पहिल्यांदाच कसोटी मालिका जिंकली




मालिका विजयाच्या चषकासह ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू

चौथ्या दिवशी दुपारच्या जेवणाच्या केवळ १५ मिनिटांपूर्वी श्रीलंकेच्या दिमुथ करुणारत्नेच्या चेंडूला मिडविकेटकडे हाणत फलंदाज मार्नस लाबुशेनने एक धाव घेत ऑस्ट्रेलियाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. १५६ धावांची दीडशतकी खेळी करणारा ॲलेक्स कॅरी सामनावीर, तर मालिकेत एकूण २७२ धावा काढणारा ऑस्ट्रेलियाचा हंगामी कर्णधार स्टीव्ह स्मिथ मालिकावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

श्रीलंकेला पहिल्या डावात २५७ धावांत गुंडाळल्यानंतर ऑस्ट्रेलियाने प्रत्युत्तरात ४१४ धावांचा डोंगर उभा केला. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात १५७ धावांची आघाडी मिळविली. श्रीलंकेने ८ बाद २११ धावांवरून पुढे चौथ्या दिवसाच्या खेळाला सुरवात केली व त्यांचा दुसरा डाव ६८.१ षटकांत २३१ धावांतच आटोपला, त्यामुळे ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ७५ धावा काढण्याचे सोपे लक्ष्य राहिले.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना उस्मान ख्वाजा व ट्रॅव्हिस हेडने (२०) पहिल्या गड्यासाठी ३८ धावांची भागीदारी केली. त्यानंतर उस्मान (नाबाद २७) व मार्नस लॅबुशेनने (नाबाद २६) नाबाद खेळी करत ऑस्ट्रेलियाचा विजय साकार केला.

२०११ नंतर ऑस्ट्रेलियाचा श्रीलंकेच्या भूमीवर हा पहिलाच कसोटी मालिका विजय आहे. येथे ऑस्ट्रेलिया संघाला शेवटचे यश रिकी पॉण्टिंगच्या नेतृत्वाखाली मिळाले होते, २०११ मध्ये ऑस्ट्रेलियाने १-० ने मालिकेत विजय मिळविला होता.

तथापि, २०१६ मध्ये स्टीव्ह स्मिथच्या नेतृत्वाखालील ऑस्ट्रेलियन संघाचा ३-० ने सफाया झाला होता व २०२२ ची मालिका १-१ अशी बरोबरीत राहिली होती. संपली. यावेळी पॅट कमिन्सच्या अनुपस्थितीत स्मिथने हंगामी कर्णधार म्हणून खेळत ऑस्ट्रेलियाला मालिका विजय मिळवून दिला. ऑस्ट्रेलियाने श्रीलंकेविरुद्धचा पहिला कसोटी सामना एक डाव आणि २४२ धावांनी जिंकला होता. हा श्रीलंकेचा आतापर्यंतचा सर्वात मोठा कसोटी पराभव होता. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### नीलमनगर येथील नेताजी मराठी प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मराठी प्राथमिक शाळेत बाल आनंद मेळावा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते .प्रमुख अतिथी शेळगी केंद्राचे केंद्रप्रमुख विकास पाटील यांच्या हस्ते आनंद मेळाव्याचे उदघाटन करण्यात आले.यावेळी नेताजी हायस्कूलचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, राजराजेश्वरी मराठी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले, माता पालक संघाच्या सदस्या कल्पना झिपटे, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार उपस्थित होते.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजनानंतर विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले. मेळाव्यात कब बुलबुल पथकाने तयार केलेल्या खाऊचे झाड आकर्षक दिसत होते. रिया बारड या पहिलीच्या मुलीने माझ्या अंगणात हे गीत सादर करुन उपस्थिताकडून वाहवा मिळवली. बुलबुल पथकाने पाहुण्यांना बडी सलामी दिली. यावेळी केंद्रप्रमुख विकास पाटील म्हणाले, पालकांनी विद्यार्थ्यांच्या अशा लहान- सहान उपक्रमाला प्रेरणा देत रहावे. यातूनच मुले आत्तापासूनच विविध कौशल्य शिकतात. कृपया पालकांनी विद्यार्थ्यांचे आनंद हिरावून घेऊ नये असे आवाहन केले. संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार म्हणाले, विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी नेताजी प्राथमिक शाळेत वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात.

### रामवाडीतील न्यू धोंडीबा वस्तीत घरफोडी

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

न्यू धोंडीबा वस्ती रामवाडी येथील राजू हनुमंत तलवार यांच्या घराची घरफोडी होऊन चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडून घरातील सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना ४ ते ५ फेब्रुवारी दरम्यान घडली. याबाबत अधिक माहिती अशी की,राजू हनुमंत तलवार हे बाहेर गेले असताना अज्ञात चोराने घराचा दरवाजा तोडून घरातील सोन्याची बोरमाळ, सोन्याची अंगठी, चांदीचे ब्रेसलेट असा जवळपास ५० हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल उडाणशिव हे करत आहेत.

### न्यास मंदिर यात्रा उत्सवाच्या अध्यक्षपदी रोहन यमगर



**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

गवळी वस्ती येथील श्री मायाक्कादेवी समाजसेवी न्यास मंदिराच्या यात्रा उत्सव समितीच्या अध्यक्षपदी रोहन यमगर यांची निवड करण्यात आली. देवीची यात्रा ११ फेब्रुवारी रोजी होणार असून सकाळी ७ वाजता अभिषेक, सायंकाळी ५ वाजता पूजा व महाप्रसादाचे वाटप होणार आहे. रात्री ८ वाजता धनगरी ओव्यांचा कार्यक्रम होणार आहे. इतर पदाधिकारी याप्रमाणे-उपाध्यक्ष : तानाजी ढेकळे, मिरवणूक प्रमुख बुवा कचरे, शंकर कारंडे, विलास कारंडे, प्रशांत मोरखाने, सचिव : बाजीराव कचरे, सल्लागार पदी आनंद पुकाळे, लखन कारंडे, शशिकांत माने, सुरेश माने, बिरु खरात, रवि खरात, नागनाथ मळगे, विजू लवटे, पप्पू बंडगर, कृष्णा आगलावे, किरण यमगर, योगेश माने, महेश गावडे, पांडू खांडेकर, अरुण सलगर, किरण वाघमोडे.

### आशालता मस्के यांना रमाईची लेक पुरस्कार जाहीर; आज वितरण



**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

रमाईची लेक या पुरस्कारासाठी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या परिचारिका आशालता मस्के यांची निवड झाली आहे. रमाई सेवाभावी बहुउद्देशिय सामाजिक शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा देऊन सन्मान करण्यात येतो. सोमवारी १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता फडकुले सभागृह, सिद्धेश्वर मंदिर जवळ, सोलापूर येथे याचे वितरण होईल. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन प्रा. डॉ. आयेशा रंगरेज, फायनान्स ॲडव्हायजर सपना चिट्टे, सदस्य प्रा. डॉ. विजया महाजन, डॉ. राजीव प्रधान, डॉ. गौरी कहाते व शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### राहुल सोलापूरकरवर कठोर कारवाई करण्याची राष्ट्रवादीची मागणी

**बार्शी, दि.९ फेब्रुवारी-**

अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजह'बद्दल अपशब्द वापरले. याचा तीव्र जाहीर निषेध करत राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने तहसीलदार बार्शी यांना कारवाईचे निवेदन देण्यात आले. राहुल सोलापूरकर यांच्यावर त्वरित कठोर कारवाई करा अन्यथा तीव्र रास्ता रोको आंदोलन असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव शिरीष ताटे, शहराध्यक्ष मुज्जमिल पठाण, प्रेम शेंडेगे, निलेश मुद्दे, आतिश गायकवाड, नवाज मुलाणी, यशवंत जाधव, अमर पाटील, समाधान पवार, फैजान सौदागर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### सुधाकर वेळापुरे यांचे निधन



**पिलीव, दि. ९ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील सुप्रसिद्ध कापडाचे व्यापारी सुधाकर रामचंद्र वेळापुरे (वय ८४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, दोन बहिणी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# सरकारचा पर्यटनातून रोजगार निर्मितीचा प्रयत्न

## माजी प्राचार्य डॉ. किसन झिपरे : अक्कलकोटमधील दोन दिवशीय राष्ट्रीय पर्यटन परिषदेचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ फेब्रुवारी-**

राज्य सरकार विविध ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळसारख्या ठिकाणी जलक्रीडा प्रोत्साहनासाठी पायाभूत सुविधा विकसित करत आहे. सरकार पर्यटनाद्वारे रोजगार निर्मिती करण्याचा प्रयत्न करत असून याचा बेरोजगार तरुणांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री स्वामी समर्थ राजेराय मठाचे सचिव माजी प्राचार्य डॉ. किसन झिपरे यांनी केले.

अक्कलकोट एज्युकेशन सोसायटी संचलित सी. बी. खेडगी महाविद्यालयात भूगोल विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, पीएम उषा प्रायोजित आणि महाराष्ट्र भूगोलशास्त्र परिषद, पुणे आणि सोलापूर शिक्षक भूगोल संघ, मराठवाडा भूगोल संघ लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय पर्यटन परिषदेच्या समारोपप्रसंगी डॉ. झिपरे बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव सुभाष धरणे हे होते. व्यासपीठावर



श्री स्वामी समर्थ राजेराय मठाचे अध्यक्ष शरद फुटाणे, प्राचार्य डॉ. शिवराय अडवितोट उपस्थित होते. डॉ. झिपरे पुढे म्हणाले, सध्या देशात विशेषता महाराष्ट्रात तीर्थक्षेत्र अक्कलकोटसह पंढरपूर, तुळजापूर, सोलापूर, शिर्डी, शेगाव, कोकणचा भाग, महाबळेश्वरचा रम्य ठिकाणांसह श्रीक्षेत्र गाणगापूर येथे पर्यटनाला मोठा वाव आला आहे. यासाठी बेरोजगार तरुणांनी पर्यटनाच्या माध्यमातून विविध व्यवसाय धंदा करून फायदा घेणे महत्त्वाचे आहे. पर्यटन ठिकाणी सध्या विविध व्यवसायाला चालना मिळत आहे. सामान्यांपासून ते वृद्धापर्यंत सर्वांना रोजगार सहजपणे या पर्यटनाच्या माध्यमातून उपलब्ध होत आहे. पर्यटन स्थळी पर्यटकांचे समाधान करणे महत्त्वाचे असल्याचेही डॉ. झिपरे यांनी बोलताना सांगितले.

यावेळी शरद फुटाणे म्हणाले, ग्रामीण भागात असलेल्या हेमाडपंथी, धार्मिक ,सांस्कृतिक, पर्यटनाचा प्रसार आणि प्रचार विद्यार्थ्यांनी करावा आणि आपल्या गावांसह राज्याचा विकास पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात करण्याचे आवाहन केले. या परिषदेत १३२ संशोधन लेख प्राप्त झालेले असून ते प्रकाशन ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. अशा संशोधन लेखामुळे पर्यटनाच्या नियोजनगकरता उपयोग करून घेण्यात येईल अशी माहिती डॉ. भैरप्पा कोणदे यांनी सांगितले.

या परिषदेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे संशोधक, पदव्युत्तर विद्यार्थी, पदवी विद्यार्थी व प्राध्यापक या गटातून संशोधन पेपर स्पर्धा देण्यात आले होते. त्यामध्ये यश प्राप्त झालेल्या संशोधकांना महाविद्यालयाच्या वतीने सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आल्याची माहिती डॉ. लता हिंडोळे यांनी दिली. यावेळी सोलापूरचे डॉ. वीरभद्र दंडे, मुरूमचे कदम, प्रशांत खांडेकर आदींनी मनोगत व्यक्त केले

. या परिषदेमध्ये विविध महाविद्यालयातील १०० हून अधिक संशोधक, विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. लता हिंडोळे यांनी केले. डॉ. अंकुश शिंदे यांनी आभार मानले.

### नव्या संशोधकांना मिळाली दिशा

राष्ट्रीय पर्यटन परिषद यशस्वी झालेली असून या परिषदेमध्ये चर्चेत घेण्यात आलेल्या पर्यटनामुळे कायमस्वरुपी विकासाच्या संकल्पनेतील काही संकल्पना उदाहरणार्थ भूक, दारिद्रय, स्वच्छ पाणी अशा विषयांवर पर्यटनामध्ये चर्चा करण्यात आली आहे. या परिषदेचे फलनिष्पत्ती म्हणजे नवीन संशोधकांना कशा पद्धतीने संशोधन करावे याची दिशा प्राप्त झालेली आहे, असे प्राचार्य डॉ. शिवराय आडवीतोटे यांनी सांगितले.

# आनंदी जीवन जगण्यासाठी साधना महत्त्वाची

## शुभांगी पाटणे : मंगळवेढा येथे आनंदी जीवनावर मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ९ फेब्रुवारी-**

जीवनामध्ये प्रत्येकालाच आनंद हवा असतो पण आज आपण पाहत आहोत की मनुष्याला जीवन जगताना अनेक समस्या भेडसावत असल्याने बहुतेक करून आपल्या जीवनामध्ये दुःखच पुष्कळ प्रमाणात आहे, म्हणूनच जीवन जगण्याचा आनंद घ्यायचा असेल तर जीवनामध्ये साधनेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे स्पष्ट मत सांगोला येथील सनातन संस्थेच्या साधिका शुभांगी पाटणे यांनी व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर संतोष पाटणे सर उपस्थित होते. मंगळवेढा येथे चोखामेळा नगर येथील वारकरी भवन येथे रविवार, ९ फेब्रुवारी या दिवशी आयोजित मार्गदर्शनात त्या बोलत होत्या. यावेळी पुष्कळ प्रमाणात महिला आणि पुरुष उपस्थित होते. शुभांगी पाटणे पुढे म्हणाल्या की, जीवनात जवळपास ८० टक्के दुःखच असते. त्यासाठी आपण साधना करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण कुलदेवता आणि पूर्वजांचे त्रास निवारणासाठी श्री गुरुदेव दत्त




हा नामजप करायला हवा. नामजप केल्याने आपली साधना होऊन आपल्या जीवनातील समस्यांवर मात करण्यासाठी बळही मिळते. त्यासाठी जीवनात आनंदी होण्यासाठी साधनाच आवश्यक असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले. यावेळी अनेक महिला पुरुष जिज्ञासूनी आम्हाला नियमित सत्संग हवा आहे, अशी मागणी केली. सूत्रसंचालन सनातन संस्थेच्या साधिका वैशाली वठारे यांनी केले. यावेळी सनातन संस्थेचे वतीने लावण्यात आलेल्या ग्रंथ व सात्विक उत्पादन प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभार्थी नोंदणी मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ९ फेब्रुवारी-**

शासनामार्फत प्रधानमंत्री आवास योजना २.० घोषणा सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने इच्छुक लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळण्याकरिता सांगोले नगरपरिषदे मार्फत PMY UNIFIED WEB PORTL वर नवीन लाभार्थी नोंदणी मेळावा आयोजित करण्यात आला होता.

या मेळाव्यामध्ये एकूण ४५ लाभार्थ्यांची नोंदणी पोर्टलवर करण्यात आली आहे. सदर मेळावा यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापत्य अभियंता अमित कोरे, सिटी कॉर्डिनेटर नवज्योत ठोकळे, शरद थोरात यांनी परिश्रम घेतले. प्रत्येक नागरिकाचे स्वतःचे पक्क्या घराचे



प्रधानमंत्री आवास योजना १.० मधून लाभार्थ्यांचे घराचे स्वप्न साकार झालेले आहेत. प्रधानमंत्री आवास योजना २.० च्या अंमलबजावणीस सुरुवात झालेली असून मार्च २०२५ पर्यंत लाभार्थी नोंदणी करण्यात येणार आहे. ज्या नागरिकांना योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे, अशा लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री आवास योजना कक्ष येथे संपर्क साधावा.

**- डॉ. सुधीर गवळी, मुख्याधिकारी, नगरपरिषद, सांगोला**

स्वप्न पूर्ण होण्याकरिता प्रधानमंत्री आवास योजनेची सुरुवात २०१५ साली करण्यात आली. प्रथम टप्प्यात सांगोले शहरांमध्ये एकूण २८० घरे मंजूर झाली आहेत. मंजूर घरांपैकी २१० घरांची कामे पूर्ण झालेली असून उर्वरित घरेही प्रगतीपथावर आहेत.

# उन्हाळी फळांची बाजारपेठेत आवक

## कलिंगड, खरबूजसह द्राक्षांना वाढती मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरामध्ये गेल्या काही दिवसांपासून उन्हाळी फळांची आवक वाढलेली दिसत आहे. शहरातील विविध बाजारपेठांमध्ये कलिंगड, खरबूज आणि द्राक्षांना ग्राहकांमधून पसंती दर्शवली जात आहे. शहराच्या मध्यवर्ती बाजारपेठांमध्ये कलिंगडाचे डोंगर रचलेले यावेळी पहावयास मिळत आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये उन्हाळी फळांची आवक होत आहे. सध्या आवक प्रमाणात असल्याने कलिंगड आणि खरबूज यांचे दर प्रती नग हे वधारलेले आहेत. उच्च प्रतीच्या फळांना चांगला दर मिळत आहे. कलिंगड ३० रुपयांपासून ते ६० रुपयांपर्यंत प्रति नग विकला जात आहे. तर खरबूज देखील १०० रुपयांना तीन नग याप्रमाणे विक्री केल्या जात आहे. त्याचप्रमाणे गोड अशा हिरव्या द्राक्षांचे दर हे शंभर रुपये दीड



### बाजार समितीत कलिंगड, खरबूज आणि द्राक्षांची आवक

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कलिंगड खरबूज आणि द्राक्ष यांची आवक होत आहे. उन्हाळ्याच्या अगोदरच शेतकरी या फळांची आपल्या शेतामध्ये लागवड करतात. ऐन मौसमामध्ये फळे तोडणीला आल्यानंतर विक्रीसाठी बाजारपेठेत आणले जातात. सध्या फळांचे दर हे वाढलेले आहेत. आवक वाढल्यानंतर दर कमी होतील.

**- शैलजा पाटील, विक्रेते**



### फळांच्या दरामध्ये वाढ

उन्हाळ्यामध्ये आपल्या शरीरातील पाणी टिकून राहावे यासाठी, कलिंगड खरबूज द्राक्ष अशा फळांचे सेवन केले जाते. डीहायड्रेशन होऊ नये यासाठी, फळांचे सेवन करणे गरजेचे आहे. सध्या फळांचे दर हे वाढलेले आहेत. काही दिवसानंतर दर कमी होतील असा अंदाज आहे. **- बंडू जाधव, ग्राहक**

किलो याप्रमाणे आहेत. उन्हाळ्यात कलिंगड खरबूज आणि द्राक्ष यांना सर्वाधिक मागणी असते. पाणीदार फळे खाण्याकडे ग्राहकांचा कल असतो. अशातच रमजान हा सण देखील दृष्टिक्षेपात आला आहे. त्यामुळे फळांची आवक इथून पुढे वाढेल असा अंदाज वर्तवला जात आहे.



# श्राविका, सुमतीबाई स्कूलला दुहेरी मुकुट

## आंतरशालेय सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

शालेय सांघिक सुर्यनमस्कार स्पर्धेत चुतरबाई श्राविकाने विद्यालयाने पहिली ते चौथी मुले व मुलींच्या गटात तर पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी मुलांच्या गटात सुमतीबाई स्कूलने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

सोलापूर जिल्हा योग परिषद, इनरव्हील क्लब ऑफ सोलापूर हार्मनी व योगसाधना मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरशालेय सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धेत १९ शाळांच्या ६१ संघांनी सहभाग नोंदवला. यात स्पर्धक ६८० सहभागी होते. विविध तीन वयोगटात मुले व मुलींसाठी या स्पर्धा घेण्यात आल्या. पारितोषिक वितरण लता शिवशंकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी शालेय राष्ट्रीय सुवर्णपदक प्राप्त अमृता सरगुलेचा विशेष सत्कार करण्यात आला.

**अंतिम निकाल (प्रथम तीन)** : पहिली ते चौथी : मुले - चतुरबाई श्राविका, पी एस इंग्लिश मीडियम, रा. न. इपाकायल. मुली- चतुरबाई श्राविका, रा. न. इप्पाकायल, पी. एस. इंग्लिश मीडियम.

**पाचवी ते सातवी :** मुले- पी. एस. इंग्लिश मीडियम, विवेकानंद पब्लिक स्कूल, रा. न इप्पाकायल. मुली- रा न इप्पाकायल,पी एस इंग्लिश मीडियम, बी एफ दमाणी.

**आठवी ते दहावी :** मुले- पी. एस. इंग्लिश मीडियम, जैन गुरुकुल, वि. मो. मेहता. मुली - वि. मो. मेहता, पी. एस. इंग्लिश मीडियम, भू.म. पुल्ली कन्या प्रशाला.

# समाजाच्या कल्याणासाठीच संतांचे जगणे

## राघवेंद्र देशपांडे : श्रीपूर येथे ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचा जन्मोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि. ९ फेब्रुवारी-**

आज सामाजिक जीवनात माणसांच्या जाणीवा बोथट होत असल्याचे चित्र दिसते. यामध्ये पूर्वीची आपली एकत्र व एक मेकांबद्दल ममत्व असणारी कुटुंब व्यवस्था लोप पावत आहे, अशी विदारक सामाजिक स्थिती फक्त संतांनी केलेल्या उपदेशाचे पालन केल्यानेच सुधारू शकणार आहे, असे प्रतिपादन राघवेंद्र देशपांडे महाराज यांनी केले.

श्रीपूर येथे श्रीराम भजनी मंडळाच्या माध्यमातून ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

धन्य ते संसारी दयावंत जे अंतरी या जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगावर निरूपण करताना ते बोलत होते. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या जीवनाकडे पाहता प्रथम समाजाने त्यांची हेटाळणी केली. आतोनात त्रास दिला. परंतु केवळ समाजाच्या कल्याणासाठी हे सर्व सोसून उलट पक्षी समाजाच्या कल्याणासाठी प्रसंगी देहही झिझवला. आपल्या निरुपणात त्यांनी संत रामदास स्वामी, संत एकनाथ, संत गजानन महाराज व संत गोंदवलेकर महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. तीन दिवसीय झालेल्या या सोहळ्यात श्रीराम मुळे, शंकर ब्रम्हे यांनीही कीर्तन सेवा बजावली. महोत्सव साजरा करण्यासाठी हरिभाऊ कुलकर्णी, हरी वसेकर, तुकाराम केसकर, बापूराव मोकाशी, मिलिंद कुलकर्णी, धनंजय पाठक, बाळासाहेब पोळ, संतोष जोशी, तुकाराम सुमंत यांनी परिश्रम घेतले.

### रौप्य महोत्सवी वाटलाल साधी बाब नाही

सामाजिक अनास्थेच्या काळात समाज प्रबोधनाचे प्रभावी साधन म्हणून कीर्तन, प्रवचनाच्या माध्यमातून संताचे चरित्र समाजा पुढे आणणे महत्वाची बाब आहे. हे ओळखून येथील श्रीराम भक्त मंडळ अविरतपणे २५ वर्ष काम करीत आहे. ही सामान्य बाब नाही. समाजाने या कार्याची दखल घेऊन हे काम पुढे नेटाने चालवणे ही गरजेची बाब आहे.

**-शंकर ब्रम्हे, कीर्तनकार, पुणे**



# सरळ सेवा भरती अडकली न्यायालयीन प्रक्रियेत



## जि.प.तील ६७४ पैकी २५७ जागा अद्यापही रिक्तच?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**

शासनाच्या आदेशानुसार २०२३ रोजी झालेल्या सरळ सेवा भरतीत सोलापूर जिल्हा परिषदेकडून ६७४ रिक्त जागा भरतीसाठी जाहिरात काढण्यात आली होती. त्यापैकी ४१७ उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या. मात्र पदभरतीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न होणे, न्यायालयीन प्रक्रिया व आरक्षणाअंतर्गत उमेदवाराची उपलब्धता नसणे या तीन कारणांमुळे ६७४ पैकी सरळ सेवा भरतीत झेडपीतील २५७ जागा रिक्त राहिल्या आहेत.

दरम्यान, २०१४ साली शासनाच्या वतीने सरळ सेवा भरतीची प्रक्रिया पार पाडण्यात आली होती. त्यानंतर २०१९ साली सरळ सेवा भरतीची जाहिरात देण्यात आली. यासंदर्भात विविध पदांसाठी पात्र उमेदवाराकडून अर्जही भरण्यात आले. मात्र ती भरती ऐनवेळी रद्द करण्यात आली. दरम्यान, तब्बल नऊ वर्षांनंतर म्हणजे २०२३ साली भरती प्रक्रिया राबविण्यात आली. या भरती अंतर्गत सोलापूर जिल्हा परिषदेच्या विविध १७ संवर्गातील ६७४ जागा भरण्यासाठी जाहिरात काढण्यात आली.

गट-क मधील सरळ सेवेने आरोग्य विभागाकडील शंभर टक्के तर इतर विभागाकडील ८० टक्के रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली. आरोग्य विभागाकडील आरोग्य सेवक (पुरुष) या संवर्गातील ६४ जागा भरण्यात येणार होत्या. या विरोधात काही उमेदवार न्यायालयात गेल्याने या जागांवर भरती झालीच नाही, आरोग्य सेविका महिला या संवर्गातील ३०० जागा भरण्यात येणार होत्या. मात्र केवळ १२५ पात्र उमेदवार उपलब्ध झाल्याने १७५ जागा रिक्त राहिल्या आहेत. कनिष्ठ आरेखक या संवर्गाच्या दोन जागा सरळसेवा भरतीतून भरण्यात येणार होत्या. मात्र यासाठी एक पात्र उमेदवार उपलब्ध झाला. त्यामुळे या संवर्गातील एक जागा रिक्त राहिली आहे. या भरतीत माजी सैनिकांसाठी एकूण जागांच्या १५ जागा आरक्षित ठेवण्यात आल्या होत्या. त्यासाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने शासनाच्या निर्देशानुसार त्या जागा आता गुणवत्तेनुसार प्रतीक्षा यादीतील पात्र उमेदवारातून भरण्यात येणार आहेत.

### पदभरतीची स्थिती याप्रमाणे

६७४ उमेदवारांच्या भरतीसाठी जाहीरात काढण्यात आली
४१७ उमेदवारांना देण्यात नियुक्त्या देण्यात आल्या.
१७ माजी सैनिक, पात्र उमेदवार न मिळाल्याने जागा रिक्त.
१७५ आरोग्य सेविका, पात्र उमेदवार न मिळाल्याने जागा रिक्त.
६४ आरोग्य सेवक पुरुष उमेदवार न मिळाल्याने जागा रिक्त.
०१ कनिष्ठ आरेखक पात्र उमेदवार न मिळाल्याने जागा रिक्त.

### सरळ सेवा भरती संवर्गनिहाय जागा

आरोग्य सेवक (पुरुष) - ३३, आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के - ६४, आरोग्य सेवक (महिला) ३००, औषध निर्माण अधिकारी - १९, कंत्राटी ग्रामसेवक - ७४, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ग्रा.पा.पु.) - ३४, कनिष्ठ आरेखक - ०२, कनिष्ठ यांत्रिकी - ०१, कनिष्ठ लेखाधिकारी - ०१, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) - ३१, पर्यवेक्षिका - ०६, पशुधन पर्यवेक्षक - ३०, लघुलेखक निम्न श्रेणी-१, वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) - ०५, वरिष्ठ सहाय्यक लेखा-०४, विस्तार अधिकारी (शिक्षण) - ०७, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम/लघुपाटबंधारे) - ६२. एकूण जागा -६७४.

# नेहरू नगर शासकीय मैदानावर वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

एक्सिस मॅक्स लाइफ इन्शुरन्स सोलापूर शाखा व न्यू जॉगर्स फाउंडेशन, नेहरूनगर शासकीय मैदान यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपनाचा कार्यक्रम नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर पार पडला.

मैदानाच्या बाजूला १५ ते २० रोपांची लागवड करण्यात आली. हा वृक्षारोपन कार्यक्रम



एक्सिस मॅक्स लाइफ कंपनी तर्फे मॅनेजर गिरीश कोरे, रोहित किणीकर, श्याम अरगडे, प्रशांत कुलकर्णी, उज्ज्वलकुमार हुल्ले आणि सर्व स्टाफ तसेच ॲडव्हायझर सुनील राजूरवार, सुदेश तापडिया, केदार होमकर, समीर कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

हे वृक्षारोपन करण्यासाठी न्यू जॉगर्स फाउंडेशनचे अध्यक्ष सुहास साळुंखे, कार्याध्यक्ष उन्मेश कमलापुरे, खजिनदार दिलीप कदम, शिवशंकर लालसिंगे, माजी अध्यक्ष संतोष कदम यांचे मार्गदर्शन लाभले.


# श्री तुळजाभवानी मंदिरातील 'गोमुख तीर्थकुंडाचा' झरा सुरु झाल्याने देवीभक्तांत आनंदाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या आई श्री तुळजाभवानी मातेच्या मंदिरात गोमुख अथवा गायमुख तीर्थकुंड हे पुरातन व पवित्र असे तीर्थस्थान असून, त्याचा उल्लेख पुराणग्रंथात सापडतो. त्या गोमुखतीर्थाचा नैसर्गिक पाण्याचा झरा गेल्या ३५ वर्षांपासून बंद होता. मंदिर संस्थानच्या वतीने सध्या मंदिर परिसरातील विविध विकासकामे सुरू केली असून, यामध्ये तीर्थकुंडाचे काम सुरू असताना १९८८ पासून बंद असलेला गोमुख तीर्थकुंडाचा नैसर्गिक पाण्याचा झरा पुन्हा नव्याने सुरू झाला असल्याने भाविकांत अत्यंत उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पसरले आहे.

पाण्यातील क्षारामुळे झऱ्याचा नैसर्गिक मार्ग बंद झाला होता तसेच झऱ्याच्या मार्गात १९८६ सालची नाणी आढळून आली आहेत. झऱ्याच्या मार्गातील क्षार आणि आसपासचा थर काढण्यात आला आहे. तसेच, झऱ्याच्या मार्गातील जुनी नाणी काढण्यात आल्यानंतर हा बंद असलेला पाण्याचा झरा पुन्हा एकदा नव्याने सुरू झाला आहे. बालाघाटच्या डोंगर रांगातील पाणी नैसर्गिकरित्या या झऱ्यातून देवीच्या मंदिरात पोहोचते. हे पाणी थेट काशीतून तुळजापुरात येत असल्याची जुनी अख्यायिकाही आहे. यामुळे या पवित्र गोमुख तीर्थाने पावन होण्यासाठी पुन्हा भाविकांची गोमुख तीर्थकुंडावर गर्दी होवू लागली आहे. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे. ही देवी भगवती (भवानी) म्हणून प्रसिद्ध आहे. महाराष्ट्र क्षात्रतेजाची स्फूर्ती देवता, प्रेरणाशक्ती व स्वराज्य संस्थापक राजे श्री शिवछत्रपती यांची आराध्यदेवता अशी ही तुळजापूरची श्री भवानीदेवी महाराष्ट्राची कुलस्वामीनी आहे. हे गाव बालाघाटच्या एका कड्यावर वसले आहे. मंदिराच्या काही भागाची धाटणी हेमाडपंती आहे. इतिहास व पुरातत्त्वदृष्ट्या हे मंदिर राष्ट्रकुट अथवा यादवकालीन मानले जाते. तर काहींच्या मते हे १७ व्या किंवा १८ व्या शतकातील मंदिर आहे. भक्तांच्या हाकेला त्वरित धावून येणारी व मनोरथ पूर्ण करणारी म्हणून ही देवी श्री तुळजाभवानी या नावाने ओळखली जाते. कलियुगात छत्रपती शिवरायांसाठी आशीर्वादरूप ठरलेली ही भवानी भक्ततारिणी, वरप्रसादिनी आहे. श्री देवीजींच्या सभामंडपात पश्चिम दिशेला गर्भगृह असून, चांदीच्या सिंहासनात, पूर्वाभिमुख अशी श्री तुळजाभवानी देवीची रेखीव व प्रसन्न मूर्ती आहे. मूर्ती गंडकी शिळेची असून, प्रमाणबद्ध आहे. अष्टभुजा महिषासुरमर्दिनी असे देवीचे मनोहर रूप आहे. देवी भवानीची ही स्थलांतर करता येणारी मूर्ती आहे. वर्षातून तीनवेळा ही मूर्ती मंचकी (पलंगावर) विसावते. असे इतरत्र कोठेही आढळत नाही. गर्भगृहाच्या भिंतीवर छोटी-छोटी आकर्षक शिल्पे आहेत. सभामंडपात उत्तरेस देवीचे शयनगृह असून, इथे चांदीचा पलंग आहे. या ऐतिहासिक शक्तिपीठाबरोबरच मंदिराच्या परिसरातील कल्लोळ तीर्थ, गोमुख तीर्थ, सिद्धिविनायक मंदिर, श्री भवानी शंकर मंदिर, होमकुंड, प्रांगणातील देवीदेवता, मातंगी मंदिर इ. धार्मिक स्थळे प्रसिद्ध आहेत. घाटशीळ, भारती बुवांचा मठ, पापनाश तीर्थ, धाकटे तुळजापूर, तीर्थकुंड, रामवरदायिनी मंदिर इत्यादी पवित्र धार्मिक स्थळे तुळजापुरात आहेत.





### असा सापडला गोमुख तीर्थकुंडाचा झरा

गोमुख तीर्थाच्या जिर्णोद्धाराचे काम साईप्रेम कंस्ट्रक्शनकडून केले जात आहे. अभियंता सुरज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली साईट मॅनेजर अमोल सुरवसे यांच्या देखरेखीत कामगार छन्नीने दगडी भिंतीवरील वरचा भाग तसेच पाण्याने आलेले शेवाळे काढण्याचे काम करत होते. यावेळी श्री गोमुखाच्या वरच्या बाजुला छन्नीने मारत असताना अचानक पाणी येण्यास आरंभ झाले. हे पाणी थांबता थांबेना तेव्हा याठिकाणी खणले असता एक ते सव्वा इंचाचे छिद्र दिसून आले. आसपासचा थर काढला असता तो पाण्याचा जिवंत झरा असून, याचे पाणी थेट गोमुखात पोहोचत असल्याचे आढळून आले. गोमुखातून तीर्थकुंडात नैसर्गिक पाण्याचा २४ तास अखंड वाहता झरा आहे. आजूबाजूच्या बालाघाटच्या डोंगरांतून हे पाणी येते व त्याचा स्त्रोत अज्ञात आहे. याठिकाणी तीर्थक्षेत्र काशी येथील गंगेचे जल येत असल्याची पुरातन आख्यायिका असल्याने ते अत्यंत पवित्र मानले जाते.

**माया माने, श्री तुळजाभवानी मंदिर प्रशासकीय अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर**

### काशीहून थेट तुळजापूरच्या गोमुख तीर्थकुंडात पाणी

गेल्या अनेक वर्षांपासून गोमुख तीर्थ बंद असल्याने भाविकांतून खंत व्यक्त व्हायची. आता येथील झरा पूर्ववत झाला असून, या गोमुख तीर्थकुंडात काशीहून म्हणजेच प्रयागराजहून गंगेचे पाणी थेट तुळजापूरला येते; हा पुरातन इतिहास आहे. काशीला गेलेल्या एका देवीभक्ताची या गंगेच्या पाण्यावर एक अख्यायिकाही आहे. यामुळे थेट काशीहून तुळजापूरला येणाऱ्या पाण्यात जो कोणी स्नान करील, त्याची समुळ दु:खे नष्ट होतात. यामुळेच विविध प्रांतातून येणाऱ्या भाविकांची या तीर्थकुंडाजवळ सतत गर्दी दिसून येते.

**बाळासाहेब शिंदे, माजी नगराध्यक्ष तथा फुलांचे व्यापारी, तुळजापूर**

### गोमुखाच्या पाण्यात डुंबल्याने दु:ख अन् संकटे होतात दूर

गोमुख तीर्थ हे तुळजापूरच्या तुळजाभवानी मंदिराच्या परिसरात आहे. तुळजाभवानी मंदिराच्या परिसरात गर्भगृह, सभामंडप, होम कुंड, कल्लोळ तीर्थ इत्यादी स्थापत्य आहे. गोमुख तीर्थ हे प्रमुख आकर्षण आहे. हे एक पवित्र स्थळ आहे; जिथे गायीच्या तोंडातून पाणी येते. याची रचना ६ फूट उंच बांधलेली आहे. गोमुख तीर्थाला पवित्र गंगेतून पाणी मिळते आणि या पाण्यात डुंबल्याने लोकांचे सर्व दु:ख आणि संकटे दूर होतात असे मानले जाते. नवरात्र उत्सव काळात नऊ दिवसांची मंचकी निद्रा संपवून श्री तुळजाभवानी माता पहाटे सिंहासनावर विराजमान होते तेव्हा श्री तुळजाभवानी मातेच्या सिंहासन प्रतिष्ठापनेसाठी देवीचे महंत तुकोजीबुवा, महंत वाकोजीबुवा हे सायंकाळी गोमुख तीर्थातील पवित्र जलाने तुळजाभवानी मातेचा गाभारा, सिंहासन स्वच्छ धुऊन घेतात. यामुळे येथील गोमुख तीर्थाचाही अगाध महिमा दिसून येतो.



# भाजपाच्या दिल्लीतील ऐतिहासिक विजयानंतर सोलापुरातही जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेबुवारी -**

दिल्लीमधे पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीने ऐतिहासिक विजय मिळविला. या विजयाचा जल्लोष सोलापुरातील भारतीय जनता पार्टीच्या वतीने कन्ना चौकात साजरा केला. या प्रसंगी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घोषणा देत व एकमेकांना मिठाई भरवत आनंद द्विगुणीत केला.

या प्रसंगी भाजपा सोलापूर शहराध्यक्ष नरेंद्र काळे, उपाध्यक्ष जय साळुंखे, भाजपा सरचिटणीस रोहिणीताई तडवळकर, प्रा.डॉ नारायण बनसोडे, भाजपा शहर सरचिटणीस पांडुरंग दिड्डी, विशाल गायकवाड, भाजपा महिला मोर्चा सोलापूर शहर अध्यक्षा विजयाताई वडेपल्ली, भाजपा सोलापूर शहर उत्तर निवडणूक प्रमुख राजकुमार पाटील, सोमपाचे माजी सभागृह नेते संजय कोळी, चिटणीस बजरंग कुलकर्णी, सुनील गौडगाव, सुधाकर नराल, गिरीश बत्तुल, देविदास बनसोडे यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिंता नाही, चिंतन करा, प्रकृती सांभाळा, अध्यात्मवादी बना

## बालयोगी गोपाल महाराजांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ९ फेब्रुवारी-**

प्रकृती रक्षके धर्म: अर्थात प्रकृतीला सांभाळा. जगताच चिंतन केल्याने प्रकृती खराब होतो. जगतातले लोक बोलले त्याचा विचार केल्याने प्रकृती बिघडते. दु:खाला कारण जगाच चिंतन; मग सुखाला कारण भगवंताचं चिंतन करा, चिंता करू नका.चिंता मनाला जाळते तर चिता शरीराला. अध्यात्मवादी बना, जेंव्हा अध्यात्माची प्राप्ती होईल तेव्हा जीवनात दु:ख शिल्लक राहणार नाही, असे परम पूज्य बालयोगी गोपाळ महाराज कारखेडकर यांनी श्रीमद् भागवत कथेच्या विवेचनात व्यक्त केले.



मोडनिंब (ता. माढा) येथे बालयोगी गोपाळ महाराज कारखेडकर यांची भागवत कथा भाविकांच्या प्रचंड प्रतिसादात सुरु आहे. प्रारंभी या संगीतमय कथेचे पुष्प गुंफताना बालयोगी गोपाल महाराज साधक अवस्थेत सर्वात श्रेष्ठ कर्म आहे आणि प्रांपचिक जीवनातही कर्म आहे.या विश्वामध्ये प्रत्येकाला जे सुख दु:ख प्राप्त ते सगळं कर्माणुसंगनी आहे. नित्य कर्म, नैमित्तीक कर्म, काम्य कर्म आहेत.विकल्पाच्या गाठी जोपर्यंत सुटत नाहीत तोपर्यंत जीवावर कृष्ण कृपा होत नाही. कृष्ण कृपेला जर प्राप्त व्हायच असेल तर संदेहातून निवृत्त व्हाव लागत. संदेहातून निवृत्त होण्यासाठी आत्म्याचा ठिकाणी भगवत भाव ज्या दिवशी जागृत होतो त्या वेळी संदेह निघून जातो. निर द्वंद अवस्थेला प्राप्त झाल की संदेह जातो.

## संक्षिप्त वृत्त

### बनशंकरी देवीचा बुधवारी रथोत्सव

**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**

साखरपेठेतील श्री बनशंकरी देवीचा रथोत्सव बुधवार, दि. १२ फब्रुवारी रोजी सायंकाळी पाच वाजता साजरा होणार आहे. श्री बनशंकरी देवीचे मूळस्थान बागलकोट जिल्ह्यातील बदामी येथे आहे. ही देवी आद्य साडेतीन शक्तीपीठा पैकी आहे. या देवीचे प्रतिरुप सोलापुरात असून या देवीच्या मूर्तीची स्थापना आद्यशंकराचार्य यांनी २५० वर्षांपूर्वी स्थापना केली असून दर माघ महिन्याच्या पौर्णिमेला रथोत्सव मिरवणूक काढली जाते. तरी भक्तानी मोठ्या संख्येने रथोत्सवात उपस्थित रहावे, असे आवाहन मंदिराचे विश्वस्तांनी केले आहे.



### बंजारा समाजातर्फे शनिवारी अमृता फडणवीस यांचा सत्कार

**मंद्रुप, दि. ९ फेब्रुवारी-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी बंजारा समाजाचे दैवत संत श्री सेवालाल महाराजांचे बंजारा वेशभूषेत व बोलीभाषेतील गीत व नृत्य सादर केले आहे. त्याबद्दल संपूर्ण बंजारा समाजातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. भारतीय जनता पार्टीने पोहरा देवीचे महंत बंजारा धर्मगुरू बाबूसिंह महाराज यांना विधानपरिषदेवर घेतल्याने समाजातून त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच आता सौभाग्यवती मुख्यमंत्र्यांनी बंजारा वेशभूषेत नृत्य आणि गीत सादर केल्याने त्याबद्दलही समाजातून कौतुक केले जात असून बंजारा वर्ल्ड चॅनलच्या अनिता राठोड यांना अमृता फडणवीस यांचे मेकअप आणि वेशभूषा करण्याची संधी मिळाली. आजपर्यंत संत श्री सेवालाल महाराजांचे गाणे कधीही टी-सिरीज चॅनलवर टाकण्यात आले नव्हते. परंतु अमृता फडणवीस यांच्या माध्यमातून हे गाणे प्रसिद्ध झाले आणि पुन्हा एकदा बंजारा समाजाची संस्कृती शिखरावर पोहोचली. याबद्दल सोनाई फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष युवराज राठोड यांनी १५ फेब्रुवारी रोजी बंजारा समाजाच्या आराध्य दैवत संत श्री सेवालाल महाराजांच्या २८६ व्या जयंतीचे औचित्य साधून लवकरच त्यांची वेळ घेऊन अमृताताई यांचा तमाम बंजारा समाजाच्यावतीने सत्कार सोलापूर येथे करण्यात येणार आहे, असे सांगितले आहे.



### राजर्षि शाहू विद्यालयात माता रमाईंची जयंती साजरी

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

राजर्षि शाहू मराठी विद्यालयात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका चंद्रकला गायकवाड या होत्या. कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भाषणातून माता रमाईंच्या कार्याची माहिती सांगितली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक मनिषा झेंडे, अभिजीत गुंजले, सचिन डोईफोडे, इरय्या स्वामी, सोनाली माने, साक्षी जाधव, प्रियंका जाधव, मेनिका माने आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रतिभा गायकवाड, आभार विश्वासराव घंटेनवरु यांनी मानले.

### हॅण्डल लॉक तोडून दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

व्यंकटेश नगर जवळ हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना दि.१ फेब्रुवारी रोजी घडली.याप्रकरणी संतोष मारुती शिंदे (वय-४०,रा.सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल पाटील हे करीत आहेत.

### गाळ्याचे कुलूप कोणी तोडले विचारल्याने मारहाण

**सोलापर, दि. ९ फेब्रुवारी-**

नई जिंदगीत असलेल्या दुकान गाळ्याचे कुलूप कोणी तोडले अशी विचारणा केली असता, चिडून जाऊन तिघांनी मिळून फिर्यादी व त्यांचे वडील, सासऱ्यास मारहाण केली. या घटनेची हकीकत अशी की, उस्मान अब्दुल रहमान चाबुकस्वार (वय-२९,रा.विष्णुनगर नई जिंदगी) हे नई जिंदगीत असलेल्या गाळ्याची पाहणी करण्यासाठी आपले वडील,सासरे,भाऊजी यांच्यासह गेले.त्यावेळी दुकानाचे कुलूप कोणीतरी तोडले होते.याची विचारणा केली असता तसेच दिलेल्या रकमेबाबत विचारणा केली असता,सलीम गुलामहुसेन बेलीफ,समी बेलीफ,शाहिद बेलीफ (रा.सर्वजण सिद्धेश्वर नगर,सोलापूर) यांनी फिर्यादी त्याचे वडील व सासरे यांना शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच लोखंडी रॉड डोक्यात मारून फिर्यादीस गंभीर जखम केले.एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघा विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

### पाईप फुटल्याचे मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापर, दि. ९ फेब्रुवारी-**

रस्त्याचे बांधकाम करत असताना पाईप फुटल्याने ती दुरुस्त करावी अशी मागणी केली असता,ठेकेदारासह तिघा जणांनी मारहाण केल्याची घटना दि.७ फेब्रुवारी रोजी कल्पना नगर अक्कलकोट रोड येथे घडली. या घटनेची हकीकत अशी की, तौफिक मदार शेख यांचे ठेकेदार यश चंडक यांच्याबरोबर रस्त्याची पाईप फुटल्याचे कारणावरून वाद झाला होता.त्यानंतर यश चंडक,निखिल चव्हाण,आमिर जमादार, व गफूर जमादार,रियाज जमादार अनिल चंडक (रा.सर्व सोलापूर) या सहा जणांनी मिळून तु रस्ता करण्यासाठी विरोध का करतो असे म्हणून मारहाण केली.याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.अधिक तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल नवले करत आहेत.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## रतन टाटा पुरस्काराने मोहम्मद अयाज सन्मानित



**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

पद्मविभूषण स्व. रतन टाटा यांच्या ८७ व्या जयंती निमित्त प्रख्यात संगीतकार दिलीप सेन व इंडिया लींक मीडियाचे अध्यक्ष रविन्द्र दुपारगुडे यांच्या हस्ते येथील गायक मोहम्मद अयाज यांना रतन टाटा पुरस्काराने सम्मानित करण्यात आले.

महाराष्ट्रातून वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांच्या नावाने पुरस्कार जाहीर करण्यात आले होते. यात अयाज यांचा समावेश होता. हा पुरस्कार सोहळा दादर माटुंगा येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडला. टाटा यांना मानाचा मुजरा म्हणून काही देश भक्तिगीते गाऊन रसिकांना भावुक करीत अयाज म्हणाले, देशाने रतन टाटासारखे रत्न दिले आहेत.

# जातो माघारी पंढरीनाथा। तुझे दर्शन झाले आता।।



## जड अंतःकरणाने परतीच्या प्रवासासाठी वारकरी रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ फेब्रुवारी-**

माघी यात्रे निमित्त विठ्ठलाच्या दर्शनासाठी येथे आलेल्या लाखो वैष्णवांनी एकादशीचा अनुपम्य सोहळा डोळेभरून अनुभवत परंपरंने घराण्यातून चालत आलेली वारी पोहच केली. विठुरायाच्या भेटीला पुढच्या वर्षी येण्याची मनोमन इच्छा व्यक्त करुन मोठ्या जड अंतकरणाने वारकरी पंढरीचा रविवारी (ता.९) व्दादशी दिवशी निरोप घेत होते. येथील बस तसेच रेल्वे स्थानकावर पहाटे पासूनच भाविकांची परतीच्या प्रवासासाठी मोठी गर्दी झालेली होती.

बोला पुंडलिक वरदे हरि विठ्ठल । ज्ञानदेव तुकाराम।। असा जयघोष करीत येथील विठ्ठल मंदिराच्या पश्चिमव्दारात तसेच महाव्दारात उभे राहून दोन्ही हातने स्वतःचे कान पकडून वारकरी विठ्ठल ,विठ्ठल म्हणून उड्या मारीत सावळ्या परब्रम्हाकड़े क्षमा याचना करून काही चुकले असेल तर माफी कर, पुढच्या वर्षी तुझ्या भेटीला येण्यासाठी बळ दे असे म्हणत त्याचा निरोप घेत होते. या वेळी एकीकडे वारी पोहचल्याचा आनंद तर दुसरीकडे निरोप घेताना झालेली त्यांची अवस्था त्यांच्या डोळ्या खालील पापण्याच्या ओलाव्या वरुन स्पष्ट जाणवत होती.

### पहाटेपासूनच परतीच्या प्रवासाला सुरुवात

पहाटेपासूनच भाविकांची परतीच्या प्रवासासाठी लगबग दिसत होती. येथील चंद्रभागा वाळवंटामध्ये भाविकांची मध्यरात्रीपासूनच स्नानासाठी गर्दी झालेली होती. चंद्रभागेचे पवित्र स्नान आणि नगरप्रदक्षिणा करुन व्दादशीच्या न्याहारीची वारकऱ्यांची लगबग सुरु होती. अनेक मठ, धर्मशाळांमधून वारकऱ्यांच्या जेवणाच्या पंक्ती बसत असल्याचे दृश्य पहावयास मिळत होते. वारकरी व्दादशी सोडून सामानाची बांधाबांध करुन मुक्कामाच्या ठिकाणाहून बाहेर पडत थेट विठ्ठल मंदिराचे कळस दर्शन घेवुन रेल्वे, एस.टी तसेच खासगी वाहनांमधून बसून जातो माघारी पंढरीनाथा। तुझे दर्शन झाले आता।। या भावनेने मोठ्या जड अंतःकरणाने परतीच्या प्रवासासाठी रवाना होत होते.

## क्रीडा वृत्त...



### विंचूरच्या समर्थ सोनगीची राज्य मैदानी स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

विंचूर जिल्हा परिषद शाळेचा उगवता तारा व विंचूर''सुपर एक्सप्रेस '' म्हणून उदयास येत असलेला समर्थ भीमाशंकर सोनगी याची पंढरपूर येथे २३ व २४ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्य मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली. नेहरूनगर शासकीय मैदानावर झालेल्या जिल्हा बाल मैदानी स्पर्धेत समर्थने जिल्ह्यातील वेगवान धावपटूचा मान मिळवत दुहेरी विजेतेपद पटकावले. ५० मीटर व १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत जिल्ह्यातील दिग्गज खेळाडूंना मागे टाकत त्याने हे यश संपादन करत खो खो खेळाबरोबरच मैदानी स्पर्धे तही शाळेचा दबदबा कायम ठेवला. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड होण्याचा मान मिळवणारा तो विंचुरचा पहिला खेळाडू आहे. त्यास क्रीडा मार्गदर्शक तुळशीराम शेतसंदी, शांतप्पा कोळी व अशोक साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार, अधिकारी गुरु बाळा सनके, केंद्रप्रमुख महादेव पेशवे, मुख्याध्यापक बसवराज बनपुरे, सरपंच बाळासाहेब पाटील, उपसरपंच पद्मावती भीमाशंकर फुलारी व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बसवराज बिराजदार यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### मुलींचे क्रिकेट प्रशिक्षण कर्णिकनगर मैदानावर

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

शहरात २०१६ पासून सुरू असलेल्या रागिणी वुमेन्स क्रिकेट क्लबचे मोफत क्रिकेट प्रशिक्षण कर्णिकनगर ग्राऊंडवर सुरू होणार आहे. इच्छुकांनी संस्थापक मल्लिनाथ संगप्पा याळगी (मो. ९७३०८७२०८७) यांच्याशी संपर्क साधावा.



### इंटरनॅशनल अंबरनाथ मॅरेथॉनमध्ये साईश्वर व श्रद्धा गुंटूक बंधू-भगिनी प्रथम, द्वितीय

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

मुंबई येथील अंबरनाथ येथे रिलायबल हब फाऊंडेशनतर्फे आयोजित रिलायबल अंबरनाथ मॅरेथॉन स्पर्धेत साईश्वर व श्रद्धा केशव गुंटूक बंधू भगिनीने प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविला. १५ वर्षाखालील वयोगटात साईश्वरने १० किमी अंतर व श्रद्धाने ५ किमी अंतर कमी वेळात पूर्ण करत ही कामगिरी केली. या यशाबद्दल दोघांना पोलीस निरीक्षक गुप्ता यांच्या हस्ते ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. साईश्वर व श्रद्धा यांना सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह, स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडाप्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

## मनोरमा बँकेस आदर्श बँकेचा प्रथम पुरस्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को ऑप. असोसिएशनच्या वतीने रविवारी (ता. ९) सकाळी सोलापुरातील मनोरमा बँकेस आदर्श बँकेचा प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दि. महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन लि. मुंबईचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा होते. सोलापूर जिल्ह्यातील ५०० कोटीवरील नागरी सहकारी बँकांमधून सन २०२१ ते २०२४ च्या आर्थिक व गुणवत्ता श्रेणीनुसार मनोरमा बँकेस आदर्श बँक प्रथम पुरस्कार मिळाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दि. महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशन लि. मुंबईचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा,आ. विजयकुमार देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग एकचे व्ही.व्ही. डोके, सो.जि. नागरी सह. बँक्स असो. चे अध्यक्ष प्रकाश वाले, उपाध्यक्ष डॉ. अशोक सुरवसे, सीईओ शुभांगी ढवळे आदी उपस्थित होते. हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी मनोरमा बँकेस आदर्श बँकेचा प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. तो मनोरमा परिवाराच्या मार्गदर्शिका शोभा मोरे, व्हा. चेअरमन संतोष सुरवसे, कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष ॲड. सुरेश गायकवाड, दामोदर देशमुख, डॉ. ऋचा मोरे- पाटील, संचालक गजेंद्र साळुंखे, गणपत कदम, संतोष मोटे, सुहास भोसले, प्रा. डॉ. बब्रुवान रोंगे, दत्तात्रय मुळे, प्रशांत शहापूरकर, बँकेच्या सीईओ शिल्पा कुलकर्णी (मोहिते), मल्टिस्टेटच्या सीईओ कविता कुलकर्णी यांनी स्वीकारला. यावेळी बँकेचे अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

## बँक ऑफ महाराष्ट्र बार्शी संघ विजेता

### सोलापूर झोन क्रिकेट स्पर्धा : धाराशिव उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि. ९ फेब्रुवारी-**

बँक ऑफ महाराष्ट्र सोलापूर झोनच्या क्रिकेट स्पर्धेत बार्शी शाखेने विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी धाराशिव संघास हरविले.

बँकेच्या ९०व्या व्यवसाय प्रारंभ दिनानिमित्त हा उपक्रम राबवण्यात आला. या स्पर्धेचे उद्घाटन झोनल मॅनेजर संजीव कुमार आणि डेप्युटी झोनल मॅनेजर सुजीत कुमार झा यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी विविध शाखांमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेत बँक ऑफ महाराष्ट्र सोलापूर झोनमधून पाच संघ सहभागी झाले होते.






सोलापूर : रविवारी सायंकाळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बॅन्ड पथकाने शहरातील विविध भागातून संचलन केले. कन्नाचौक परिसरात टिपलेले छायाचित्र.
(छायाचित्र : केवल तिवारी)

## महाराष्ट्रातील 'नेक्स्ट इंडस्ट्रियल हब' सोलापूरच असेल

### चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांचा विश्वास



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**

सोलापूर हे भविष्यातील औद्योगिक गुंतवणुकीचे आणि रोजगार निर्मितीचे प्रमुख केंद्र बनेल, असा ठाम विश्वास महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललितभाई गांधी यांनी व्यक्त केला.

नुकत्याच झालेल्या एका महत्वपूर्ण बैठकीत सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी सोलापूरच्या औद्योगिक प्रगतीसाठी आवश्यक धोरणांवर चर्चा केली. त्यावेळी ते बोलत होते. सोलापूरच्या औद्योगिक विकासासाठी सकारात्मक पावले उचलली जात असून, भविष्यातील प्रगतीसाठी हा एक महत्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. महाराष्ट्रात दावोस येथे झालेल्या १५ लाख कोटी रुपयांच्या औद्योगिक करारांमध्ये सोलापूरला स्थान न मिळाल्याची खंत सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी व्यक्त केली. त्यांनी हा मुद्दा शासन दरबारी मांडण्याची विनंती ललित गांधी यांच्याकडे केली. तर सोलापूरच्या औद्योगिक विकासासाठी सरकार व प्रशासनाच्या मदतीने उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यावर भर दिला.

या बैठकीस महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे माजी अध्यक्ष अरविंद दोशी, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे गावर्निंग कॉन्सिल सदस्य व सोलापूर विकास मंचचे केतन शहा, गोविंद रावजी आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी अनुप दोशी, ॲड. दत्तात्रय अंबुरे, कल्पेश मालू आणि विजय कुंदन जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्ह्यात माजी सैनिक पात्र उमेदवारच उपलब्ध नाही

## माजी सैनिक उपलब्ध न झाल्याने सामाजिक आरक्षणानुसार भरणार रिक्तपदे : सीईओ जंगम

### प्रतीक्षा यादीतील उमेदवारांच्या आशा झाल्या पल्लवीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ फेब्रुवारी-**

राज्य शासनाच्या आदेशानुसार २०२३ मध्ये झालेल्या सरळ सेवा भरती अंतर्गत एकूण रिक्त जागांच्या १५ टक्के आरक्षण माजी सैनिकांसाठी ठेवण्यात आले होते. मात्र ज्या जिल्हा परिषदमध्ये सरळ सेवा भरतीमध्ये माजी सैनिक आरक्षणांतर्गत उमेदवार उपलब्ध न झाल्याने काही जागा रिक्त राहिल्या. यासंदर्भात राज्यातील जिल्हा परिषदांनी शासनाकडे मार्गदर्शन मागविले होते. यावर माजी सैनिकांच्या आरक्षित जागा पात्र उमेदवार न मिळाल्याने रिक्त राहिल्यास त्या ठिकाणी त्या- त्या सामाजिक आरक्षण व गुणवत्तेनुसार भरण्याचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्या प्रयत्नाला यश आले. सरळ सेवा भरतीतील त्या १७रिक्त राहणाऱ्या जागांवर प्रतीक्षा यादीतील गुणवत्ताधारक पात्र उमेदवारांना नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे त्या उमेदवारांच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या आहेत. २०२३ मध्ये राज्य शासनाच्या वतीने सरळ सेवा भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. या भरती अंतर्गत सोलापूर जिल्हा परिषदेच्या विविध १७ संवर्गातील ६७४ जागा भरण्यासाठी ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली.

मात्र या प्रक्रियेत माजी सैनिकासाठी राखीव असणाऱ्या १५ टक्के आरक्षित जागेवर पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेतील माजी सैनिक आरक्षणा अंतर्गत गट क च्या १७ जागा रिक्त राहिल्या. यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या स्वाक्षरीने २१ जानेवारी रोजी सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी ग्रामविकास विभागाच्या अवर सचिव यांच्याकडे मार्गदर्शन मागितले होते. यावर शासनाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शनद्वारे सामाजिक आरक्षणानुसार या जागा भरण्यात येणार आहेत.

### जिल्हा निवड समितीकडे प्रस्ताव सादर



राज्य शासनाचे निर्देश प्राप्त झाल्यानंतर सोलापूर जिल्हा परिषदेकडून माजी सैनिकांसाठी आरक्षित असणाऱ्या त्या १७ जागा भरण्यासाठी जिल्हा निवड समितीचे अध्यक्ष, जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यासंदर्भात भरती प्रक्रिया राबविण्यासाठी निवड समितीची वेळ व दिनांक प्राप्त झाल्यानंतर ही प्रक्रिया पार पडणार आहे.

**- कुलदीप जंगम,**
**मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर.**

## डॉ. उपाध्ये यांना राष्ट्रीय 'आयएसडीए फेलो' पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुहास उपाध्ये (मृद व जल संधारण अभियांत्रिकी) यांना भारतीय कोरडवाहू कृषि संशोधन संस्था (इंडियन सोसायटी ऑफ ड्रायलँड ॲग्रिकल्चर), हैद्राबाद मार्फत केंद्रीय कोरडवाहू कृषि संशोधन संस्था (क्रीडा), हैद्राबाद येथे आयोजित तीन दिवसीय द्वितीय आंतरराष्ट्रीय परिषदेत राष्ट्रीय स्तरावरील 'आयएसडीए फेलो'-२०२२' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.


हैदराबाद येथे दि. २९ ते ३१ जानेवारी रोजी 'कोरडवाहु शेती: संवेदनक्षम आणि शाश्वत उपजीविकेसाठी आराखडा तयार करणे' या विषयावर तीन दिवसाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी डॉ. हिमांशु पाठक यांच्या हस्ते आणि डॉ. एस. के. चौधरी, उपमहासंचालक (एन आर एम), भा.कृ.अ.प., नवी दिल्ली, डॉ. स्टॅनफोर्ड ब्लेड, महासंचालक, इक्रीसॅट, हैद्राबाद, डॉ. व्ही. के. सिंग, संचालक, क्रिडा, हैद्राबाद, डॉ. जे व्ही. एन एस प्रसाद, प्रोजेक्ट को-ऑरडीनेटर, क्रीडा, हैद्राबाद यांच्या उपस्थितीत डॉ. उपाध्ये यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०२५

**संतांचे गुणदोष आणितां या मना ।**
**केलिया उगाणा सुकृताचा ।।**

प्रत्येकाच्या आचार-विचारात, स्वभाव वर्तनात कांही गुण-दोषही असतातच. पूर्णत: गुणच आहेत किंवा पूर्णत: अवगुणच आहेत, अशी व्यक्ती असत नाही. कांहीकडे गुणाचा साठा जास्त तर कांहीकडे अवगुणाचा साठा जास्त असू शकेल. इतरांना जसे गुण-अवगुण असतात, तसे आपल्यातही गुण-अवगुण असू शकतात. तरीपण जवळपास प्रत्येकजण दुसऱ्यातील अवगुण पाहात असतो. स्वत:च्या बाबतीत मात्र अवगुणांवर पांघरुन घालतो. आपल्याकडे अवगुण असूनही आपण गुणीच आहोत, असे दाखविण्याचा प्रयत्न म्हणजे केवळ समोरच्यांची फसवणूक नव्हे, तर खऱ्या अर्थाने ती आपली स्वत:ची फसवणूक होय. वाईटात वाईट पाहण्याची मानवाची जशी वृत्ती आहे, तशीच वृत्ती चांगल्यात वाईट पाहण्याचीही आहे.स्वत:चे मोठेपण, अहंकार, किंवा मीपणा टिकून रहावा, त्याचबरोबर लोकांनी आपणाला चांगले म्हणावे या दृष्टीकोनातून माणूस इतरांमधील दोष पाहात असतो. समोरचा दोषी किंवा अवगुणी नसतांनाही माणूस त्याच्याकडे चांगल्या दृष्टीने पाहात नाही. सामान्य माणसांच्या बाबतीत तर सोडाच, माणूस संत, महात्म्यातही अवगुण पाहातो. चांगल्यातील दोष शोधण्यापेक्षा त्याच्याकडून काय आणि किती चांगले घेता येते. याचा विचार न करता त्याच्यातील अवगुण शोधत बसणे, म्हणजे स्वत:तील चांगलेपणा गमावणे होय. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**संतांचे गुणदोष आणितां या मना ।**
**केलिया उगाणा सुकृताचा ।।**

संत महात्म्यांकडील गुण आपल्यात कसे येतील याचा प्रयत्न करण्यापेक्षा त्यांच्यातील अवगुणाचा शोध घेणे म्हणजे वेडेपणा होय. सुगंधित फुलाचा वास त्याच्याजवळ जाताच येतो, हे सत्य असले तरी अनेकजण त्या फुलाला चुरगळून त्याचा वास घेतात. सुगंधित फुलाला चुरगळून त्याचा सुगंध घेण्याचा प्रयत्न म्हणजे वेडेपणा नव्हे तर काय? केळीला फळ आले किंवा नाही हे केळीचे झाड चिरुन पहायचे नसते. केळीचे फळ सहज नजरेला दिसू शकते. त्याप्रमाणे संत, महात्म्यांचे गुण सहज पहावेत. आपणाला आवडतील त्या गुणांचा आपण स्विकार करावा. चांगल्यातील अवगुणांचा शोध घेण्यात आपण वेळ घालवू नये. वाईटात व चांगल्यात वाईट पाहण्याची वृत्ती आपल्यासाठी हितावह नरसते. दुसऱ्यात वाईट पाहण्याची सवय आपणाला नकारात्मकतेकडे वळवते. नकारात्मकता हा मानवी जीवनातील किंवा मानवाच्या विकासातील मोठा अडसर आहे. हा अडसर आपणच आपल्या स्वभावामुळे निर्माण करु नये. लहान असो की, मोठा त्याच्याकडून जेवढे चांगले घेता येईल, ते नम्रपूर्वक घ्यावे. आपण इतरांतील वाईटपणा किंवा अवगुण शोधण्यापेक्षा आपण आपल्यातील अवगुण शोधून त्यावर उपाय करण्याचा प्रयत्न करावा. आपला असा प्रयत्न आपणाला एके दिवशी निश्चितच आत्मज्ञानाच्या मार्गावर नेऊन पोहचविल यात शंका बाळगण्याचे कारण नसावे.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार**
**दि. १० फेब्रुवारी २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - फाल्गुन**
**शु. त्रयोदशी (१८.५७)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - पुनर्वसु (१८.००)**
**योग - प्रीति (१०.२६)**
**करण - गर (३०.५२)**

**दिनविशेष - चांगला दिवस, श्री विश्वकर्मा जयंती, सोमप्रदोष**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : जीवनसाथीच्या सहकार्याने कौटुंबिक समस्या दूर होतील. फायदेशीर चर्चा घडून येई. भोग-विलास प्रवृत्तीत वाढ होईल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ** : सहनशिलता कमी होऊ देऊ नका. आर्थिक अडचणी येऊ शकतील. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. जास्त विश्वास, जास्त उत्साह आपले होणारे काम बिघडवू शकतात.

**मिथुन**: अविवाहितांना लग्नाचे प्रस्ताव येतील. कामकाजाचे क्षेत्र विस्तारीत होईल. व्यापाराकरिता आजचा दिवस शुभ जाईल.

**कर्क** : विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने समाजात मान मिळेल.

**सिंह** : प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे.

**कन्या** : व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल.

**तुळ** : नवीन कामाची आखणी कराल. फायदेशीर बातम्या ऐकण्यास मिळतील. जुना रोग उदभवण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** : साहित्य वाचनाची गोडी वाढणार आहे.आधिकारी लोकांशी नवीन संबध जुळतील. चैनीच्या वस्तू घेण्याकडे आपला ओढा राहील. रोजगारात प्रगीत होईल. खर्चावर नियंत्रण राखा.

**धनु** : आपली कार्यकुशलता व इतरांच्या सहयोगाने कामात यश मिळेल. आपले विचार योग्य असतील. कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवा.

**मकर** : नातेवाईंकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा. मुलांच्या प्रकृतीत सुधारणा होईल. विरारधीन असलेले कामे पार पडतील. व्यवसायिक निर्णय वेळेवर घ्या.

**कुंभ** : लोकांशी संपर्क वाढवून आपण आपल्या योजना पूर्णत्वास न्याल. राजकीय लोकांपासून फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. मुलांच्या कामाकडे लक्ष द्या.

**मीन** : रचनात्मक कार्यात प्रगती होईल. मुलांच्या इच्छा पूर्ण होतील. फायद्याच्या संधी मिळतील. मित्रांची मदत मिळेल. व्यवहारात नम्रता व सहनशिलता आवश्यक आहे.

# हनुमान दंड प्रशिक्षण शिबीर उत्साहात

### पापय्या तालीम संघ व स्वरूपा योगा सेंटरचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

पापय्या तालीम संघ व स्वरूपा योगा सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जुनी मिल कंपौंड येथील ऐतिहासिक पापय्या तालीम प्रांगणात एक दिवसीय मोफत हनुमान दंड प्रशिक्षण शिबिर उत्साही वातावरणात पार पडले.

शिबीरात विविध स्तरातील शेकडो युवक व व्यायामपटूंनी सहभाग नोंदवला. याचे उद्घाटन श्री. हनुमानास नारळ वाढवून स्वरूपा योगा सेंटरचे प्रमुख योगा व मुद्रा तज्ञ जयंत पडसलगीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष जगन्नाथ व्यवहारे, विश्वस्त गणेश कुलकर्णी, प्रकाश सुरवसे, जयंत मोरे, गजानन लामनाने, शिवाजी चटके, संभाजी माळगे आदी उपस्थित होते.



सांगतावेळी संस्थेच्या वतीने श्री. पडसलगीकर यांचा सत्कार तालमीचे जेष्ठ व्यायामपटू सुरेश जानकर व कुस्तीपटू राकेश म्हेत्रे यांनी केला. यावेळी व्यायामपटू, साधक उपस्थित होते. प्रशिक्षणाचे प्रास्ताविक वस्ताद वसंत कलकर्णी यांनी केले. जयंत मोरे यांनी आभार मानले.

### हनुमान दंड हा भारतीय परंपरेचा व्यायाम

श्री. पडसलगीकर यांनी हनुमान दंड प्रशिक्षणाचे विविध प्रात्याक्षिके व फायदे आदीबाबत साधकांना प्रबोधन व मार्गदर्शन केले. ते म्हणाले, हनुमान दंड हा भारतीय परंपरेचा व्यायाम आहे. संपूर्ण शरीराला व्यायाम देणारी क्रिया आहे. संपूर्ण शरीराला अद्भुत आपार शक्ती देते. स्नायू मजबूत होतात. शरीरातील सर्व अवयव हात पाय, खांदे, जॉईंट चांगले होतात. शरीराचे रक्ताभिसरण अतिशय चांगले होते. क्रोध व मानसिक ताण नाहीसा होतो. शरीर वज्रदेही होते. साहस, धैर्य अंगी येते. व्यायामपटुंनी दैनंदिन २०० ते ३०० हनुमान दंड घातले असता बॉडी मजबूत होते. हा व्यायाम फक्त भारतात आहे असे नाही तर परदेशात निरनिराळ्या जीममध्ये नियमित पुरूष व महिला घालतात. हनुमान आजही जीवंत आहे. त्याला अजरामरचे वरदान प्राप्त झाले आहे.



# ग्लोबल व्हिलेजमध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

ग्लोबल व्हिलेज ज्युनियर कॉलेज येथे बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात आर्डिनो ब्लुटुथ डिवाइस कंट्रोल सिस्टमचा वापर करुन बनविलेल्या डिजिटल लॅम्प लाईटिंग (दीपप्रज्वलन) आणि महात्मा गांधीजींच्या प्रतिमा पूजनाने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी तर पालक प्रतिनिधी म्हणून सुमित फुलमामडी व अरविंद सालक्की यांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी कॉलेजच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. आंतरमहाविद्यालयीन राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकवल्याबद्दल आरोही पाटील, NSEB परीक्षेत नैपुण्य मिळविल्याबद्दल हरी अंबरकर, ऋसिद्धी धरणे अगदी लहान वयात आपल्या नावे पेटंट मिळविल्याबद्दल यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी कॉलेजला भेट म्हणून साउंड सिस्टम प्रदान केली. बारावीच्या जय आमले, साहिल किणीकर व सिद्धी धरणे या विद्यार्थ्यांनी तर नागणे, धरणे, डॉ. पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन १२ वीचे विद्यार्थी ओम चनशेट्टी व श्रावणी कोरके यांनी केले तर प्रस्तावना मल्लिनाथ जळकोटे व आभार प्राचार्या आस्मा नदाफ यांनी मांडले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (४७) खिलाफत

हिंदू मुसलमान ऐक्यासाठी महात्मा गांधींनी केलेले भयंकर व मानहानीदर्शक धाडस म्हणजे खिलाफत चळवळ. पहिल्या महायुद्धाच्या वेळी म्हणजे १९१९ मध्ये इंग्रजांनी तुर्कस्तानचा पराभव केला. तिथल्या खलिफाला पाय उतार केले. हा तुर्कींचा सुलतान इस्लामिक दुनियेचा खलिफा म्हणजे धर्मगुरू होता. संपुष्टात आलेल्या तुर्कस्तानची खिलाफत वाचवण्यासाठी भारतातल्या मुसलमानाने अल्ला हो अकबर चा नारा देत आंदोलन केले. आणि सुभानाल्ला म्हणत महात्मा गांधींनी पण त्यांना प्रोत्साहित केले. महात्मा गांधी म्हणायचे यामुळे इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी हिंदू मुसलमानात एकी होईल व ब्रिटिशांविरुद्ध लढणे सोपे जाईल. परंतु हे मत स्वा. सावरकर व डॉक्टर हेडगेवार यांना मान्य नव्हते. या वेळेपर्यंत डॉक्टर कॉंग्रेसचे सक्रिय सदस्य होते. परंतु मुस्लिमांचा भारतीय स्वातंत्र्या ऐवजी तुर्कस्तानच्या खिलाफतीमध्ये असलेला जास्त रस-कॉंग्रेसचे त्याला बढावा देणारे राजकारण; अशा गोष्टी न पटल्यामुळे हेडगेवार कॉंग्रेस पासून दूर झाले. कारण त्यांना आपल्या या पुण्यभूमीचे राष्ट्रजीवन हे हिंदूराष्ट्र जीवनच आहे या त्रिकालाबाधित सत्याचा साक्षात्कार बाल्यदशे पासूनच झाला होता.

**- क्रमश:**

# गंभीर आजारांसाठी वैद्यकीय उपचार करा सुनिश्चित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये गुलियन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) च्या प्रकरणांमध्ये चिंताजनक वाढ होत असून एकूण बाधित रुग्णांची संख्या १०० पेक्षा जास्त झाली आहे. एक विश्वासार्ह विमा ब्रँड असलेला टाटा एआयजी व्यापक आरोग्य विमा योजना सादर करत असून अशा गंभीर आजारांच्या उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाला संरक्षण देते.त्यामुळे कुटुंब आत्म विश्वास आणि मन : स्वास्थ्य राखून या आरोग्यविषयक संकटाचा मुकाबला करू शकतात.टाटा एआयजी मेडिकेअर प्रीमियर ही एक व्यापक आरोग्य विमा योजना असून,यामध्ये खालील प्रकारचे कव्हरेज अंतर्भूत आहे.डेटा सायन्स ऑफिसर नील छेडा म्हणाले,महाराष्ट्रात जीबीएस सारख्या आजारांच्या वाढत्या प्रमाणामुळे,टाटा एआयजी वेळेवर वैद्यकीय मदत आणि आर्थिक स्थैर्यासाठी सहज उपलब्ध,व्यापक कव्हरेज पुरवत राहील.



# खासगी प्राथमिक अस्थापनेवर लिपिकाची नेमणूक करा

### खाजगी प्राथमिक शाळा कृती समितीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापुर, दि. ९ फेब्रुवारी-**

शिक्षण विभागातील खासगी प्राथमिक शाळेच्या आस्थापनेवर कायम लिपीकाची नेमणुक करा, असे निवेदन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांच्याकडे दिल्याची माहिती डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेचे प्रदेश महासचिव सुनिल चव्हाण यांनी दिली. श्री. कोहिणकर यांनी याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन यावेळी दिले.

डॉ. पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, युवक शिक्षक कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना व अखिल भारतीय उर्दु संघटनेच्या शिष्टमंडळाने श्री. कोहिणकर यांची भेट घेतली. यावेळी आप्पाराव इटेकर, आप्पासाहेब पाटील, अ. गफुर अरब व संतोष साठे आदी उपस्थित होते.

खाजगी प्राथमिक शाळेतील आस्थापनेवर दीड वर्षापासुन प्रभारी लिपीकाची नेमणुक करण्यात येत आहे. जिल्ह्यामध्ये ३०० खाजगी प्राथमिक शाळा असुन ३ हजार शिक्षक कार्यरत आहेत. सेवकसंच दुरुस्ती प्रस्ताव, निवडश्रेणी प्रस्ताव, अतिरिक्त शिक्षका समयोजन प्रक्रीया राबविणे, अंशत: अनुदानित शाळेचा वाढीव टप्पा मंजुर करणे, मुख्याध्यापक पदाची मान्यता देणे, आरटीई मान्यता देणे आदी कामे कायम लिपीक नसल्यामुळे प्रलंबित राहतात.

# जमिनीचा न्यायालयात वाद चालू असताना ज्येष्ठाची केली फसवणूक

**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील औराद येथील चार एकर शेतीचा न्यायालयात वाद सुरु आहे. याची पूर्वी कल्पना न देता ती जमीन साडे दहा लाख रुपये विकून ज्येष्ठांची फसवणूक केली.

याप्रकरणी एकावर जेलरोड पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना २१ सप्टेंबर २०२४ ते ९ ऑक्टोबर २०२४ दरम्यान जिल्हा न्यायालयासमोर सोलापूर येथे घडली आहे. लक्ष्मण सदाशिव अवसरे (वय ६४ रा. शिवगंगा नगर,जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शेती मालक मनोज मलकय्या गुत्तेदार (रा. औराद,ता दक्षिण सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांत दाखल झालेल्या माहितीनुसार आरोपीने त्याची शेत जमीन विक्रीसाठी काढली होती. त्याची जाहिरातही दिली होती. लक्ष्मण अवसरे यांनी जाहिरात पाहिली. जाहिरात पाहिल्यानंतर आरोपी शेतकऱ्यांशी संपर्क करून जमिनीची माहिती घेतली. तरी औराद येथील गट नं ४६०/१ चार एकर जमीन विक्रीसाठी काढली आहे,ती शेती पसंती पडल्याने फिर्यादीने ऑनलाईन द्वारे २१ ऑक्टोबर २०२४ रोजी ५१ हजाराचा इशारा दिला.२६ ऑक्टोबर २०२४ रोजी सहा लाख रुपये चेकद्वारे व चार लाख रोख असे एकुण १० लाख ५१ हजार रुपये विश्वासाने दिलेत. परंतु गुत्तेदार यांनी जमिनीची न्यायालयात वाद चालू आहे,याबाबतची कोणतीही कल्पना न देता लक्ष्मण अवसरे यांच्याकडून पैसे घेवून फसवणूक झाली आहे. फिर्यादीने पैशाची परत मागणी केली असता आरोपीने दमदाटी केली आहे असे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे.या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक बिराजदार हे करीत आहेत.

# मराठी कालगणना हिंदवी स्वराज्य तिथीदर्शिकेचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा,**
**रायगड, दि. ९ फेब्रुवारी-**

औरंगजेबाला महाराष्ट्राच्या मातीत आणून ९ वर्ष सळो की पळो करुन सोडणाऱ्या व त्याच्या नजरेला नजर भिडवून धर्म मतलब आस्था और आस्था कभी बदली नही जाती असे सांगणाऱ्या धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज राजाभिषेक दिन माघ शुद्ध सप्तमी (तिथीनुसार) दुर्गदुर्गेश्वर रायगड येथे मोठ्या उत्साहात जल्लोषात संपन्न झाला. शंभुराजाभिषेक सोहळा माघ शुद्ध सप्तमी आंग्ल दिनांक ४ जून रोजी रायगडावर श्री शंभुराजाभिषेक दिनोत्सव सेवा समिती यांच्या सौजन्यातुन उत्साहात जल्लोषात राजाभिषेक सोहळा पार पडला. परकीय सत्ताधाऱ्यांच्या छाताडावर भगवा रोवुन शिवछत्रपतींनी हिंदवी स्वराज्य निर्माण करुन स्वतःचा राज्याभिषेक चालु केले. याची प्रेरणा घेऊन मारुती सिंधुबाई दिगंबर सुरवसे यांच्या संकल्पनेतील महाराष्ट्रातील पहिली मराठी कालगणना हिंदवी स्वराज्य तिथीदर्शिका प्रकाशन कॅबिनेट मंत्री भरतशेठ गोगावले, संत तुकाराम महाराज यांचे ११वे वंशज हभप अनिकेत मोरे महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. श्री शंभुराजाभिषेक दिनोत्सव निमित्त शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान संस्थापक अध्यक्ष मारुती सुरवसे यांच्या संकल्पनेतील हिंदवी स्वराज्य तिथीदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी शिवशंभु विचार मंच चे सुधीर थोरात, शंभुव्याख्याते अक्षय चंदेल, शंभुराजाभिषेक समितीचे अध्यक्ष सिद्धेश मोरे, सिद्धेश सुर्वे, पवन नगरकर, शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान संस्थेचे अध्यक्ष मारुती सुरवसे, उपाध्यक्ष अशोक झाडे, साक्षी कुंदनानी, मयुरी जायप्पा, आदी उपस्थित होते.

# हळदी-कुंकू संस्कृती जतन करणारा सण

### जयश्री माने यांचे प्रतिपादन

### होम मिनिस्टरमध्ये गुळवंचीत महिलांचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

हळदी कुंकू हा महिलांचा पारंपारिक संस्कृती जतन करणारा सोहळा असून यामुळे विचाराची देवाणघेवाण, सामाजिक ऐक्याची भावना निर्माण होते, गुळवंची गावात सरपंच सुनिल जाधव यांनी प्रथमच महिलांचे एकत्रित हळदी-कुंकू तर तुमच्या मधील कलागुणांना वाव देण्यासाठी होम मिनिस्टर या कार्यक्रमात आपण मोठ्या संख्येने उपस्थित राहिलात हाच वैचारिक वारसा जपू या, असे बीएमआयटी शिक्षण संकुलच्या सचिवा जयश्री माने यांनी सांगितले.

पृथ्वीराज माने युवामंच व गुळवंची ग्रामपंचातीचे वतीने आयोजित केलेल्या मकरसंक्रांतीनिमित्त महिलाचे एकत्रीत हळदी कुंकू समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी मयुरा माने, सरपंच सुनिल जाधव, उपसरपंच आरती इंगळे, माजी सरपंच अश्विनी जाधव, कविता घोडके-पाटील, माजी उपसरपंच सुनंदा शिंदे,




ग्रामपंचायत सदस्या जयश्री तांबे, माजी सरपंच तृप्ती पौळ, सौ नूतन बोराडे, प्रियंका भगत, शैला सोनटक्के, रेशमा कदम, रेशमा भोसले, शितल तांबे आदी उपस्थित होत्या. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन वाण देवून हळदी कुंकू समारंभ करण्यात आला. होम मिनिस्टरचा जलवा यावेळी निवेदिका श्वेता हुल्ले यांच्या होम मिनिस्टर कार्यक्रमाने रंगत आणली,संगीत खुर्ची, तळ्यात मळ्यात, फुगे फोडणे, फॅशन शो प्रश्नमंजुषामध्ये महिलांनी दिलखुलासपणे सहभागी झाल्या. यावेळी गुळवंची गावची होम मिनिष्टर विजेती ज्योती हरीदास गिलबिले यांना पैठणी व सोन्याची नथ तर उपविजेत्या श्वेता शिंदे यांना पैठणी व चांदीचा करंडा तर उपस्थित महिलामधून लकी ड्रॉ मधून तुळसाबाई खडके यांना पैठणी देवुन सन्मान करण्यात आला. माजी आमदार दिलीपराव माने यांचे मार्गदर्शन, डॉ. पृथ्वीराज माने यांच्या प्रेरणेतुन युवामंचचे माध्यमातून सामाजिक विधायक कामे करीत असून गावच्या विकासासाठी गावची एकी महत्वाची असून नागरीक विशेषतः महिलांचा सहभाग घेऊन गावात विकासात्मक काम करु असे सरपंच सुनिल जाधव यांनी सांगितले.

उमेदच्या विजया बोराडे, रंजना कोरके, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी सेविका यांनी कार्यक्रमास विशेष परिश्रम घेतले. उपशिक्षिका राजश्री माने यांनी आभार मानले.

# एकनाथ शिंदे यांना महाद शिंदे राष्ट्रगौरव पुरस्कार

### शरद पवारांच्या हस्ते पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**नवी दिल्ली, दि.९ फेब्रुवारी-**

राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महाद शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला. येत्या मंगळवारी (११ फेब्रुवारी) दिल्लीत माजी केंद्रीय मंत्री आणि दिल्लीत होत असलेल्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. ५ लक्ष रुपये, मानपत्र, सन्मानचिन्हं आणि शिंदेशाही पगडी असे पुरस्काराचे स्वरुप आहे. केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, जेष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे आणि पद्मभूषण राम सुतार यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील. नवी दिल्ली येथे एका कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुणे आयोजित अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित याच कार्यक्रमात दिल्लीत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींचा गौरव केला जाणार आहे, अशी माहिती, सचिन ईटकर, वैभव डांगेआणि लेशपाल जवळगे यांनी दिली.



कार्यक्रमाच्या पूर्वी मराठी अभंगांसाठी प्रसिद्ध सरहदच्या शमिमा अख्तर यांच्या अभंग गायनाचा तसेच मराठी गीत गायनाचा कार्यक्रम असणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




## कीर्तनकारांसाठी शिंदे शिवसेनेची अपघाती विमा योजना

### अक्षय महाराज भोसले यांची माहिती

**पंढरपूर, दि. ९ फेब्रुवारी-**

शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ६० व्या जन्मदिनाचे औचित्य साधून राज्यातील कीर्तनकारांसाठी पाच लाख रुपयांची अपघाती विमा योजना सुरु करीत असल्याची माहिती धर्मवीर अध्यात्मिक शिवसेना प्रमुख अक्षय महाराज भोसले यांनी दिली. शिवसेनेचे नेते खा श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याचे मुख्यमंत्री असताना घेतलेले निर्णय, अध्यात्मिक क्षेत्रात केलेले कार्य याविषयी जनजागरण करण्याच्या दृष्टीने शिवसेनेचे धर्मवीर नावाचे मुखपत्र सुरू करणार असल्याचे सांगून अक्षय महाराज भोसले म्हणाले, राज्यातील सुमारे ६० हजार विद्यार्थ्यांना अध्यात्मिक शिक्षण देणार, राज्यातील ६ हजार मंदिरात प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला कीर्तनसेवा, राज्यातील २४ हजार गावातील प्रत्येकी २ भजनी मंडळास भजनी साहित्य तसेच राज्यस्तरीय भजन स्पर्धा आयोजित करणार असल्याचे ते म्हणाले.

## वाडीकुरोलीत आज राष्ट्रवादीचा अजितपर्व संवाद मेळावा




**करकंब, दि. ९ फेब्रुवारी-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या आदेशानुसार पक्ष सदस्य नोंदणी व अजितपर्व विद्यार्थी संवाद, पदाधिकारी मेळावा सोमवारी १० फेब्रुवारी रोजी वसंतराव काळे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय वाडीकुरोली (ता. पंढरपूर) येथे होणार आहे. यापूर्वी हे कोल्हापूर, सांगली, सातारा येथे झाले. उद्घाटन राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांनी केले. राष्ट्रवादीचे नेते कल्याणराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्या सरकारी दरबारी मांडून त्या सोडविण्यासाठी सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून यावेळी विविध पक्षातील विद्यार्थी, पदाधिकारी मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करणार असल्याची माहिती राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस महेश बोचरे यांनी दिली. या कार्यक्रमास राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष समाधान काळे, महिला जिल्हाध्यक्ष वर्षा शिंदे, तालुकाध्यक्ष अनिल नागटिळक, शहराध्यक्ष दिगंबर सुडके आदींसह जिल्ह्यातील विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.



## विद्यार्थी शाळेची संपत्ती : व्हनमाने

**अक्कलकोट, दि.९ फेब्रुवारी-**

विद्यार्थी शाळेची संपत्ती असून विद्यार्थी शिस्तप्रिय, शांतीप्रिय असले पाहिजे. चारित्र्यसंपन्न, एकाग्रचित्त, आत्मविश्वास असे तीन महत्त्वाचे कार्य विद्यार्थी जीवनात अंमलबजावणी केल्यास विद्यार्थी यशस्वी होतात असे प्रतिपादन केले शंकर व्हनमाने यांनी केला. तालुक्यातील नागणसूर येथील एच. जी. प्रचंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत बारावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला, यावेळी ते बोलत होते. यावेळी मुख्याध्यापक सुरेश कोरचगाव, लक्ष्मी काणेकर, लक्ष्मी कोळी, भाग्यश्री कोणापुरे, लक्ष्मी इंगळे, ऐश्वर्या आलुरे, तोडकरी, पुजारी, प्रा. ईरण्णा धानशेट्टी, अनिल इंगळे, शरणू मणुरे, बसवराज कोळी, बसवराज धनशेट्टी, चन्नवीर कल्याण, माणिक किणगी, सागर पोद्दार, उपस्थित होते. स्वागत नागुरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. चिदानंद मठपती यांनी केले. आभार प्रशांत नागुरे यांनी मानले.

## सरपंचास जातिवाचक शिवीगाळ करुन मारहाण; आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर

**बार्शी, दि. ९ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील कन्हेरगाव येथील सरपंच श्रीकांत निवृत्ती बनसोडे यांना गावातील उत्तरेश्वर तुकाराम केदार यांनी रस्त्यावर मुरुम न टाकल्याच्या कारणावरुन जातीवाचक बोलून अपमानित करुन शिवीगाळ, मारहाण केल्याचा आरोप करत सरपंच श्रीकांत बनसोडे यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात तक्रार दिलेली होती. त्या तक्रारीवरुन आरोपी उत्तरेश्वर तुकाराम केदार यांयाविरुद्ध अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे यातील आरोपीच्यावतीने बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायालय येथे अटकपूर्व जामीनासाठी ॲड. मुकेश परबत यांच्यामार्फत अर्ज दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणात कोणत्याही प्रकारचा मुद्देमाल आरोपीकडून जप्त करण्याचा नसल्याने आरोपीच्या अटकेची गरज नसल्याचा युक्तिवाद आरोपीच्या वकिलांकडून करण्यात आला व आरोपीस अटकपूर्व जामीनावर मुक्तता करण्याची मागणी करण्यात आली. त्यावर जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी आरोपीचा अटी व शर्तीसह अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला. यात आरोपीतर्फे ॲड. मुकेश परबत, ॲड. शुभम बळे, ॲड. सागर फरतडे यांनी कामकाज पाहिले.

## राज्यस्तरीय वैयक्तिक गीत गायनमध्ये जोसेफिया मुर्शदला प्रथम क्रमांक



**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

येथील अल्फा ओमेगा ख्रिश्चन महासंघ आयोजित कवीवर्य रेव्ह. नारायण वामन टिळक स्मृती महोत्सव आयोजित राज्यस्तरीय वैयक्तिक गीत गायन स्पर्धेत जोसेफिया मुर्शद हिने प्रथम क्रामंक पटकाविला. तिने कवी रेव्ह. नारायण वामन टिळक यांच्या गीतांना स्वरबद्ध करून या स्पर्धेत प्राविण्य मिळविले. तिने केलेल्या भरीव कार्य, उल्लेखनीय, प्रशंसनीय असल्यामुळे अल्फा ओमेगा ख्रिश्चन महासंघ तिच्या स्वरांना मान देऊन सन्मानपत्र, ट्रॉफी देऊन सन्मानित केले.

# दहावी, बारावीच्या परीक्षांना आत्मविश्वासाने सामोरे जाणार

## विद्यार्थ्यांना आत्मविश्वास; शिक्षकांकडून परीक्षार्थ्यांना मार्गदर्शन अन् शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ९ फेब्रुवारी-**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षा अनुक्रमे दहावी २१ फेब्रुवारी व बारावी ११ फेब्रुवारीपासून आयोजित करण्यात आल्या आहेत. बारावी परीक्षेसाठी कला शाखा ३,८१,९८२, वाणिज्य शाखा ३,२९,९०५, विज्ञान ७,६०,०४६ अशा एकूण १५,१३,९०९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.**



महाविद्यालयामध्ये सीईटी परीक्षेच्या दृष्टीने अभ्यासक्रम होता. विकली टेस्टमुळे प्रश्नांच्या उत्तरांची उकल झाली.पीसीएमबीएच्या शिक्षकांनी योग्य मार्गदर्शन केले,जेईई,नीट,सेट यांची तयारी करून घेतल्याने आम्ही उत्तम गुणांनी उत्तीर्ण होण्याबद्दल आत्मविश्वास वाढला.

**-सिद्धी निकम, विद्यार्थी, दहावी**



विशिष्ट ध्येय सामोरे ठेवून परीक्षा दिल्यास नक्कीच उज्वल यश प्राप्त होणार आहे.विज्ञान विषयाचा मुद्देसूद अभ्यास केल्यास तो अवघड नाही. गणितात पाठांतरापेक्षा सराव केल्यास १०० पैकी१०० गुण प्राप्त होऊ शकतात.इंग्रजी व्याकरणावर भर दिल्यास तो विषयही सोपा होतो. **-प्रणिती चव्हाण, विद्यार्थिनी, दहावी**

शिक्षण आणि करिअरच्यादृष्टीने १२वीची परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील टर्निंग पॉईंट असल्याने विद्यार्थ्यांसाठी १२वीच्या परीक्षेतील मार्क्स हे महत्त्वाची भूमिका बजावतात.विद्यार्थ्यांना प्रत्येक पेपरामध्ये दोन ते तीन दिवसांचे अंतर ठेवण्यात आले आहे, लागोपाठ पेपर नसल्याने विद्यार्थ्यांना योग्य तयारीची संधी मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढेल. त्यामुळे१०वी १२वीच्या परीक्षेला विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने सामोरे जावे अशा प्रकारचे आव्हान करकंब येथील मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व शुभेच्छा देताना केले.विद्यार्थ्यांनीही परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाणार असल्याची मनोगते व्यक्त केली.राज्यात १०वी,१२वीच्या परीक्षा भयमुक्त आणि कॉपीमुक्त वातावरणामध्ये पार पडाव्यात यासाठी राज्य शिक्षण मंडळाने विशेष खबरदारी घेतली आहे.



अंतर्गत मूल्यमापनात दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयासाठी २० गुण मिळतात. भाषा विषयात दहा गुण, गृहपाठ व तोंडी परीक्षेचे दहा गुण, प्रयोगासाठी १२ तर गणित विषयासाठी १०, गृहपाठ व वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या उत्तरासाठी १० गुण दिले जातात. बोर्डाच्या त्रिभाषा सूत्रानुसार (मराठी, हिंदी, इंग्रजी) तिन्ही विषयात मिळून १०५ गुण मिळणे आवश्यक आहे. हेच सूत्र गणित, विज्ञान विषयाला लागू असून दोन्ही विषयात मिळून ७० आणि एका विषयात किमान २५ गुण जरुरी आहेत.इतिहास व भूगोल या विषयांनाही २० अंतर्गतगुण असतात.

**-हेमंत कदम, प्राचार्य**



परीक्षा केंद्रावर किमान एक तास अगोदर पोहोचणे,मनावर दडपण अथवा भीती न बाळगता आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जाणे,पाठांतरापेक्षा स्वतः नोट्स काढणे,पहाटे लवकर उठून अभ्यास करणे,उत्तरे वेळेत लिहीण्याचा सराव करणे या सूत्रांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्यांना निश्चितपणे चांगला फायदाच होईल. **-विजया उंडे, प्राचार्या**



विद्यार्थ्यांनी प्रत्येक विषयाचे वेळापत्रक बनवून अभ्यास केल्यास चांगले गुण प्राप्त होऊ शकतात. बारावी बोर्ड परीक्षेत चांगले गुण प्राप्त केल्यास अभियांत्रिकी शाखेकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळू शकतो.यशस्वी होण्यासाठी सातत्यपूर्ण परिश्रम आवश्यक आहेत. याच बळावर बारावीच्या परीक्षेला सामोरे जाण्याचा निर्णय घेतला आहे. **-रोहन कुंभार, विद्यार्थी, बारावी**



दहावी बारावीच्या बोर्ड परीक्षेत प्रत्येक विषयासाठी अंतर्गत २० गुण (प्रात्यक्षिक व तोंडी) व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी त्रिभाषा सूत्राचा अवलंब केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणताही तणाव न घेता आत्मविश्वासाने अभ्यास करून चांगल्या टक्केवारीसाठी प्रयत्न करावेत.निश्चितपणे विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळतील.

**-संगीता करमाळकर, मुख्याध्यापिका**



चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्यासाठी फक्त अभ्यासास प्राधान्य न देता नियमित आहार, झोप याविषयीही योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. परीक्षा ही केवळ शैक्षणिक माहितीची चाचणी नसून ती शांतता, सुरक्षितता व धैर्याची चाचणी आहे. स्वतःवर विश्वास हवा.

**-रोहित नलावडे, विद्यार्थी, दहावी**



विद्यार्थ्यांनी शाळा,महाविद्यालयात झालेल्या पूर्व व सराव परीक्षेतील चुका,कमतरता दूर करून परीक्षेची तयारी करावी.विद्यार्थ्यांनी मन प्रसन्न ठेवून अभ्यास केल्यास निश्चितचपणे ते चांगल्या गुणांनी यशस्वी होतील. दहावीच्या दोन पेपरांमध्ये ९ दिवसांचे अंतर असल्याने विद्यार्थ्यांना नीट व जेईईसारख्या महत्त्वाच्या परीक्षांची तयारी करताना अधिक वेळ मिळणार आहे.

**-अजित पवार, प्राचार्य**

कॉपीमुक्त,भयमुक्त वातावरणात परीक्षा पार पडाव्यात यासाठी भरारी पथकांची नेमणूक करण्यात येणार आहे.विद्यार्थ्यांना परीक्षेला जाताना त्यांचे हॉल तिकीट सोबत ठेवणे बंधनकारक आहे.परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिक उपकरणे, मोबाईल फोनचा वापर निषिद्ध असणार आहे.१०० टक्के कॉपीमुक्त परीक्षा पार पाडण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

## हॅकेथॉन स्पर्धेत मुंडफणेवाडी शाळेचे यश



**माळीनगर, दि. ९ फेब्रुवारी-**

कॉम्प्युटर सायन्स हॅकेथॉन स्पर्धेत माळशिरस तालुक्यातील मुंडफणेवाडी येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वेळापूर यांच्यामार्फत आयोजित करण्यात आलेल्या हॅकेथॉन स्पर्धेत जिल्ह्यातील ४८०९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी ३० विद्यार्थी व १० शिक्षकांची जिल्हास्तरावर निवड करण्यात आली होती. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुंडफणेवाडीच्या श्रावणी चव्हाण, समर्थ चव्हाण व सोनाक्षी सावंत या विद्यार्थ्यांची या स्पर्धेसाठी निवड झाली होती. या विद्यार्थ्यांनी ऊस तोडणी कामगार मुलांच्या शिक्षणाची समस्या हा गेम बनवला होता. वर्गशिक्षक समीर लोणकर व अर्चना वाघ यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

या स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी शाळेला दोन टॅब लेक्सा इको डॉट, कॉम्प्युटर कोडींग पुस्तके, सर्टिफिकेट आणि मेडल ही बक्षीस प्रदान करण्यात आली. माळशिरसचे गटशिक्षणाधिकारी प्रदीप कुमार करडे, विस्तार अधिकारी सुषमा महामुनी, केंद्रप्रमुख भक्ती नाचणे यांनी अभिनंदन केले.




## दिल्ली भाजपा विजयाचा अक्कलकोटमध्ये जल्लोष

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ फेब्रुवारी-**

२७ वर्षाच्या कालखंडानंतर दिल्लीमध्ये भाजपाची सत्ता आल्याने तळागळातील कार्यकर्त्यांपासून ज्येष्ठ नेत्यापर्यंत सर्वांना आनंद झाला. यानिमित्त अक्कलकोट तालुक्याचे आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनानुसार लाडू वाटप करण्यात आले. फटाके फोडून भारतीय जनता पार्टी व नरेंद्र मोदी यांची घोषणा देऊन आनंद व्यक्त करण्यात आला.

खोट्या प्रचाराला दिल्लीची जनता बळी न पडता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जनतेने विश्वास व्यक्त केला. दिल्लीच्या विकासाचे पूर्व सुरू होईल असे मनोगत शहर भाजपाध्यक्ष शिवशरण जोजन यांनी व्यक्त केले. मिलन कल्याणशेट्टी, शिवशरण जोजन, प्रविण शहा, अप्पासाहेब पाटील, शिवशरण वाले, रामचंद्र होनराव, नन्नुभाई कोरबू, अंकुश चौगुले, रजाक सय्यद, चंदनवाले, अर्पण थोटे, ओमप्रकाश शिंपी, नागराज कुंभार, ऋतुराज राठोड, बबलू कामनुरकर, इरेश उडचण, संतोष भालके, लखन झंपले, प्रकाश पाटील, भारत धांडेकर, लाला साळुंके, शरणू कापसे, केदार माळशेट्टी, अभिषेक लोकापुरे, संजय भागानगरे, राहुल ढोबळे, अभिषेक चव्हाण, बसवराज स्वामी उपस्थित होते.

## घरोघरी जाऊन स्वच्छतेचे महत्त्व सांगा : कोळी



**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ९ फेब्रुवारी-**

सर्व विद्यार्थ्यांनी श्रमदान करत असताना गावातील प्रत्येक घरात जाऊन प्रत्येक महिलेला स्वच्छता व श्रमाचे महत्त्व पटवून द्यावे. शिबीर संपल्यानंतरही गाव स्वच्छ असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर काळानुसार बदल होत असताना शिक्षण, आरोग्य याविषयी प्रबोधन करावे आणि शिबिरात ग्रामस्थांना सहभागी करुन घ्यावे, असे आवाहन सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष प्रकाश कोळी यांनी केले. मंद्रुप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या बसवनगर येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी बसवनगरचे सरपंच निखिल राठोड, सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे सचिव एम. डी. कमळे, सहसचिव प्रा. सुबोध कोळी, खजिनदार प्रा. व्ही. के. पाटील, संचालक नागेश बिराजदार, प्राचार्य डॉ. जवाहर मोरे व निर्मल पवार उपस्थित होते. सचिव एम. डी. कमळे म्हणाले की, संस्थेचे संस्थापक कमळे गुरूजींनी श्रममेव जयते हे ब्रीद वापरून श्रमाला महत्व दिले आहे. त्यामुळे अशी शिबिरे झाली तर विद्यार्थ्यांना ही श्रमाचे महत्त्व कळेल. सरपंच निखिल राठोड यांनीही मनोगत केले. सूत्रसंचालन प्रा. विजय साळवे यांनी केले. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एच. एल. जाधव यांनी केले तर आभार शिबीर संयोजक प्रा. डॉ. एस. ए. निंबर्गी यांनी मानले.

## पिलीव-माळशिरस रस्त्याला निधी असूनही कामाला विलंब

### प्रवाशांना प्रचंड त्रास तर बांधकाम विभाग बेदखल

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ९ फेब्रुवारी-**

पिलीव-माळशिरस रस्त्यासाठी माजी आ. राम सातपुते यांनी जवळपास २४ कोटी रुपयांचा निधी दिला. निधी उपलब्ध असूनही कामाला विलंब होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

या कामाची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असून या रस्त्याचे काम तीन वेगवेगळ्या ठेकेदारांनी घेतले आहे. यामध्ये पिलीव ते भगवान शिंदे वस्तीपर्यंतचे काम जालना येथील युबीएन या कंपनीने घेतले असून फक्त याच ठेकेदाराचे काम सुरू आहे तर शिंदे वस्ती ते तरंगफळ या टप्प्यातील काम आर. डी. माने कन्स्ट्रक्शनने घेतले आहे. हे कामसुद्धा सध्या बंदच आहे तर तरंगफळ ते माळशिरस या टप्प्यातील काम अकलूज येथील शिवरत्न कन्स्ट्रक्शन या कंपनीने घेतले असून हे कामसुद्धा आता बंदच आहे. सदरच्या रस्त्याच्या कामाला प्रचंड मोठा निधी उपलब्ध करुन देऊनही या कामाचा अद्यापही पत्ताच नाही. मग हे सदरचे काम नक्की कधी पूर्ण होणार व नागरिकांचा व प्रवाशांना सध्या जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागत आहे. हे काम ताबडतोब पूर्ण करावे यासाठी अकलूज येथील सार्वजनिक बांधकाम विभागाला लवकरात लवकर काम पूर्ण करावे, अशी मागणी होत आहे.

# कृषी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

### भिलार, पाचगणीत जमले जुने मित्र; १९७३-७७ काळात शिकले होते एकत्र



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ९ फेब्रुवारी-**

कृषी महाविद्यालय पुणे बीएससी ॲग्री १९७३-७७ या मित्रांचे दहावे माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन भिलार पाचगणी येथे सातारा कृषी मित्रांच्या वतीने पार पडले. ९० माजी विद्यार्थी आपल्या सहचारिणी बरोबर या कार्यक्रमास उपस्थित होते.महिला प्रतिनिधींनी गायलेल्या स्वागत गीताने कार्यक्रमाची छान सुरुवात झाली. यानंतर आयोजकांच्या वतीने महिला प्रतिनिधी व आयोजकांच्या वतीने दीप प्रज्वलन करण्यात आले. दीप लावूया ज्ञानाचा प्रकाश पसरेल समतेचा या विचाराने प्रेरित होऊन दीप प्रज्वलन संपन्न झाले. यानंतर दिवंगत मित्रांना श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. आयोजक श्री भीमराव खाडे यांनी आपल्या प्रास्ताविकात स्नेहसंमेलनाचा उद्देश व ते आयोजनाच्या मागचा उद्देश आपल्या खूमासदार शैलीत उपस्थितांसमोर मांडला. नंतर महिला प्रतिनिधी म्हणून सौ. मीना अडसूळ यांनी आपले विचार व्यक्त केले.

मित्रत्वाची गरज, महिलांच्या पाठिंब्याची गरज व संमेलनाची पुढील दिशा यावर सविस्तरपणे आपले विचार लोकांसमोर ठेवले. नंतर सौ फयिमा सय्यद यांनी शेर शायरी प्रस्तुत करून उपस्थितांच्या टाळ्या मिळवल्या. सौ व श्री कुमार ढेरे व भुवन पाटील यांच्या लग्न वाढदिवसानिमित्त केक कापून सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. श्रीमान गुलाबराव पोळ माझी पोलीस आयुक्त यांचे शुभहस्ते एडमिन श्री व सौ परदेशी यांचा सन्मान करण्यात आला. यापूर्वी नऊ संमेलनास उपस्थित असणाऱ्या सर्व मान्यवरांचा परदेशी यांनी ट्रॉफी व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. सर्व आयोजकांचा गौरव करताना एडमिन परदेशी यांनी आपले विचार व्यक्त करताना संमेलनाचे आयोजन व भव्यता कशी असावी हे आजच्या दहाव्या स्नेहसंमेलनावरून दिसून येत आहे असे सांगून सर्व आयोजक मित्रांना धन्यवाद दिले.

श्री धारराव भोसले व त्यांच्या साताऱ्यातील सर्व सहकाऱ्यांनी केलेल्या मेहनतीची प्रशंसा केली. यानंतर श्रीमान वीरेंद्र केंजळे प्रस्तुत साज वाद्य वृंद ग्रुप आयोजित बहारदार गीतांचा कार्यक्रम आयोजनात आला होता. सुंदर आवाजात गायलेल्या सुमधुर गीतांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. रात्री भोजनानंतर थंडीमध्ये शेकोटी समोर बसून गाण्यांची मैफल रंगली. दुसऱ्या दिवशी सकाळी महिलांचा हळदी कुंकू कार्यक्रम व सर्व उपस्थितांना साताराचे प्रसिद्ध कंदी पेढे भेट देऊन निरोप देण्यात आला. आयोजक श्रीयुत भोसले यांनी सर्वांचे आभार मानले.

हा प्रोग्राम आयोजनात श्री बोराटे, डिसले, खाडे, गोसावी, घाडगेबुआ, बोरकर, सय्यद यांचा मोलाचा वाटा कार्यक्रम यशस्वी करण्यामागे आहे हे नमूद करून त्यांना सहकार्याबद्दल धन्यवाद दिले. फोटो सेशन व नंतर निरोप घेताना पुढील स्नेहसंमेलनाची आतुरता मनात ठेवून पन्नास वर्ष मित्रता जपणारे सर्वजण अलविदा झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सतीश अडसूळ यांनी आपल्या सुंदर शब्दसुमनांनी करून कार्यक्रमाचे आयोजन कसे असावे हे उपस्थितांसमोर मांडले. अशा दहाव्या मैत्री बंध संमेलनाची यशस्वी सांगता झाली.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## के. एन. भिसे महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद उत्साहात



**कुर्डूवाडी, दि. ९ फेब्रुवारी-**

येथील के. एन. भिसे आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, विद्यानगर भोसरे या ठिकाणी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या उद्योजकतावर राष्ट्रीय परिषद पार पडले. अध्यक्षस्थानी माढा तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा जयश्रीताई भिसे होत्या. उद्घाटन माढ्याच्या नगराध्यक्षा अ‍ॅड. मीनलताई साठे केले. प्राचार्या डॉ. अनुपमा पोळ, डॉ. अस्मिता बाळगावकर, अवधूत देशमुख, सलोनी झगडे, डॉ. भाग्यश्री वटवे यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. माढा तालुक्यातील महिला बचत गटांच्या उत्पादनाच्या विक्रीचे स्टॉल लावण्यात आले होते. सायंकाळच्या सत्रामध्ये पेपर वाचनाचे सत्र झाले. या परिषदेचा समारोप संस्थेच्या अध्यक्षा जयश्रीताई भिसे, संचालिका राजश्रीताई भिसे, मदने, प्राचार्या डॉ. अनुपमा पोळ, उपप्राचार्य डॉ. पी. एस. कांबळे यांच्या उपस्थितीत झाला. उपप्राचार्य डॉ. पी. एस. कांबळे यांनी अहवालाचे वाचन केले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष संतोष भिसे, सचिव शामसुंदर भिसे, डॉ. संगिता पैकेकरी, सिनेट सदस्य डॉ. सीमा गायकवाड, डॉ. सुनिता कांबळे, डॉ. शोभा खंदारे, डॉ. वंदना गवळी, डॉ. सुधा बनसोडे, डॉ. विजया गायकवाड उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### वैराग येथे पत्रकारांच्या आरोग्याची तपासणी

**वैराग, दि. ९ फेब्रुवारी-**

वैराग येथील मॅक्सकेअर हॉस्पिटल व मासाळ परिवाराच्या वतीने वैराग भागातील पत्रकारांसाठी महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन निवृत्त शिक्षक भाऊसाहेब मासाळ यांनी केले. डॉ. अनंत म्हेत्रे, डॉ. सुप्रिया पाटील, डॉ. प्रविण मासाळ आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिरात हिमोग्लोबीन, शुगर तपासणी, इसीजी, नाडी परीक्षण, रक्तदाब, शरीरातील ऑक्सिजनचे प्रमाण आदी मोफत तपासणी करण्यात आली. त्यानंतर तज्ज्ञ डॉक्टरांनी मोफत उपचार करून सर्व पत्रकारांना समुपदेशन केले. यावेळी रामदास पवार, राहुल दळवी, काशीनाथ क्षीरसागर, किरण आवारे, आनंद डुरे, सुजीत काकडे, शांतीलाल काशीद, सतीश बुरगुटे, संतोष राजगुरू, राहुल भालशंकर, मुज्जोमिल कौठाळकर, सोनवणे उपस्थित होते. सूत्रसंचलन बलभिम लोखंडे यांनी केले तर आभार कालीदास देवकते यांनी मानले. कार्यक्रमासाठी तेजस नवले, वैष्णवी जानराव, मोहिनी ढेंकणे, प्रज्ञा पाचभई यांनी परिश्रम घेतले.



### एनएमएमएस परीक्षेत रामभाऊ जोशी हायस्कूलचे यश

**करकंब, दि. ९ फेब्रुवारी-**

आठवीतील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत करकंब येथील रामभाऊ जोशी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. यात प्रसाद लोंढे १०३, जानकी गळीतकर १००, आर्यन शेटे ९२, प्रसाद देशमुख ९२, आशुतोष मदने ९०, ऋतुजा ढोबळे ८९, रिया कोळेकर ८७, धीरज मोहिते ८३, नंदिनी कांबळे ८२, वेदिका चरपे ८१, पुष्कराज शिलवंत ८१, नेहा पवार ८०, आल्फिया हवालदार ८०, सोनिया धोत्रे ७८, अर्जुन कापसे ७८, शिवराज शिंगटे ७८, अनुष्का मदने ७७, सार्थक व्यवहारे ७५, अविष्कार व्यवहारे ७५, कार्तिक मोहिते ७३, कीर्ती जवारे ७३, साक्षी गायकवाड ६७, भूमी शिंदे ६६, रुद्र पलंगे ५८ या २४ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश प्राप्त केले. विद्यार्थ्यांना परीक्षा प्रमुख संजय पाटील, शिक्षक गणेश गायकवाड, सोमनाथ माने, महादेव व्यवहारे, मनीषा ढोबळे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थांचे दयानंद शिक्षण संस्थेचे स्थानिय सचिव महेश चोप्रा, प्रशासकीय अधिकारी डॉ. विजयकुमार उबाळे, प्राचार्य हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे यांनी अभिनंदन केले.



### चंद्रकांत धसाडे यांचे जिल्हा परिषद कर्मचारी क्रीडा स्पर्धेत तिहेरी यश

**पिलीव, दि. ९ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव, जाधवस्ती शाळेतील आदर्श शिक्षक चंद्रकांत धसाडे यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने घेतलेल्या पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धेत तिहेरी यश संपादन केले. यामध्ये २०० मीटर धावणे प्रथम, ४०० मीटर धावणे प्रथम, लांब उडी दुसरा तर जिल्हा परिषदेचा बेस्ट प्लेअर आफ दी ॲथलिट हा पुरस्कार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिला. माळशिरसचे गटशिक्षणाधिकारी प्रदीपकुमार करडे, विस्तार अधिकारी महामुनी, केंद्र प्रमुख राजकुमार फासे व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन केले.

### अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी सुरजा बोबडे

**टेंभुर्णी, दि. ९ फेब्रुवारी-**



अखिल भारतीय सरपंच परिषदेचे संस्थापक अध्यक्ष जयंत पाटील यांच्या आदेशानुसार सोलापूर जिल्हा सरपंच परिषदेच्या अध्यक्षपदी टेंभुर्णीच्या सरपंच सुरजा योगेश बोबडे यांची निवड करण्यात आली. हा सन्मान माझ्यासाठी केवळ पद नसून गावपातळीवरील लोकशाही बळकट करण्याची एक मोठी जबाबदारी आहे, असे बोबडे यांनी सांगितले. या निवडीबद्दल माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, सरपंच परिषदेच्या सदस्यांनी अभिनंदन केले.

# लक्ष्मीटाकळीत बाटली झाली आडवी

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायतींसह ग्रामस्थांचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ फेब्रुवारी-**

पंढरपुर तालुक्यातील जिल्ह्यातील सगळ्यात मोठी ग्रामपंचायत मौजे लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत हद्दीतील अवैध दारू विक्री व दारू दुकाने ताडी विक्री कायमची बंद करण्याबाबत रविवारी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक उपक्रम म्हणून सरपंच संजय साठे यांच्या अध्यक्षतेखाली दारूबंदीचा ठराव मांडण्यात आला होता.

या ठरावाला उपस्थित सर्व ग्रामस्थांनी हात वर करून ठरावाच्या बाजूने मतदान केले तर ठरावाच्या विरोधात एकही मतदान न झाल्याने सदरचा ठराव एकमताने मंजूर झाल्याची जाहीर करण्यात आले.

याप्रसंगी सरपंच संजय साठे उपसरपंच रूपाली कारंडे माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास ढोणे, जिल्हा नियोजन समिती सदस्य तथा लोकसभा संपर्कप्रमुख महेश नाना साठे, तंटामुक्त अध्यक्ष संभाजी कदम, डॉ. शिंदे, सुरेश टिकोरे, आबासो पवार ,विलास देठे, पोलीस पाटील इरकर मॅडम, ग्रामपंचायत सदस्य नागरबाई साठे, औदुंबर डोने, समाधान देठे, गोवर्धन देठे, सागर सोनवणे, आशाबाई देवकते, रेश्मा साठे, रोहिणी साठे, विजयमला वाळके, नंदकुमार वाघमारे, सचिन वाळके, अनिल सोनवणे, महादेव पवार, सागर कारंडे, ग्रामविकास अधिकारी जयंत खंडागळे , भाऊ भोसले,माऊली देशमुख, बोला शिंदे, सय्यद चाचा, सागर महामुनी, पवार मॅडम, सुनीता जाधव, लता वेताळ, प्रियंका कवडे ,व ग्रामपंचायत हद्दीतील शेकडो महिला भगिनी व शेकडो पुरुष मंडळी तसेच पोलीस खात्यातील अधिकारी महसूल खात्यातील अधिकारी पत्रकार बांधव विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होते.

अनेक वर्षापासून लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत हद्दीमध्ये मनुष्यवस्तीत दारू विक्री केली जात असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याच्या तक्रारी ग्रामपंचायतकडे ग्राम स्थांकडून करण्यात आल्या होत्या. याबाबत गांभीर्याने लक्ष देऊन सरपंच संजय साठे यांनी दारूबंदीचा धाडसी निर्णय घेतला. दारूवर टाकू बहिष्कार, व्यसनमुक्तीचा करू पुरस्कार हे ब्रीद वाक्य घेऊन लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत वतीने रविवारी विशेष ग्रामसभेचे आयोजन अण्णाभाऊ साठे प्रशाले समोर करण्यात आले होते. यावेळी दारूबंदीबाबत ठराव मांडल्यानंतर उपस्थित सर्व मंडळी ग्रामस्थांनी हात वर करून दारूबंदी करण्याबाबत मतदान केले. सदर ठरावाबाबतच्या विरोधात एकही मतदान न झाल्याने सदरचा ठराव बिनविरोध बहुमताने संमत करण्यात आल्याचे ग्रामविकास अधिकारी जयंत खंडाळे यांनी जाहीर केले. या विशेष ग्रामसभेनंतर सरपंच उपसरपंच यांनी सर्व सदस्यांचे सर्व ग्रामस्थांचे आभार मानले.



**संवेदनशील मंडळींनी एकत्र यावे : महेश साठे**

कुटुंबातील कर्ता पुरुष जर व्यसनाच्या आहारी गेला तर सर्व कुटुंब उध्वस्त होते. समाजाचा तोटा होत असेल तर समाज व्यसनापासून दूर राहिला पाहिजे. यासाठी संवेदनशील मंडळींनी एकत्र आले पाहिजे अशी भावना संजय साठे यांनी व्यक्त केली.

> उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायततिने दारूबंदीचा समाजमान्य उपक्रम घेतल्याने येथील जनता चांगल्या कामाच्या पाठीशी उभी राहिल्याने लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत राज्यात आदर्श ठरेल असा विश्वास आहे.
>
> **- महेश साठे, सदस्य, जिल्हा नियोजन समिती**

# रेशीम उद्योगाचे शेड पेटवून दिले

**पिलीव येथील घटना; साडेसहा लाखांचे नुकसान**

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ९ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील समशेरसिंग पितांबरसिंग रजपूत यांच्या बचेरी येथे शेत आहे. सदरच्या शेतात रेशीम उद्योगासाठी मोठे शेड उभारले आहे. या शेडला ४ फेब्रुवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास ते ५ फेब्रुवारी सकाळी ८.३० वाजण्याच्या सुमारास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने हे शेड पेटवून दिले.



पेटवून दिल्यामुळे शेडमधील विक्रीस आलेले रेशीम कोष, पाण्याच्या टाक्या, रासायनिक खताची पोती, सोलार पॅनल, पाणयाची मोटार, ड्रिपच्या पाईप व इतर ठेवलेल्या संसारोपयोगी वस्तू आगीत जळून खाक झाल्या असून सुमारे साडेसहा लाखांचे नुकसान झाल्याची तक्रार समशेरसिंग रजपूत यांनी पिलीव पोलीस ठाणयात दिली आहे. यामुळे अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर माळशिरस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी ताबडतोब घटनास्थळी जाऊन पाहणी केली. यावेळेस हवालदार धनाजी झगडे उपस्थित होते. यावेळी घटनास्थळी पाहणी करुन सदर घटनेचा पंचनामा करणयात आला असून, या घटनेचा अधिक तपास पोलीस नाईक दत्ता खरात करीत आहेत. या घटनेचा पिलीवचे महसूल अधिकारी अमोल कांबळे यांनीही घटनास्थळी जाऊन रितसर पंचनामा केला आहे.

# बार्शीतील शांतता कमिटीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**शिवजयंतीनिमित्त नियोजन अन् आढावा; नियम, अटी पाळण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी बार्शी शहर पोलीस स्टेशनच्यावतीने शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदरील बैठक उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



या बैठकीमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल व बार्शी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी शिवजयंती उत्सव साजरा करताना शासनाच्या नियम व अटीबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीनिमित्त बार्शी शहरात अवैद्यरित्या विक्री होत असलेल्या दारुवर कडक कारवाई करण्यासाठी तीन पथक तयार करण्यात येणार असून दारु विक्री करणाऱ्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. शिवजयंतीनिमित्त शहरात लावण्यात येणारे डिजीटल बॅनर हे देखील ठरवून दिलेल्या जागेतच व नगरपालिकेची परवानगी घेऊनच लावावेत. तसेच मंडप व लाऊड स्पीकरसाठी प्रशासनाची परवानगी घेण्याच्या सूचना मंडळ व कार्यकर्त्यांना देण्यात आल्या. यावेळी बैठकीसाठी उपस्थितांची व अधिकाऱ्यांची विविध विषयांवर चर्चा होऊन, बैठक शांततापूर्ण खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. याप्रसंगी बार्शी नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी विठ्ठल पाटोळे, महावितरणचे अधिकारी तसेच बार्शी शहरातील विविध मंडळ, संघटनांचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांनी यशासाठी आग्रही राहावे : प्रा. डॉ. बिराजदार

**तीर्थ येथील श्री रामलिंगेश्वर प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालयात दहावी, बारावी विद्यार्थ्यांना निरोप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ फेब्रुवारी-**

विद्यार्थ्यांनी यश मिळविणारच या जिद्दीने अभ्यास करावा. जीवनात यश मिळाले की, भविष्यात स्वप्नांची पूर्तता करणे सोपे होते. आई-वडिलांना अभिमान वाटावा अशी जिद्द ठेवा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले.

श्रीक्षेत्र तीर्थ (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालयात दहावी, बारावी विद्यार्थांना निरोप देण्यात आला, यावेळी ते बोलत होते. प्रारंभी प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार, राजू गायकवाड यांनी ग्रामदैवत श्री रामलिंगेश्वर प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी गुरुजनांविषयी ऋण व्यक्त केले. शिक्षकांनी शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त सामाजिक जीवन, चारित्र्य, संस्कार, शैक्षणिक, सामाजिक, याबाबत केलेले मार्गदर्शन याबद्दल मनोगत व्यक्त केले.

त्याचबरोबर संस्थेने त्यांच्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या निसर्गरम्य वातावरणातील शालेय परिसर व भौतिक सुविधांबाबत संस्थेचेही ऋण व्यक्त केले. परीक्षा संबंधित व पुढील काळातील शैक्षणिक संधीबाबत प्राचार्य सुधीर सोनकवडे, नागराज पाटील, अमर पाटील यांनी मार्गदर्शन केले. राजू गायकवाड यांनी कोणतेही दबाव न घेता परीक्षेला सामोरे गेले पाहिजे. परीक्षा कालावधीत मानसिक स्थैर्य आबाधित ठेवण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन अमूल्या बाळीकाई, मयुरी भंगुर्गे व भाग्यश्री कुर्ले तर आभार सिद्धाराम पाटील यांनी मानले.

**यशाची परंपरा कायम राहणार**

आतापर्यंतच्या दहावी व बारावीचे निकाल पाहता मी खूप समाधानी आहे. माझ्या जन्मभूमीमध्ये शाळा उभी केल्याचा मला आनंद आहे. १०० टक्के यशाची परंपरा याही वर्षी विद्यार्थी राखतील, अशी अशा आहे. यंदाच्या वर्षी शाळेने राबवलेल्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय नियोजनबद्ध व अविस्मरणीय झाल्याचे समाधान आहे. त्याचबरोबर शाळेच्या उत्तरोत्तर प्रगतीकरिता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपले सर्वोच्च योगदान देण्याचे आवाहन प्रा. डॉ. बिराजदार यांनी केले.

# बांबू उडीपटू नागम्मा बजेचे होणार 'कल्याण'

## मदतीसाठी आ. सचिन कल्याणशेट्टींचा पुढाकार, मुख्यमंत्र्यांकडे मदतीसाठी पाठपुरावा सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ फेब्रुवारी-**

सदलापूर येथील बांबू उडीपटू नागम्मा रविंद्र बजे ही राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आहे. तिने तीनवेळा राज्य स्तरावर आणि चारवेळा राष्ट्रीयस्तरावर खेळली आहे. तिची मध्यप्रदेश भोपाळ येथील आंतराष्ट्रीय प्रशिक्षकांच्या अधिपत्याखाली प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. तिची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने मदतीची आहे. दरम्यान आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी तिच्या मदतीसाठी पाठपुरावा सुरु केल्याने तिच्या प्रशिक्षणाचा मार्ग मोकळा झाला असून, तिचे आता आ. कल्याशेट्टींमुळे 'कल्याण' होणार आहे.



बजे ही बांबू उडी खेळात महाराष्ट्रातली एकमेव खेळाडू आहे. तिला १४ फेब्रुवारीपर्यंत भोपाळ (मध्य प्रदेश) ला जायचे आहे. एक वर्ष भोपाळ येथे निवास व भोजनाचा खर्चही नागम्मा बजे करू शकणार नाही. तिच्या घरची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक आहे. आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या शिफारशीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाकडून आर्थिक मदत मिळण्यासाठी प्रयत्न करीत असल्याची माहिती सेवासदन प्रशाला, सोलापूरच्या माजी मुख्याध्यापिका मानसी दामले यांनी सांगितले. नागम्म बजे ही विद्यार्थिनी बांबू उडी या खेळ प्रकारात आंतराष्ट्रीय प्रशिक्षकांच्या अधिपत्याखाली भोपाळ येथील प्रशिक्षणासाठी भारतातील केवळ ६ खेळाडूंची निवड झाली आहे. यामध्ये महाराष्ट्राची एकमेव नागम्मा बजे ही खेळाडू आहे.

**मानसी दामलेंची मदतीसाठी धडपड**

भोपाळ येथील १ वर्ष राहणे व जेवणाचा खर्च करण्याची ऐपत नागम्माची नसल्याची बाब नागम्माने दै. तरुण भारतशी बोलताना व्यक्त केली होती. याकरिता आर्थिक मदतीची नितांत गरज आहे. मदत मिळाली तरच ती प्रशिक्षण पूर्ण करू शकणार आहे. यासाठी माजी मुख्याध्यापिका मानसी दामले यांनी आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्याशी संपर्क साधला. आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या शिफारश पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नागम्मा बजे हिच्या १ वर्ष प्रशिक्षण खर्चासाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षमधून आर्थिक मदत मिळण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जुगार अड्डयावर पोलीसांचा छापा; तीन आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ फेब्रुवारी -**

धाराशिव शहर पोलिसांनी ८ फेब्रुवारी रोजी जुगार विरोधी मोहिमेअंतर्गत शहरातील तीन ठिकाणी छापे टाकून कारवाई केली. या दरम्यान, तीन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करण्यात आली.

पहिल्या कारवाईत मोहीते गल्ली येथील आनंद बबन खळदकर (वय ५०) याला नाझ हॉटेलच्या बाजूला मोकळ्या जागेत मिलन नाईट मटका जुगार खेळताना रंगेहात पकडले. त्याच्याकडून ९०० रुपये रोख जप्त करण्यात आले. दुसऱ्या कारवाईत शहबाज नदीम पठाण (वय ३१) याला देशपांडे भाजी मंडईजवळील कोकाटे शॉपिंग सेंटरमधील गाळा क्रमांक ३ येथे फन टार्गेट चक्री जुगार खेळताना आढळून आला. त्याच्याकडून २०,८५० रुपये जप्त करण्यात आले. तिसऱ्या कारवाईत उंबरे कोठा येथील बालाजी चव्हाण (वय ३०) याला बार्शी रोडवरील पानटपरीजवळ मिलन नाईट मटका जुगार खेळताना पकडले. त्याच्याकडून ८६० रुपये हस्तगत करण्यात आले.

या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अंतर्गत तीन स्वतंत्र गुन्हे नोंदवण्यात आले असून, पुढील तपास धाराशिव शहर पोलीस करत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### निकिता हिची मुंबई पोलीस दलात निवड

**जळकोट, दि.९ फेब्रुवारी -**

येथून जवळच असलेल्या होर्टी येथील दुसऱ्यांच्या शेतात मोलमजुरी करणाऱ्या शेतमजूर कुटुंबाची मुलगी आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करून मुंबई पोलीस दलात दाखल झाली आहे. गावातून पहिल्यांदाच मुलगी पोलीस झाली आहे. मुंबई शहर पोलीस दलात निकिता सतिश भोसले ही भरती झाल्याबद्दल होर्टी ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर भोसले, संजय गुंजिटे, दत्ता राजमाने, गणेश खराडे, दत्ता भोसले, भागवत भाळशंकर, विलास गायकवाड, धनराज भोसले, गावातील विविध पदांवर कार्यरत असलेले नागरिक, ग्रामस्थ उपस्थित होते.



### न्यू व्हिजन स्कूलचे रंगोत्सव स्पर्धेत यश

**लोहारा, दि.९ फेब्रुवारी -**

रंगोत्सव संस्था मुंबई यांच्यावतीने आयोजित राष्ट्रिय स्तरावरील रंगोत्सव चित्रकला स्पर्धा हि ऑक्टोबर २०२४ मध्ये घेण्यात आली होती. यामध्ये न्यू व्हिजन इंग्लिश स्कुलमधील नर्सरी ते आठवी वर्गातील एकूण २६० विद्यार्थ्यानी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेचा निकाल नुकताच लागलेला असून त्यामध्ये स्कूलचे ३५ विद्यार्थी सुवर्णपदक, २६ विद्यार्थी रजतपदक, १० विद्यार्थी कांस्यपदक, ०५ विद्यार्थ्यांना विशेष प्रविण्यासह स्मृतिचिन्ह, १० विद्यार्थ्यांना विशेष भेटवस्तू आणि सहभागी सर्व २६० विद्यार्थ्यांना तसेच त्यांना मार्गदर्शन केलेल्या वर्गशिक्षक यानांही प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह प्राप्त झाले आहे. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिस वितरण कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अँड. मल्लिनाथ वचने पाटील, प्राचार्य शहाजी जाधव, संचालिका सविता जाधव आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.



### १० वीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**जळकोट, दि.९ फेब्रुवारी -**

होर्टी येथील इंदिरा गांधी प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत १० वी वर्गाच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकाश चव्हाण हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक विनायक राठोड, शिवाजी चव्हाण, शिवाजी कवठे, उमाकांत माळी उपस्थित होते. स्वंयशासन दिनाचे मुख्याध्यापक विक्रम राठोड, मुख्याध्यापक म्हणून समृध्दी राजमाने यांनी काम पाहिले. यावेळी इतर विद्यार्थी शिक्षकांनी पहिली ते ९ वीपर्यंतच्या वर्गाचे अध्यापन केले. कार्यक्रमास बिराजदार एस.एस. बनसगोळे, सचिन दाटे शिवशंकर, नससुडे, भिमराव, घोडके, लिमये, हब्बु आदिजण उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावण राठोड यांनी केले आभार सपना चव्हाण यांनी मानले.



### श्रीयुष चव्हाण याची निवड

**जळकोट, दि.९ फेब्रुवारी -**

येथून जवळच असलेल्या आलियाबाद येथील सुपुत्र श्रीयुष सुनिता संजय चव्हाण याची १४ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली आहे. श्रीयुषने निवड सामन्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आणि निवडकर्त्यांना आकर्षित केले. निवड सामन्यांमध्ये त्याने नाबाद १५४ नाबाद १०८ तसेच ९५ आणि ९१ धावा ठोकल्या होत्या. या निवडीबद्दल माजी पं.स.सभापती प्रकाश चव्हाण, माणिकराव चव्हाण, सरपंच सुर्यकांत चव्हाण, उपसरपंच अमृता चव्हाण, सुभाष नाईक, विनायक चव्हाण, पांडुरंग चव्हाण, सुर्यकांत राठोड, माणिक राठोड, यशवंत राठोड, सिद्राम पवार, शिवाजी चव्हाण, हरीदास राठोड, बाबु राठोड, देविदास चव्हाण, हरीदास चव्हाण यांच्यासह ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

### शहराध्यक्षपदी गणेश शेवते यांची निवड

**कळंब, दि.९ फेब्रुवारी -**

कळंब शहरातील शासकीय विश्रामगृह येथे दि.८ फेब्रुवारी रोजी धाराशिव जिल्हा तेली समाज सेवाभावी संघ धाराशिवची कळंब शहराची नवीन कार्यकारणी बैठक घेऊन निवड करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष रवी कोरे, जिल्हा उपाध्यक्ष राजाभाऊ घोडके, जिल्हा कोषाध्यक्ष महादेव मेंगले, जिल्हा युवक अध्यक्ष शशिकांत बेगमपुरे यांची होती. कळंब शहराध्यक्ष गणेश शेवते, शहर उपाध्यक्ष सोमनाथ क्षीरसागर, उपाध्यक्षपदी संदीप शेवते, कार्याध्यक्षपदी किरण फल्ले, सचिव रोहित किरवे, संघटक बालाजी वांकर, कोषाध्यक्ष ओंकार कलशेट्टी, सहसचिव बबलू दळवे, सहसंघटक विजय देशमाने यांना निवडीचे पत्र देवून त्यांच्या सत्कार करण्यात आला.

## पोलीस आणि नगरपरिषदेचा आंधळेपणा चव्हाट्यावर...

# तुळजापूरात तुटक्या फुटक्या पोलीस चौकीचेच अतिक्रमण

**दिपक चौक बनला अतिक्रमण चौक... अनेक वर्षापासून पडून असलेल्या मोडक्या पोलीस चौकीकडे नगरपरिषद आणि पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष...**





**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.९ फेब्रुवारी -**

दीपक चौकात अनेक वर्षापासून मोडकळीस आलेली जुनी पोलीस चौकी विनाकारण रोडच्या बाजूस ठेवून पोलीस प्रशासनानेच रोडवर अतिक्रमण केले आहे. या पोलीस चौकीमुळे तुळजाभवानी मंदिराकडे दर्शनास जाणाऱ्या भाविकांना विनानाकारण अडथळा निर्माण झाला आहे.

अनेक वर्षापासून तुटलेली गंजलेली लोखंडी पोलीस चौकी रोडच्या बाजूस पडून आहे. त्याकडे नगरपरिषद प्रशासनाचे देखील दुर्लक्ष आहे. अनेक वेळा अतिक्रमण कारवाई करणारे पथक आले आणि गेले. पण नगरपालिकेने देखील ही तुटलेली पोलीस चौकी उचलली नाही. तुळजाभवानी मंदिर संस्थांनी दीपक चौकात नवीन आधुनिक फायबरची पोलीस चौकी बसवली आहे. नवीन पोलीस चौकी बसवली पण तुटलेली. चौकी अजून तशीच जागेवर आहे. या चौकीचा सहारा घेऊन आजूबाजूस सर्वत्र अतिक्रमण वाढले आहे.

ही चौकी काढून टाकल्यास फुटपाथ रिकामे होऊन भरपूर प्रमाणात जागा उपलब्ध होऊ शकते.

दीपक चौकातून मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांना देखील सुटसुटीत रस्ता होऊ शकतो. ही तुटलेली पोलीस चौकीचा लोखंडी खराब चिरलेला पत्रा भाविकांसाठी धोकादायक झाला आहे. भाविकांचे लहान मुले वृद्ध भाविक यांना या चिरलेल्या पत्र्याचा धोका संभावतो.

या पोलीस चौकीच्या अवतीभवती टू व्हीलर पार्किंग देखील केली जाते. तसेच दीपक चौकात असणारे रिक्षा स्टॅन्डचे रिक्षे देखील अस्ताव्यस्त पद्धतीने लावले जातात.

आणि फोर व्हीलर वाहने देखील मोडकळीस आलेल्या चौकीच्या अवतीभवती अस्ताव्यस्त पद्धतीने लावली जातात. तुळजाभवानी देवीच्या दर्शनात जाणाऱ्या भाविकांना सुरळीत आणि अडथळा निर्माण होणार नाही म्हणून प्रशासनाने खबरदारी घेणे आवश्यक असताना पोलीस आणि नगरपरिषदेच्या आंधळेपणाचे जिवंत उदाहरण या दीपक चौकात असणाऱ्या तुटक्या फुटक्या पोलीस चौकीकडे बघितल्यानंतर लक्षात येते.

ही तुटकी फुटकी पोलीस चौकी काढल्यानंतर मोठ्या संख्येने भाविक विनाअडथळा तुळजाभवानी मंदिराकडे जाऊ शकतात. सध्याची परिस्थिती अशी आहे, की टू व्हीलर वाहन आल्यानंतर भाविकांना थोड्यावेळ थांबून नंतर या तुटक्या फुटक्या पोलीस चौकी समोरून जावे लागते.

प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे भाविक भक्तांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

### चालत जाणाऱ्या व्यक्तींसाठी गेटला रखाने करणे आवश्यक

तुळजाभवानी मंदिराकडे टू व्हीलर आणि फोर व्हीलर गाड्या जाऊ नये म्हणून प्रशासनाच्या वतीने भवानी रोड, आर्य चौक आणि किसान चौकीमध्ये रोडवर भले मोठे गेट बसवण्यात आले आहेत. या सर्व रोडला असणाऱ्या गेटला व्यक्ती जाण्यासारखी रखाने केल्यास मोठ्या संख्येने भाविक बंद गेटमधून सुध्दा मंदिराकडे जाऊ शकतात. या सर्व रोडला असणाऱ्या दोन दोन भल्या मोठ्या गेटची डिझाईन बदलून त्याला चालत जाणाऱ्या व्यक्तींसाठी रखाने केल्यास बंद गेट मधून देखील भाविक मोठ्या संख्येने महाद्वार आणि भवानी रोडने जाऊ शकतात. हे रखाने केवळ चालत जाणाऱ्या व्यक्तीसाठी केल्यास वाहने गेट उघडल्यावरच जातील आणि पदचालक भाविक गेट बंद असताना देखील जाऊ शकतील. सध्याची परिस्थिती मध्ये दोन्ही गेटच्या साईडने भाविकांना गर्दीमध्ये लाईन लावून जावावे लागते. गर्दीमध्ये स्थानिक नागरिकांच्या टू व्हीलर गाड्यांची गर्दी आणि भाविकांची गर्दी यामुळे गेटच्या दोन्ही बाजूस विनानाकारण भाविकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे या भल्या मोठ्या गेटला चालत जाणाऱ्या भाविकांसाठी रखाने करण्याची मागणी भाविकांसह शहरवासीयांमधून होत आहे.

## साडी वाकॅथॉनला महिलांचा प्रतिसाद




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ फेब्रुवारी -**

संस्कृती, शक्ती व एकतेसाठी.. चार पावलं स्वतःसाठी हे ब्रीद घेऊन येथील महिला संघटनांनी साडी वाकॅथॉनचे आयोजन धाराशिव शहरांमध्ये केले होते. शहरातील भव्य अशा स्टेडियमवर सकाळी सुरू झालेल्या या साडी वाकॅथॉनची सांगता लकी ड्रॉ च्या भरघोस बक्षीसाच्या माध्यमातून झाली.

साडी वाकॅथॉनच्या उद्घाटनासाठी रोटरीचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. सुरेश साबू, विश्व विजेत्या खो-खो संघाची अश्विनी शिंदे, रोटरीचे अध्यक्ष डॉ. श्रीराम जिंतुरकर, ओस्लाच्या अध्यक्षा किरण देशमाने, डॉ. अनार साळुंखे, डॉ. रेखा ढगे, डॉ. स्मिता गवळी, डॉ. सुलभा देशमुख, डॉ कौशाली राजगुरू, डॉ. श्रद्धा मुळे, सुप्रिया दूधभाते, डॉ. अस्मिता बुरगुटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

श्रावणी व्यास यांच्या ग्रुपने महिला सक्षमीकरणावर नृत्य सादर केले. यानंतर कार्यक्रमाचे मुख्य अतिथी सुरेश साबू आणि श्रीराम जिंतूरकर यांनी वाकॅथॉन साठी सज्ज असलेल्या महिलांना हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. पाच किलोमीटर आणि तीन किलोमीटर या अंतरावर असलेल्या या साडी वाकॅथॉनसाठी महिलांनी सकाळच्या प्रसन्न वातावरणात चालून आनंद घेतला. यावेळी संपूर्ण शहरभर भारावलेल्या वातावरणात महिला चालत होत्या. उपस्थित इतर महिलांनीही याचा आनंद घेतला.

ठरवून दिलेल्या किलोमीटर मध्ये वाकॅथॉन पूर्ण करणाऱ्या सर्व महिलांना मेडल घालून आणि फल आहाराची किट भेट देवून स्वागत करण्यात आले. यानंतर जवळपास २५ प्रायोजक लाभलेल्या भेटवस्तू लकी ड्रॉ च्या माध्यमातून उपस्थितांना देण्यात आल्या. संयोजनी ओमप्रकाश राजेनिंबाळकर आणि शुभांगी कैलास पाटील यांच्या हस्ते लकी ड्रॉ मधील विजेत्यांना बक्षीस देण्यात आली. सदरील कार्यक्रम यशस्वीतेसाठी कमल नालावडे, नीता कठारे, डॉ. मीना जिंतूरकर, मेधा चोराखळीकर, स्नेहलता झरकर, शर्मिष्ठा डांगे, वर्षा हंबीरे, शितल कोठारी, डॉ. दीपाली रामढवे, दमयंती साळवी, प्रा.डॉ. पूनम तापडिया, आरती अजमेरा यांचाही यथोचित सन्मान झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनिता गुंजाळ आणि डॉ. श्रद्धा मुळे यांनी केले.

## नॅचरलच्या सेंद्रीय खताच्या माध्यमातून वाढणार मातीची गुणवत्ता

**बी.बी. ठोंबरे यांची माहिती...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ फेब्रुवारी -**

नॅचरल शुगर मध्ये नवनवीन प्रकल्प उभारणी सुरू असून नॅचरलचे प्रेसमड व नेपियर डायजेस्टर मधून उत्पादीत होणाऱ्या स्लरी पासून 'फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर' या सेंद्रीय खताची निर्मिती सुरू केली असून त्याचे वितरण राष्ट्रीय केमिकल्स् अॅण्ड फर्टिलायझर या राष्ट्रीयकृत कंपनीस विक्रीचा शुभारंभ आज धाराशिव आणि लातूर जिल्हयाचे आरसीएफचे वरिष्ठ विपनण अधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आल्याचे नॅचरल उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष बी.बी. ठोंबरे यांनी सांगितले.

या एफओएफ विक्री शुभारंभ कार्यक्रमात पुढे बोलताना बी.बी. ठोंबरे म्हणाले की, आरसीएफ कंपनी मार्फत 'पीएम-प्रणाम' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात यापुढे सेंद्रीय शेतील प्रोत्साहन देणेसाठी फार मोठया प्रमाणात रासायनीक खत कंपन्यांना सेंद्रीय खत शेतकऱ्यांना पूरवण्याची सक्ती केली असल्याने त्याचाच एक भाग म्हणून नॅचरलचे उत्पादीत 'एफओएम' खत आम्ही आरसीएफ कंपनीस करार करून योग्य व माफक दरात एफओएम हे सेंद्रीय खत पुरवण्याचा संकल्प केला आणि तो आज पूर्ततेस नेल्याचे आवर्जून सांगितले.

पीएम-प्रणाम या उपक्रमाचे उद्दीष्ट म्हणजेच खतांचा शास्वत आणि संतूलीत वापर, पर्यायी खतांचा अवलंब, सेंद्रीय आणि नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देवून पृथ्वी मातेचे आरोग्य वाचवण्यासाठी सेंद्रीय स्लरीचा वापर करून पिकाऊ जमीन उपजाऊ करणे आणि पुढील पिढीस सकस व आरोग्यदायी अन्न धान्य उपलब्ध होईल हा उदात्त हेतू डोळयासमोर ठेवून नॅचर शुगरने सेंद्रीय खत निर्मितीमध्ये पाऊल टाकले असल्याचे ठोंबरे यांनी आवर्जून नमूद केले.

आरसीएफ कंपनीचे धाराशिवचे वरिष्ठ विपनण अधिकारी गणेश खाडे यांनी रासायनिक खता बरोबर सेंद्रीय खतांचा वापर करून जमिनीचा पोत वाढला नाही तरी टिकवून ठेवण्यासाठी तरी सेंद्रीय खत वापर करण्याचे उपस्थितांना आवाहन केले.

## युवकाला मारहाण; भुममध्ये गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ फेब्रुवारी -**

अग्नीशामक कार्यालयासमोर किरकोळ वादातून झालेल्या हाणामारीत एका व्यक्तीला गंभीर मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी भुम पोलीस ठाण्यात विक्की गौतम जावळे (रा. भुम) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि.८ फेब्रुवारी रोजी दुपारी १.१५ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी जितेंद्र महादेव शिंदे (वय ४०, रा. भिमनगर, भुम) हे अग्नीशामक कार्यालयासमोरून जात असताना आरोपी विक्की जावळे याने त्यांच्या मोटरसायकलबाबत वाद घातला. त्यानंतर शिवीगाळ करत मोटरसायकलच्या चैनने त्यांना मारहाण केली. या मारहाणीत जितेंद्र शिंदे जखमी झाले.

या घटनेची माहिती मिळताच भुम पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून भारतीय दंड संहिता कलम ११८(१) आणि ३५२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास भुम पोलीस करत आहेत.



### आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ फेब्रुवारी -**

येथील जय तुळजाभवानी माता केंद्रीय प्रशाला आश्रम शाळेत सामाजिक कार्यकर्ते जयकुमार पांढरे यांच्या वतीने विजय गंगणे यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून पत्रकार संघाचे अध्यक्ष सचिन ताकमोघे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आला.

मोलमजुरी करून उपजीविका भागवणाऱ्या पालकांचे पाल्य आणि अनाथ मुलांना शैक्षणिक मदत व्हावी म्हणून पांढरे यांनी वाढदिवसाचा अतिरिक्त खर्च टाळून हा कौतुकास्पद उपक्रम राबवला. यावेळी जयकुमार पांढरे, विशाल शिंदे, चेतन खंडागळे, अमित मोरे, अनुप लोखंडे, यश धाकतोंडे, बालाजी पानढवळे, गोविंद गायकवाड यांच्यासह वंदे मातरम मित्र मंडळ आणि विजय गंगणे मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. तर यावेळी शाळेचे मुख्याध्यापक एस.एस. गरड, वाय.एम. सोमवारे, जी.एच. पवार, एल.व्ही. जाधव, एम.एस. लोखंडे, व्ही.एस. शीलवंत, बी.जे. डोलारे, पाटील मामा, राठोड मामा आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्याच्या दुरुस्ती कामास अखेर सुरुवात

**आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नांना यश**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ फेब्रुवारी -**

अपप्रवृत्तीमुळे अनेक वर्षांपासून प्रलंबीत राहिलेल्या नळदुर्ग-अक्कलकोट रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाचा शुक्रवारी दि.७ फेब्रुवारी रोजी शुभारंभ झाला. अनेक वर्षापासून रखडलेला हा विषय आता मार्गी लागला असून या रस्त्यावर ये-जा करणारे गावातील नागरिक, अक्कलकोटला जाणारे भाविक व नळदुर्गला भेट देणाऱ्या पर्यटकांना त्यामुळे मोठा दिलासा मिळणार असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.





महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीचे दर्शन घेऊन तुळजापूरहुन नळदुर्ग-अक्कलकोट महामार्गावरून अक्कलकोटकडे स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी भाविक या रस्त्याचा वापर प्राधान्याने करतात. पर्यटक देखील नळदुर्गचा ऐतिहासिक किल्ला पाहण्यासाठी याच मार्गाने ये-जा करतात. या भागातील गुजनुर, दहिटना, शहापूर, गुळहळी, निलेगाव, वागदरी, देवसिंगा (नळ), पाटील तांडा, खुदावाडी, येडोळा येथील विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी, राज्य व परराज्यातील भाविक भक्तासह या परिसरातील नागरिकांना नळदुर्गला जाण्यासाठी हाच मार्ग वापरावा लागतो. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवासी वर्गांना रस्त्यावरून ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत असून दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाणही वाढले आहे.

कांही अपप्रवृत्तीचे लोक शेतकऱ्यांची दिशाभूल करून नळदुर्ग-अक्कलकोट रस्ता दुरुस्तीच्या कामात जाणीवपूर्वक वारंवार अडथळे आणण्याचा प्रयत्न करत आहे. सदर प्रकरण अनेक वर्षे न्यायालयीन प्रकियेत अडकल्याने रस्त्याची दुरुस्ती होऊ शकली नाही. परिणामी या रस्त्यावर प्रवास करणाऱ्या ग्रामस्थांना व प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. हा विषय मार्गी लावण्यासाठी न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सध्या अस्तित्वात व वापरात असलेल्या रस्ता दुरुस्तीचा मार्ग आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सुचविला होता. अधिकची जागा व त्यांचा मोबदला हा विषय स्वतंत्र ठेवून अनेक वर्षांपासून वापरात असलेल्या रस्त्याची उपलब्ध रुंदी कायम करून दुरुस्तीचे काम हाती घेण्यास उच्च न्यायालयानेही मान्यता दिली होती. त्या अनुषंगाने आपण केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रुपये ४ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला.

सुमारे १०.८० किमी. लांबीच्या रस्त्यासाठी निविदा प्रक्रिया पुर्ण करुन ७ मार्च २०२४ मार्चला कामाचा कार्यरंभ आदेशही निर्गमीत करून दुरुस्तीला सुरुवात केली होती. मात्र ठराविक व्यक्तींच्या विरोधामुळे पुन्हा दुरुस्तीचे काम थांबवण्यात आले होते. ते आता पुन्हा वेगात सुरू करण्यात आले असल्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




नांदेड-नांदेड ते देगलूर ट्रान्सपोर्टचे साहित्य घेऊन जात असलेल्या एका ट्रकला धनेगाव येथे आग लागल्याची घटना आज दि. ९ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ च्या सुमारास घडली. या आगीत ट्रकमधील फ्रीज, बॅटरी, इन्वर्टर, ड्राय फ्रुट, खाद्य तेल, स्टेशनरी साहित्य, औषधी आदी साहित्य जळून खाक झाले. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आग विझवली.

# इंस्टाग्रामवर पोस्ट केल्याने अल्पवयीन मुलांकडून अपहरण करून मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ फेब्रुवारी**

इन्स्टाग्रामवर पोस्ट का टाकला असे म्हणत पत्रकार शेख याहीया यांच्या मुलाचे अपहरण करून त्यास मारहाण करण्यात आल्याची घटना दि. ८ फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शहरातील फारूखनगर येथिल फैज-उलुम हायस्कुमध्ये शिकणारा शेख इम्रान शेख याहिया याने इन्स्टाग्रामवर शहरातील पिर बुऱ्हान येथिल युसूफिया हायस्कूलमधील दहावीत शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याच्या इंस्टाग्राम पेजवर पोस्ट केली होती. या पोस्टचा राग मनात धरून युसूफिया हायस्कूलमधील मुलाने आपल्या तीन साथीदारांसह फारूखनगर येथून शेख इम्रान याचे अपहरण केले. नवी आबादी, लेबर कॉलनी या ठिकाणी नेऊन त्यास थापड बुक्याने मारहाण करण्यात आली. याच दरम्यान शेख इम्रान यांने प्रसंगावधान दाखवत भावाच्या मोबाईलवर इंस्टाग्राम आयडी असल्याचे सांगत त्यांच्याकडून मोबाईल घेतला व आपल्या भावाला संपर्क केला. भावाला संपर्क केल्यानंतर त्याचा भाऊ शेख अजहर व त्याचे वडील शेख याहिया यांनी शहरात विविध ठिकाणी त्याचा शोध घेतला. शेवटी स्नेहनगर येथील पोलीस पेट्रोल पंपाजवळ त्यांना तीन अल्पवयीन मुलांच्या तावडीत त्यांचा मुलगा शेख इम्रान आढळून आला. याप्रकरणी शेख अजहर शेख याहिया यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख इम्रानचे अपहरण करून मारहाण करणारे तिन्ही अल्पवयीन मुले युसूफिया शाळेत इयत्ता दहावीत शिकणारे विद्यार्थी आहेत तर त्यापैकी एकाच्या इंस्टाग्राम प्रोफाइल आयीडीवर ३०२ असे लिहिण्यात आलेले आहे.

दरम्यान शहरात अल्पवयीन मुलांकडून हाणामारीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. नुकतेच शहरातील आनंदनगर चौकातील राज मॉल येथे अल्पवयीन मुलांनी एकाचा खून केला होता. ही घटना ताजी असतानाच पुन्हा अपहरणाचा प्रयत्न करून मारहाण करण्यात आल्याची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.

## संक्षिप्त वृत्त



### जिल्हा स्काऊट गाईड मेळाव्यात श्री संत गाडगे महाराज प्राथमिक शाळेचा जिल्ह्यात प्रथम

**लोहा-**भारत स्काउट्स आणि गाईडस जिल्हा कार्यालय नांदेड व जिल्हा परिषद शिक्षण विभाग नांदेड यांच्या वतीने जिल्हास्तरीय ५० वा जिल्हा मेळावा ४ ते ७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा वाघाळा, नांदेड येथे आयोजित करण्यात आला होता. यांमध्ये विद्यार्थ्यांना निसर्ग सानिध्याचा अनुभव, स्वयंशिस्त व स्वावलंबन अशा गुणांचा विकास होण्यासाठी मेळाव्यात श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी कंधारचे , श्री संत गाडगे महाराज प्राथमिक शाळा,लोहा चे स्काऊट व गाईड पथक सहभागी झाले होते.या शाळेने शोभा यात्रा व लेझीम स्पर्धेतून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.या जिल्हा मेळाव्यात तंबू उभारणी, तंबू सजावट,संचलन, लेझीम,बँड स्पर्धा, चित्रकला, योगासने,शोभा यात्रा,बिन भांड्याचा स्वयंपाक, स्किल ओ रामा, असे विविध उपक्रम घेण्यात आले होते. स्काऊट्स आणि गाईडसच्या या यशाबद्दल श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी कंधारचे अध्यक्ष प्रा. डॉ. पुरुषोत्त धोंडगे , सचिव भाई गुरुनाथरावजी कुरुडे , सहसचिव ड.मुक्तेश्वररावजी धोंडगे ,शाळेचे अध्यक्ष भाई किशनराव पाटील ढगे , उपाध्यक्षा सौ.जयक्रांतीताई अशोकराव गवते, मुख्याध्यापक एस.आर. लुंगारे सह शाळेतील सर्व शिक्षकवृंदानी यशाबद्दल अभिनंदन केले.

### माता रमाई आंबेडकर यांना सामाजिक राजकीय संघटनेकडून विनम्र अभिवादन

**उमरी-**राजकीय सामाजिक रंजल्या गांजल्याचे उद्धारक राजकीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी त्यागमुर्ती रमाई माता आंबेडकर यांच्या जयंती निमित दि ७ फेबुवारी २०२५ रोजी विविध ठिकाणी जयंती साजरी करून विनम्र अभिवादन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजक संजीव विठ्ठलराव सवई , नगरसेवक ईश्वर सवई या समाज बांधवाने केली आहे. दि.७ फ्रेबुवारी रोजी सकाळी नगर परिषद जवळील आंबेडकर चौक येथे मुख्यधिकारी डॉ निलम कांबळे , माजी रेल्वे स्टेश मास्तर पवार, वरिष्ट न .पा . लिपीक गणेश मदणे , सुरेश हानवते पळसगावकर, गौतम सोनफळे , अंकुश सवई . आकाश खंदारे, श्रीकांबळे , आदी नगरपरिषद कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते यांच्या वतीने माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले त्या नंतर नगरसेवक ईश्वर सवई , नगरसेवक रतन खंदारे, नगरसेक प्र सोनू वाघमारे , माजी उपनगराध्यक्ष अनिल सोनकांबळे , माजी नगरसेक राजेश सवई यांच्या हस्ते पंचशिल ध्वजारोहन करण्यात आले आणि त्रिवार वंदन करण्यात आले आहे. यावेळी उपस्थित माता रमाई आंबेडकर जयंती निमित्त जमलेल्या उपस्थित मान्यवर व चाहत्यांना अल्पहार देण्यात आले आहे. उमरी पेट्रोल पंप भोकर - उमरी रोड वर आंबेडकर चौकात माता रमाई जयंती निमित नगरसेवक ईश्वर सवई यांच्या उपस्थित सामाजिक जळवळीचे नेते डी जी तुपसाखरे यांच्या हस्ते पंचशिल ध्वजारो करण्यात आले आहे . या कार्यक्रमास माहिती अधिकार तालुकाधक्ष संदिप गोवंदे , भिमटागर जिल्हाध्यक्ष स्वप्नील भोसीकर , वंचितचे संदेश गायकवाड सिंधीकर , बालाजी देवके, संदिप लांडगे, राहूला खंदारे, निर्भीड कैलास सोनकांबळे, पत्रकार प्रशांत जोंधळे , अशोक झडते ,मोकंपले . किशोर कवडीकर, बापुराव रिट्टेकर , पांडूरंग सोनकांळे , ईश्वर रणनवरे ,प्रदिप जोधंळे , राहुल सोनकांबळे , प्रकाश कार्लेकर , त्रिरत्न सवई , वसंत सवई, साहेबराव तुरेराव, आनंदा पवार, आदी सह समाज बांध मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### पंढरी भद्रे यांची सब इन्स्पेक्टर पदी पदोन्नती

**नायगाव-**भारतीय देशाच्या भुदला वरील सुरक्षा विभागातील सीआरपीएफ मध्ये समाविष्ट होऊन देशसेवेत अहोरात्र योगदान देणारे, तालुक्यातील



बेटकबिलोली येथील नामवंत किर्तीवंत पंढरी शिवलिंग भद्रे ३२ वर्ष सेवा पुर्ण करुन नुकतीच पदोन्नती होऊन सब- इंस्पेक्टर पदी नियुक्ती झाली आहे, त्याअनुषंगाने बेटक बिलोलीतील अशोक गायकवाड , मंगेश हानवटे , यशवंत डूमणे , नागोराव डूमणे, संजय भद्रे, विनोद डुमणे, रवि थोरात, दिलीप मोरे, जगदीश वंजारे, सतिष कांबळे,बाबुराव झगडे, रमेश भद्रे,प्रकाश सोनकांबळे, राहूल झगडे, बालाजी हानवटे, राहुल इंगळे, सुनील पोटफोडे, कामाजी झगडे, राजेंद्र वाघमारे, राजरत्न जोंधळे, प्रमोद घंटेवाड, प्रदिप राक्षेसमारे,रूपेश गायकवाड, सिद्धार्थ गायकवाड, अजय डुमणे सह आदि प्रतिष्ठित नागरिकांच्या वतीने सन्मान व सत्कार करुन देशाच्या रक्षणासाठी निस्वार्थ पणे कर्तव्य बजावल्याबद्दल मनस्वी अभिनंदन करुन पुढील कार्यास यावेळी शुभेच्छा देण्यात आल्या.

### दत्तराम पाटील जाधव यांचे निधन

**उमरी-**उमरी तालुक्यातील बितनाळ येथिल जेष्ट शेतकरी नागरीक दत्तराम रामजी पाटील जाधव यांचे दि ७ फ्रेबुवारी २०२५ रोजी सांयकाळी



६ वाजता वृद्धपकाळाने निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ८० वर्ष होते. त्यांच्या पश्च्यात एक मुलगा एक मुलगी नांतवड असा मोठा परिवार आहे. त्यांचा अंत्यसंस्कार दि ८ फेब्रवारी रोजी दुपारी एक वाजता मराठा स्मशान भुमित करण्यात आला आहे प्रसिद्ध पहेलवान बाबू उर्फ रामजी जाधव यांचे वडिल तर माधव पहेलवान यांचे अजोबा आणि मारोती जाधव, शिवाजी जाधव , चेअरमन भुजंग जाधव यांचे ते चुलते होत.

# शिंदीची विक्री करणाऱ्या एकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. ०९ फेब्रुवारी**

कुंडलवाडी पोलिसांनी शिंदीचे पाकिटे नेत असताना एका इसमास पकडून गुन्हा दाखल केला आहे.



या बाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कुंडलवाडी शहरातील नरागल्ली पाण्याचा टाकी जवळ गंगाधर मोगलाजी मोक्क मवार रा.नरागल्ली कुंडलवाडी यांच्या जवळ दोन नायलॉन पिशवी मध्ये शिंदीचे १०० पाकिटे २५रू.प्रमाणे २५००रुपये किमतीचे शिंदी चे पाकिटे मिळाल्याने सदर इसमा वर कुंडलवाडी पोलिसांनी कुंडलवाडी पोलीस स्टेशन मद्ये गु. र.न.१९/२०२५ कलम६५(इ)महाराष्ट्र दारूबंदी कायदा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दुचाकी चोरटा आठ तासात जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी,दि. ०९ फेब्रुवारी**

कुंडलवाडी पोलिसांनी अवघ्या ८ तासात आरोपीला अटक करून चोरीला गेलेली मोटर सायकल आरोपी कडून हस्तगत केले आहे.



पोलीस सुत्रा कडून मिळालेल्या माहतीनुसार कुंडलवाडी शहरातील इरेश गंगाधर गंगोने यांची मोटर सायकल (एह २६ ला५७१३,) लूना काराल रोड वरील मलकापूर शिवारात गाडी रोड वर लावून गांगोने यानी रात्री ९ वाजता पाणी देण्यासाठी शेतात गेले पाणी देऊन रात्री १ वाजता आल्यावर पाहिले असता गाडी दिसली नाही त्या नंतर त्याने शोध घेतला असता न मिळाल्याने त्याने कुंडलवाडी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दिली त्या नुसार गुन्हा नोंद करून स.पो. नि. ज्ञानेश्वर शिंदे,पो. हे. कॉ. शेख गफूर, पो. हे. कॉ. माधव पाटिल, पो. हे. कॉ. नागेंद्र कांबळे, रघुवीर चौहान यांनी गुप्त माहितीच्या आधारे चक्रे फिरवून चोरीला गेलेली कुणाचा शोध लावून अटक केले असल्याची माहिती स.पो. नि.यांनी दिली आहे.

# मुख्याध्यापकांचे अर्जित रजा रोखीकरणाचा प्रश्न मार्गी लावणार : आ. काळे, आ.चव्हाण यांचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. ०९ फेब्रुवारी**

खाजगी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांचे अर्जित रजा अनुज्ञेय असताना अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय नाही असे शिक्षण संचालक (प्रा.) पुणे यांने आदेशित केले. पुर्वी लक्ष प्रभावाणे देयक अर्जित रजा रोखीकरण देण्यात यावे यासाठी निवेदन कुंडलवाडी येथे शिक्षक आमदार विक्रम काळे व पदवीधर आमदार सतीश चव्हाण यांची भेट महासंघाच्या शिष्टमंडळाने घेऊन निवेदन दिले.



दि. २३ जानेवारी २०१३ अप्पर सचिव महाराष्ट्र शासन प्र.सु.प्रधान यांचे पत्र क्र. २०१२/स.क्रं.३२८/१२/माशि-२ शाले शिक्षण क्रिडा मंत्रालय, मुंबई व दि. १५/०२/२०१३ शिक्षक संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्रान्वये दि. ०९/०४/२००१ अन्वये रजा रोखीकरणा संदर्भातील आदेश खाजगी प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांनाही लागू आहे असे आदेश असताना दि. ०१ मे २०२४ पर्यंत खाजगी प्राथमीक शाळेतील मुख्याध्यापकांचे अर्जि रजा अनुज्ञेय माणून अनेक मुख्याध्यापकांचे रजा रोखीकरण करण्यात आले. परंतु दि.३० मे २०२४ च्या मा.शिक्षण संचालक प्राथमिक महाराष्ट्र राज्य पुणे शरद गोसावी यांनी खाजगी माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांनाच अर्जित रजा रोखीकरण अनुदेय आहे.

प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरण अनुदेय नाही. असे स्पष्ट लेखी पत्र दिल्यामुळे दोन भाऊ असलेल्या मुख्याध्यापकांत गैरसमज निर्माण करून दिला. यामुळे प्राथमिक शिक्षणाधिकारी रोखीकरणाचे बिले स्वीकारत नाहीत तर माध्यमिकचे शिक्षणाधिकारी रोखीकरणाची बिले आनंदात स्वीकारत आहेत. ज्याचे स्वीकारले आहेत त्यांना शिक्षणाधिकारी प्रा.जि.प. नांदेड यांचे दि.२४ जानेवारी २०२५ जा.क्रं. ५८३ पत्रान्वये अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय नाही. करीता आपला प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे. असे लेखी कळविले असून विनंती की. खाजगी प्राथमिक मुख्याध्यापकांना अर्जित रजा रोखीकरणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावे अशी विनंती मागणी द्वारे करण्यात आली.

कुंडलवाडी येथे सबन्नवार उच्च मा.विद्यालयातील प्रा.शंकरराव पवार यांच्या सेवानिवृती कार्यक्रमास शिक्षक आमदार विक्रम काळे व पदवीधर आमदार सतीश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.


यावेळी महाराष्ट्र राज्य मान्य खाजगी शिक्षक महासंघाच्या वतीने निवेदन देण्यात आले. महासंघ प्रांत उपाध्यक्ष हरीहर चिवडे,नांदेड जिल्हा सचिव,हनमंतराव डाकोरे,जिल्हा उपाध्यक्ष तथा पत्रकार अशोक दगडे कंधार तालुकाध्यक्ष भास्कर पाटील कळकेकर,शिक्षक नेते राजहंस शहापुरे,जिल्हा संघटनमंत्री दिगांबर वाघमारे,सुभाष मुंडे,पाटील, देशमुख,देगावकर, टिपराळे,शरीफ, काळेकर,सूर्यवंशी,कापसे या सर्व उपस्थित मंडळींनी दोन्ही आमदारांना भेट देऊन मुख्याध्यापकांना रजा रोखीकरणाचे देयक नाकारल्यामुळे यांना निवेदन देण्यात आले.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाची शोभा यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ फेब्रुवारी**

संत रविदास महाराज यांच्या ६४८ व्या जयंतीनिमित्त दिनांक १२ फेब्रुवारी रोजी भव्य शोभा यात्रा काढण्यात येणार असल्याचे एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड यांनी कळविले आहे. सदरहू भव्य शोभा यात्रा ही बुधवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता महात्मा फुले पुतळा,आयटीआय येथून निघेल व ती शक्तीनगर येथे पोहोचेल. प्रमुख पाहुणे म्हणून आ. बालाजी कल्याणकर , आ. आनंद बोंढारकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर , आ. किशनराव वानखेडे , माजी आ. मोहन अण्णा हंबर्डे, उमेश मुंडे , तुलजेश यादव यांची उपस्थिती राहणार आहे. या शोभायात्रेत समाज बांधवांनी जयंतीदिनी आपली दुकानें व प्रतिष्ठाने बंद ठेवून सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढविण्याचे आवाहन शंकर धडके, उपाध्यक्ष आनंद वाघमारे, अजय गंधारे, सचिव विजय गोरे, कोषाध्यक्ष शशिराव असोरे, शंकर वाघमारे, प्रमुख चंद्रकांत सोनटक्के यांच्यासह आदींनी केले आहे.

# लोह्यात रमाई जन्मोत्सव उत्साहात साजरा ; शोभायात्रेने वेधले शहर वासियांचे लक्ष



**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०९ फेब्रुवारी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रत्येक जडण घडणीत मोलाची साथ देणारी माता रमाई यांच्या १२७ व्या जयंती निमित्त माता रमाई महिला मंडळाच्या पुढाकारातून रमाई यांच्या प्रतिमेची लोहा शहरातील मुख्य मार्गावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत मोठ्या संख्येने आंबेडकरी अनुयायांची उपस्थिती होती. सदरील मिरवणुकीने शहर वशियांचे लक्ष वेधले होते.

शहरातील रमाई महिला मंडळाच्या वतीने यंदा पहिल्यांदाच लोहा शहरात माता रमाई यांची भव्य जयंती उत्सव सोहळा दि. ७ रोजी सायंकाळी साजरा करण्यात आला. शहरातील डॉ. आंबेडकर नगरातील क्रांतीसुर्य बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने बुद्ध पूजापाठ घेण्यात आला. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी माजी अध्यक्ष ई. जे. बनसोडे, व्ही. के. कांबळे, वाय. बी. महाबळे, माजी नगराध्यक्षा त्रिशलाबाई कांबळे, नगरसेविका राहीबई खिल्लारे, नगरसेविका शारदाताई निर्मले, माजी उपनगराध्यक्ष छत्रपती धुतमल, माजी नगरसेवक बबन निर्मले, बालाजी खिल्लारे, गंगाधर महाबळे, रिपाईचे तालुकाध्यक्ष सुरेश महाबळे, लक्ष्मण महाबळे, बौद्ध महासभेचे पर्यटन जिल्हा सचिव रत्नाकर महाबळे, केंद्रीय शिक्षक धोंडीबा यानभुरे, तालुकाध्यक्ष बापूसाहेब कापुरे, केतन खिल्लारे आदींसह बहुसंख्य उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी माता रमाई महिला मंडळाच्या अध्यक्षा सुशिलाबाई महाबळे, राजश्री हटकर, सीमा कांबळे, मनीषा ढगे, सरिता महाबळे, रोहिणी जयमाला महाबळे, पुष्पा महाबळे, पूनम महाबळे, नंदाबई खाडे, रेखाबाई कांबळे आदींनी परिश्रम घेतले. उपस्थिती होती.

# सरदार वल्लभभाई पटेल शाळेच्या वतीने पोलिस दलात निवड झालेल्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०९ फेब्रुवारी**

दि. ८ फेब्रुवारी रोजी सरदार वल्लभभाई पटेल हायस्कूल येथे माजी विद्यार्थी सतीश पोतलिंग गुंठे, व शेख मेहफूस शेख नूर,शिवाजी दत्तात्रय येगुर्ले यांचा मुंबई येथे पोलीस दलात निवड झाल्याबद्दल सरदार वल्लभभाई पटेल शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेच्या इतिहासामध्ये अजून एका यशाची भर पडली आहे. सत्कार कार्यक्रम झाल्यानंतर शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार धोंडीराम बेंबडे यांनी सांगितले की या दोन्ही विद्यार्थ्यांनी अत्यंत हलाकीच्या परिस्थितीवर मात देऊन व बऱ्याच समस्यांचा सामना करून यश मिळविले आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष केशवराव कदम व सर्व संचालक मंडळाने या दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. यानंतर या दोन्ही विद्यार्थ्यांनी २०२४-२५ च्या दहावी बॅचच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व शाळेचे वरिष्ठ शिक्षक बायस सर,गाडेगावकर सर, नहनाळे सर, पोगरे सर, धनगरे सर, पवार सर, गुजरवाड सर, दुडकिकर व चाळणेवाड यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले असे आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले. शाळेच्या वतीने सत्कार केल्याबद्दल शाळेचे आभार व्यक्त केले.

# विद्यापीठातील शिक्षण शास्त्र संकुलामार्फत अध्ययन-अध्यापन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०९ फेब्रुवारी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील शिक्षणशास्त्र संकुलाच्या वतीने दिनांक ३,४ फेब्रुवारी रोजी नाविन्यपूर्ण तांत्रिक कौशल्ये आणि दिनांक ५, ६ फेब्रुवारी रोजी अभ्यासक्रम रचना दोन विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या अनुषंगाने संशोधक विद्यार्थ्यांना विविध विषयावर वेगवेगळ्या व्याख्यात्यांनी व्याख्याने दिली. स्वारातीम विद्यापीठातील शिक्षण शास्त्र संकुलामार्फत घेण्यात आलेली कार्यशाळा येथे सर्वप्रथम स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे



पूजन अधिष्ठाता एम. के. पाटील, यांच्या हस्ते करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. डी. एम. खंदारे, डॉ. प्रभाकर रेड्डी, डॉ. कैलास पाळणे, डॉ. शिवाजी सूर्यवंशी व संकुलाचे संचालक डॉ. सिंकुकुमार सिंह यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी या कार्यशाळेत अध्ययन - अध्यापन पद्धतीमध्ये कालानुरूप बदल होत गेले पाहिजे , व त्यानुसार विद्यार्थी व शिक्षक ह्या दोन्ही घटकांनी आपल्या मध्ये त्या बदलांचे अवलोकन केले पाहिजे या उद्देशाने सदरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. या अनुषंगाने विविध विषयावर वेगवेगळ्या व्याख्यात्यांनी व्याख्याने दिली. या दोन्ही कार्यशाळेसाठी विद्यापीठ परिसरातील व संलग्नित महाविद्यालयातील तसेच राज्यातील व देशातील विविध प्राध्यापक संशोधक विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता. सदरील कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी शिक्षण शास्त्र संकुलातील प्रा. डॉ. वैजयंता पाटील , डॉ. सुनीता पाटील, डॉ. महेश जोशी, डॉ. भीमा केंगले, डॉ. अशोक गिनगिने तसेच सर्व संशोधक विद्यार्थी यांनी सदरील कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

**लग्नासाठी मुलगी पाहिजे**

**नाव**: धम्मदिप पिराजी गायकवाड
**वय** : ४२
**स्थिती** : घटस्फोटीत
**जात**: बौद्ध
**धंदा** : व्हिडीओ मिक्सिंग
**वार्षिक उत्पन्न** : ७ ते ८ लाख
**पत्ता : गोकुळ नगर, नांदेड**
**मो. ९९२१२१०३५८**

**अपेक्षा**

**वय वर्ष** : ३० ते ३५
जातीची अट नाही
दिसण्यास सुंदर,
विवाहित, अविवाहित, घटस्फोटीत
(मागील नवऱ्याचे आपत्य नसल्यास प्राधान्य)

## आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

# धर्म संस्कृती पालनाचा आनंद

धर्म जेव्हा शाश्वत सत्याची धारणा प्रबळ करीत मानवतेचे पुष्प फुलवून आनंदाची व्याप्ती वाढवणारा असतो. तेव्हा त्या धर्माची आभा हजारो वर्षांपासून पृथ्वीतलावर मानवाला गुण्यागोविंदाने राहायला शिकवत, वाढतच असते. कितीही आक्रमणे झालीत, टोकाचे संघर्ष झालेत तरी जगाच्या पाठीवर हिंदू धर्माची ध्वज पताका दिमाखाने फडकत राहणार. जनमानसाच्या डगमगत्या श्रद्धेच्या नौकेला विश्वासाचे शिड देण्याचे काम यंदाचा महाकुंभ करीत आहे, असे म्हणूनच जाणवत राहते. धर्म संस्कृतीचा अद्‌भुत संगम म्हणजे महाकुंभ! महाकुंभ आणि सभोवतीच्या त्या वातावरणाशी जेव्हा आपण समरस होतो तेव्हा चोहिकडे आनंदी आनंद, उल्हास, उत्साहाचे श्रद्धापुष्प उमलून गंधाळत आहे, असे वाटत राहते. याचा खोलवर परिणाम भावी पिढीवर निश्चितच होणार. हे मांगल्याचे बीजारोपण पुन्हा वटवृक्षात परिवर्तित होऊन आपल्या शीतल छायेत चैतन्य आनंदाच्या झुल्यावर भावी पिढ्यांना झुलवण्यासाठी असंख्य पारंब्या घट्ट रुजवून दिमाखात उभे राहील.

वरवर व्यक्ती कितीही आधुनिकतेच्या मागे धावत असला तरी आनंद, शांती, समाधानाचाच शोध घेत मानवाची जीवनयात्रा सुरू असते. हे सातत्याने प्रत्ययास येते. याला कारण आपल्या धर्म संस्कृतीची खोलवर रुजलेली पाळेमुळे! हजारो वर्षांपासून या भूमीवर आध्यात्मिक अधिष्ठान मानवी कल्याणाचे कारक बनून ठामपणे अस्तित्वात आहे. आज तर वैज्ञानिक संशोधनही आपल्या धर्मातील अनेक बाबींना सत्याचे प्रमाणपत्र देऊन त्याचे महत्व अधोरेखित करत आहे. आपल्या निसर्गपूजक संस्कृतीत नद्यांना माता, जीवनदायिनी म्हणून पूजले जाते. त्यामागे अर्थात अनेक हेतू आहेत. पण, अगदी स्पष्ट दोन हेतू आहेत जिची आपण पूजा करणार ती शुद्ध, स्वच्छ, अखंड प्रवाहित ठेवण्याची जबाबदारी आपलीच असायला हवी. जेणेकरून प्रत्येक मानवाला आजीवन शुद्ध जल मिळू शकेल. दुसरा विशेष हेतू अध्यात्मिक उन्नती! आता नुकतेच संशोधन समोर आले आहे. कुंभमेळ्यातील अमृत स्नानाच्या वेळी गंगेच्या पाण्यात आध्यात्मिक लहरींची पातळी वाढलेली दिसून आलीये. आपल्या पूर्वजांच्या शास्त्रशुद्ध अभ्यासातून सिद्ध झालेल्या ज्ञानसागरास नाकारण्यात धन्यता मानण्यापेक्षा, त्याचा सुयोग्य स्वीकार केल्यास जीवनात पावलोपावली आनंदाची अनुभूती आल्याशिवाय राहणार नाही.

धर्म म्हणजे तरी काय हो?'धारयति इति धर्मः' जगताना आपल्या उत्तमाकरीता आपण जे जे धारण करतो किंवा ज्या धारणेतून आपला खरा विकास होत संपूर्ण आनंद स्थितीपर्यंत आपण पोहचणार असतो तो धर्म! धर्म म्हणजे एक सर्वसमावेशक जीवन मार्गदर्शिकाच होय. म्हणून तर मातृधर्म, पितृधर्म, आचार्यधर्म, पुत्रधर्म अगदीच काय तर शेजारधर्म इतक्या साध्यासोप्या जीवन धारणांपर्यंत आपण धर्माला अगदी सोप्पं करून टाकतो. पण, खेदाने म्हणावेसे वाटते की, आजच्या काळात धर्म ही आचरणापेक्षा चर्चा आणि वादविवादाची गोष्ट होऊन बसली आहे. पण, खरंतर धर्मसंस्कृती पालनाचा आनंद आपल्या जाणिवा जागृत, समृद्ध करून नवीन पिढीच्या मनात त्याविषयी औत्सुक्य, आदरभाव निर्माण करतो. आपला धर्म, संस्कृती ही आपली खरी ओळख व जीवन पद्धती असते.



त्याविषयीचे अज्ञान आपल्याला आपल्याच धर्म पालनास परावृत्त करते. याउलट, आपल्या धर्माचे शास्त्रोक्त ज्ञान घेऊन ती शुद्ध ज्ञानधारा अखंड प्रवाहित ठेवण्याचे, शिवधनुष्य पेलून आनंदाच्या डोही आनंद तरंगांचा अनुभव खऱ्या अर्थाने घेता यायला हवा आहे.

सध्या तर सगळीकडे एकच गोष्ट कानावर येतेय, आम्ही प्रयागराजला जाऊन आलोत अन् जाणार आहोत. काय मस्त उल्हासित वातावरण आहे ना! अखिल विश्वाला भारून टाकणारी एक वेगळीच सकारात्मक उर्जा यंदाच्या महाकुंभामुळे निर्माण झाली आहे. महाकुंभात जाऊन स्नान करून, तेथील मंदिरात दर्शन घेऊन त्या वातावरणातल्या चैतन्याने उजळून आलेल्यांच्या, आनंदी अत्तराने इतरांनाही या महाआनंदाची लागण न होणे अशक्यच! त्यांच्या अंतरंगातील प्रसन्नतेच्या सूरांची आळवणी आजूबाजूच्या लोकांच्या मनात त्या आनंदी अनुभवांच्या गीतांची मैफल सजवतात.

'बोलो हर हर गंगे'सह लाखो मुखातून गुंजणाऱ्या मंत्र लहरी परीसर, आसमंत आणि मन दणाणून सोडतात तेव्हा वैश्विक उर्जा उच्च पातळी गाठते. आपण त्या क्षणाचा, धर्म संस्कृतीचाच एक भाग आहोत ही अनुभूती अवर्णनीयच! कुंभ मेळ्यात त्रिवेणी संगमावर गंगास्नानाचा अनुभव मनात पावित्र्याचा आनंदी ओलावा झिरपत ठेवण्याचे कार्य करीत राहणारच. पाप-पुण्य हा भाग सोडून दिला तरी गंगेच्या पाण्याचा तो गारेगार स्पर्श तनामनात जी शिरशिरी निर्माण करतो तो एक वेगळाच आनंदानुभव असतो. संध्याकाळची गंगा आरती म्हणजे एक दिव्य अनुभवच! तो असंख्य ज्योतींचा अननुभूत केशरी प्रकाश, शंखनाद, नदीपात्रातील दीप आणि चोहीकडे माणसांचाच सागर! जातपात, गरीब-श्रीमंत सारे भेदाभेद विसरून आनंदयात्रेत सहभागी सारेच एकरूप भासतात. तेव्हा मानवता धर्म सहजतेने रुजून जातो. तेथील उत्साही सळसळ मनाला हर्षोत्सवी झळाळी देत आहे, या अनुभवात प्रत्येक जण रंगून जातो. याशिवाय, कित्येक आश्चर्यकारक आणि अविश्वसनीय गोष्टी बघायला मिळणे हीसुद्धा कुंभमेळ्यातील पर्वणी असते. आपल्या धर्म संस्कृतीतील माहिती नसलेल्या अनेक अद्‌भुत, विस्मयकारी गोष्टी तिथे प्रत्ययास येतात. काही आखाडे, साधू जे आपल्या आसपास कधीही, कोठेही दिसत नाहीत. पण, इथे त्यांचे अवचित दर्शन घडते. त्यांच्या जीवनशैलीविषयीचे कुतूहल, उत्सुकता काहींच्या अभ्यासाचा विषय होतो. आखाड्यांच्या भव्य मिरवणुका तर विशेष आकर्षणाचा महाकुंभाचा केंद्रबिंदू होऊ बघतोय. विश्वविक्रमी उपस्थितीचे सर्व उच्चांक मोडीत काढणाऱ्या या महाकुंभमेळ्याचा साक्षीदार होण्याचे भाग्य ज्याला लाभले त्या प्रत्येकाला धर्म संस्कृती पालनाच्या आनंदाचा परिसस्पर्श निश्चितच झाला आहे. या आनंदरथावर स्वार झालेले पवित्र गंगा जलाच्या तुषारांनी पावन झालेले मन एकच मागणे मागत राहील...

***सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामया ।***
***सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखभाग् भवेत् ॥***

---

# वीरांगना रामप्यारी गुर्जर

शुभांगी गान/८६५७४२४०७१

**जिसकी बहादुरी, पराक्रम सब लोगो की जुबानी थी।**
**उत्तर प्रदेश की बेटी राम प्यारी गुर्जरी मर्दानी थी ॥**
**ललकार रही, लहरा रही, हवा मे खड्ग और भाला ।**
**रणचंडिका बन उतरी थी, भभक उठी थी ज्वाला ॥**

कवी दीपक नारंग यांनी तिच्या व्यक्तिमत्वाचं वर्णन या शब्दात केलंय. इतिहासात अशी अनेक रत्नं आहेत ज्यांचा इतिहास अज्ञात आहे. पण, त्या त्या काळात त्यांनी दाखवलेलं शौर्य आणि पराक्रम यांनी एक इतिहास रचलाय, हेही तेवढंच खरं! कोण होती ही रामप्यारी गुर्जर?

ना ती कुठली राणी होती, ना कुठली शासक! वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी तिच्या नेतृत्वात ४० हजार महिला



योद्धांनी आक्रांता तैमूरलंगशी दिलेला लढा आश्चर्यचकित करणारा होता. उत्तर प्रदेशातील सहारनपूर, या चव्हाण गुर्जर कुटुंबात जन्मलेली ही मुलगी असामान्य आणि निडर होती. आपण कुस्तीगीर बनावं ,आखाडा गाजवावा ही तिची मनापासूनची इच्छा होती. आपला भाऊ आणि वडील यांच्या समवेत कुस्ती बघायला जाणं, ही तिची आवड होती. सकाळ-संध्याकाळ व्यायाम करून आणि उत्तम जीवनशैलीचं आचरण करून तिने स्वतःला इतकं बहादूर आणि सक्षम बनवलं होतं की, कोणत्याही संघर्षाला तोंड देण्यास ती सक्षम होती. पुरुषी कपडे घालणं तिला मनापासून आवडत असे. १३९८ मध्ये भारत तुघलक शासकांच्या आधीन होता पण, कोणत्याही राजाने त्याचं आधिपत्य मान्य केलं नव्हतं. नासिरुद्दीन तुघलक हा उत्तर प्रदेशातील दुर्बल शासक! समरकंद येथे राज्य करणाऱ्या तैमूर लंगला भारतात प्रवेश करायचा होता आणि त्याच्यासाठी ही उत्तम संधी होती. नासिरुद्दीन तुघलकला हरवून त्याने दिल्ली काबीज केली. त्याला भारतात इस्लामचा प्रसार करायचा होता. असंख्य हिंदू त्याने मारले होते. दिल्ली त्याच्या दहशतीने भयभीत होती. दिल्लीनंतर अनेक तीर्थस्थळांकडे त्याने मोर्चा वळवला. भारतातील सनातन धर्म नष्ट करून इस्लामचं वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या ध्येयाने तो पछाडला होता.

त्याच्या या भयंकर अत्याचाराच्या वार्ता हरियाणा आणि आजूबाजूच्या जाट क्षेत्रापर्यंत पसरल्या. जाटक्षेत्र प्रमुख देवपाल यांनी या अत्याचाराचा बीमोड करण्यासाठी महापंचायत बोलावली. यात गुर्जर, जाट, राजपूत, ब्राह्मण, वाल्मिकी, अहिर असे विभिन्न समुदाय एकत्र आले. तैमूर विरुद्ध लढायचं, हे एकच ध्येय त्यांच्यासमोर होतं. त्यासाठी गुरीला नीतीचा प्रयोग, ही त्यांची रणनीती होती. त्यांनी सव्वा लाखावार सेना तयार केली. त्यापैकी चाळीस हजार महिला सेनेची कमांडर होती रामप्यारी गुर्जर आणि पुरुष योद्ध्यांचं नेतृत्व महाबली जोगराजसिंह गुर्जर आणि हरविर सिंह गुलिया यांनी केलं. गुरीला नीतीनुसार ते रात्री आक्रमण करीत आणि पहाटेपूर्वी तिथून पलायन करीत. रामप्यारी ने स्वत:ची स्वतंत्र रणनीती तयार केली. त्यानुसार तिने आपल्या सैन्याच्या तीन तुकड्या बनवल्या. एक तुकडी त्यांच्या सैन्याला शस्त्र आणि अन्नधान्य पुरवठा करीत असे. दुसरी तुकडी शत्रूचं जेवण नष्ट करायची तर तिसरी रात्रीच्या बेसावध क्षणी अचानक तैमुरच्या सैन्यावर हल्ला करून त्यांना परास्त करीत असे. या महिला लढवय्यांना तिने शस्त्र-अस्त्र आणि युद्धनीतीचे संपूर्ण ज्ञान दिलं. शिवाय पाचशे घोडेस्वार तैमूर विरुद्ध गुप्तहेरीसाठी तैनात केले.

तैमूरलंग दिल्लीवर दहशत पसरवून मेरठकडे येण्यासाठी निघाला. लूटपाट, कत्तली आणि देवस्थळं उध्वस्त करीत त्याने मेरठमध्ये प्रवेश केला. पण, तो चकित झाला. संपूर्ण गाव रिकामं करण्यात आलं होतं. अत्याचार करायला किंवा लूटपाट करायला गावात काहीच नव्हतं. तो हरिद्वारकडे वळला. पण, रस्त्यात रामप्यारी गुर्जर आणि तिच्या साथीदारांनी तैमूरच्या सैन्याला प्रचंड मनस्ताप दिला. परिणामी, त्यांच्यातला लढण्याचा उत्साहच संपला होता. रात्री छापे पडत असल्यामुळे झोप पूर्ण होत नव्हती. त्यात रामप्यारीची एक तुकडी त्यांच्या अन्नधान्याची नासाडी करीत असे. ना जेवण ना झोप! सैन्य थकलं होतं. रामप्यारी गुर्जर आणि जोगराज सिंह गुर्जर यांनी केलेल्या जबरदस्त आक्रमणाने तैमूरची असंख्य सेना मारली गेली. हरिद्वारमध्ये तर तैमूरच्या सेनेचा त्यांनी प्रचंड पराभव केला. पलायन करणाऱ्या तैमुरच्या छातीवर हरवीर सिंह गुलियाने केलेला भाल्याचा वार इतका जबरदस्त होता की, जखमी तैमूर त्यातून वाचू शकला नाही. जखम चिघळली आणि त्यातच १४०५ मध्ये त्याचा मृत्यू झाला. तैमूरसारख्या अत्यंत क्रूर शासकाला महिलांच्या एका सेनेने आणि त्यांची सेनापती रामप्यारी गुर्जरने दिलेला लढा खरंच अभूतपूर्व असाच होता.

---

# खुलला रंग मेंदीचा...

भारती सावंत/ ९६५३४४५८३५

***मेंदीच्या पानावर, मन अजून झुलते गं...***
***जाईच्या पाकळ्यांस, दव अजून सलते गं...***

गोऱ्या तळहातांवर मेंदी लावायला न आवडणारी यौवना विरळीच! भारतीय संस्कृतीत परंपरांचा खूप सन्मान होतो. वधू-वरांच्या हातावरील मेंदीही याला अपवाद नाही. स्त्रिया-मुली सणासुदीला आपल्या हातांवर मेंदीची सुंदर डिझाईन काढतात. हातावरील मेंदीची नजाकत तरी वाखाणणीयच! सुंदर कलाकुसर केलेले ते मेंदीने रंगलेले हात आपल्या भावी पतीराजाच्या हातात देताना, नववधू किंचित थरथरते. परंतु, त्यातही नवरोबावरील विश्वास आणि प्रेम सामावलेले असते. सुंदर नाजूक फूलवेलींची कलाकुसर करून वधूच्या हातावर रेखाटली जाते. ४-५ तास चालणारा हा कार्यक्रम कंटाळवाणा असला तरी, दुसऱ्या दिवशी त्या हातांचे सौंदर्य पाहण्याजोगे असते. ते पाहताना सारेच थक्क होतात. पण, मेंदीच्या डिझाईन आणि त्या हातांवर स्तुतिसुमने उधळतात.

***लावा गं सयांनो साऱ्या, मेंदी सखीच्या हाताला***
***सखा साजण पाहिल गं, तिच्या तळहाती स्वतःला***

'फुलले रे क्षण माझे फुलले रे'... तळहातावरील मेंदी पाहत प्रत्येक यौवनेच्या मनात हेच तर तरळते. हाताला लावताना ओलसर हिरवी सुंदर नक्षी गुरफटलेली ही मेंदी दुसऱ्या दिवशी तळहाताचे सौंदर्य कित्येक पटींनी वाढवते अन् तरूणी 'खुलविते मेंदी माझा रंग गोरापान' असे गुणगुणत आपला तळहात वारंवार न्याहाळते.

स्त्रियांना सोनेहिऱ्याच्या अलंकाराप्रमाणे मेंदीही खूप आवडते. म्हणूनच सणावाराला, कार्यक्रमाला त्या आपल्या हातावर सुंदर मेंदी रेखाटतात. विवाहप्रसंगी संपूर्ण हात भरून नक्षी असलेली मेंदी नववधूचा सौंदर्यात भरच घालते. म्हणूनच छायाचित्रकार मेंदी काढलेल्या दोन्ही तळव्यांचे छायाचित्रण मुद्दाम करतात. मेंदी तळहातांची नजाकत वाढवतेच पण, तिची लालीही गालावर उमटवते.

मेंदी शरीराला थंडावा देते नि मनाला उभारा! आमच्या लहानपणी असे तयार कोन उपलब्ध नव्हते. प्लास्टिकच्या पाकिटात मिळणारी मेंदी पावडर चहाच्या पाण्यात किंवा कात घालून आणि लिंबू पिळून दिवसभर भिजवली जायची. रात्री जेवून झाल्यावर ती आगपेटीच्या काडीने हलक्यानेच हातावर काढली जायची. डाव्या हाताला मेंदी जरा जास्तच मनापासून लावली जायची. उजवा हात कामाचा म्हणून कधीकधी गोल ठिपके किंवा सारवल्यासारखी ओली मेंदी हातावर पसरली जायची. सकाळी लवकर उठून आपला मेंदीने रंगलेला हात पाहताना कोण आनंद व्हायचा! त्याही आधी मेंदीची पानं तोडून आणून पाट्यावर वाटली जायची. ती नैसर्गिक मेंदी वाटता वाटताच हात लाल होऊन जात. मैत्रिणी, बहिणी एकत्र मेंदीची पाने वाटून हातावर नक्षी काढत. जिची मेंदी जास्त रंगायची ती भाव खाऊन जायची. मग इतर जण तिला 'नवरा खूप प्रेम करणारा मिळणार बरं का' असे म्हणून चिडवत. हाताला मेंदी लागली की, घरातील जाणत्या बायका दोन दिवसात हिचा विवाह होऊन ही आपल्याला सोडून जाणार म्हणून हळव्या होत. वधू मात्र कधी येणार स्वप्नातील राजकुमार आणि मला घेऊन जाणार दूर त्याच्या गावी? अशी तिची स्थिती होई.

***चढली मेंदीची ही लाली, वर वधूच्या हातांवरती***
***गुलाब फुलुनीच गाली, प्रेमीच्या ओढीने झुरती***

लग्नाच्या वेळी वधूपक्षाकडून वधूकडे मेंदी पाठवली जाते. तीच मेंदी वधूच्या हाताला लावली जाते. त्यावेळी नक्षीच्या आत वराचे नावही रेखाटले जाते.आपल्या भावी नवऱ्याला आपले मेंदीने रंगलेले हात दाखवण्यासाठी ती उतावीळ असते. तिचे मन फुलपाखरू होऊन हवेत तरंगते. आपले आरस्पानी सौंदर्य पाहून आपला साजण किती आनंदेल. आपल्यावर कौतुकाचा वर्षाव होईल आणि आपणही त्या विश्वात रमून जाऊ. किती सुंदर असतील ते क्षण!

***मनमयुर हा लागला नाचू, येईल सखा हा राजकुमार***
***जाईल हरखून हे तनमन, घोड्यावरती असे तो स्वार***

---

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

# डोईचा पदर आला खांद्यावरी...

संत साहित्य हा भक्तिमार्गीयांचा शाब्द आविष्कार आहे. भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचा फार मोठा कालखंड भक्तिमार्गाने दुमदुमला. या काळात विविध धर्मपंथ, संप्रदाय होते. एवढेच नाही तर उपास्यदेवताही विविध होत्या आणि उपासना मार्गही! परंतु, त्यांचे प्राणतत्व एकच आणि ते म्हणजे भक्तिभाव!

या परंपरेत दक्षिणोत्तर किंवा पूर्वपश्चिम भारताचा विचार केला तरी, महाराष्ट?ात स्थापित असलेला वारकरी संप्रदाय हा खूप महत्त्वाचा ठरतो. इथल्या संतांची भूमिकाही महत्त्वाची आहे. सर्व भक्तिसंप्रदायांच्या या पसाऱ्यात महाराष्ट?ाचं स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट? हा भारताच्या मध्यावर आहे. भाषिकदृष्ट्या आर्यभाषिक प्रदेशांच्या सीमा आणि द्रविड भाषिक प्रदेशांच्या सीमा असलेले शेजारी चारही बाजूंनी आहेत. त्यामुळे उत्तर-दक्षिण, आर्य-द्रविड सर्वांना सामावून घेण्याचं सांस्कृतिक कार्य महाराष्ट? प्राचीन काळापासून करीत आला आहे. व्यापक अर्थाने महाराष्ट? हे भारतीय संस्कृतीचे संगमतीर्थ आहे.

स्थूलमानाने इसवीसनाचे बारावे ते सतरावे शतक हा ५ ते ६ शतकांचा काळ भक्तिमार्गाचा कालखंड मानता येईल. स्वातंत्र्योत्तर काळात काही साहित्यप्रकारांनी जो 'आवाज' दिला, तेच काम भक्तीचळवळींनी मध्ययुगातच केले. समाजातील प्रस्थापितांनी धर्मक्षेत्रात जे मापदंड निर्माण केले होते ते भक्तीमार्ग यांनी झुगारून दिले. कृत्रिमता, पाखंड उघडे पाडले. न्यूनगंडातून उपेक्षितांची मुक्ती केली, त्यांचा आत्मविश्वास जागवत आत्मप्रतिष्ठेचा मार्ग प्रशस्त केला.

वरील हेतू सिद्धीस नेण्यासाठी संत साहित्य निर्माण करावे लागले नाही तर, ते निर्माण झाले. अखिल भारतात काश्मिर ते कन्याकुमारी आणि बंगाल ते आसाम इथपर्यंत अनेक संत झाले. त्यातही स्त्रीसंतांनीसुद्धा साहित्यात खूपच मोलाची भर घातली. विस्तारभयास्तव इथे सगळी नावे घेता येणार नाहीत. महाराष्ट?ातील वारकरी संप्रदाय तर जात, धर्म, स्त्री, पुरुष हा भेद न करता,'आम्ही आनंदे नाचू गाऊ' म्हणणाऱ्या संतांमधे अनेक स्त्री संत झाल्या.

मुक्ताई! ज्या कुळकर्णी भावंडांना संन्याशाची मुले म्हणून यज्ञोपवित संस्कार करण्यास नकार दिला. निवृत्तीनाथ त्यावेळी दहा वर्षांचे तर मुक्ताई फक्त चार वर्षांची! दादाच तिचे पालक आणि गुरू झाले. त्यात मुक्ताई, तिचा विवाह हे तर दूरदूरपर्यंत शक्य नव्हतं. पण, त्यामुळे मुक्ताईचे साहित्य, तिचे अभंग कम अस्सल ठरत नाहीत. त्यांची काव्यरचना ही अतिशय मौलिक आहे. त्यातही 'ज्ञानदेव तुकाराम' या मध्यमपदलोपी समासात जी वारकरी संत मंडळी आहे, त्या स्त्री संतांमधे संत मुक्ताई, संत जनाबाईंचे नाव महत्वाचे आहे. निर्मळा, नागी, कान्होपात्रा, बहिणाबाई, सोयराबाई, लिंबाई, विठाबाई अशा आणखी अनेक स्त्रीसंत आहेत.

मुक्ताबाईंना अतिशय अल्पायुष्य मिळालं. अतिशय विचित्र आयुष्य या चारही भावंडांच्या वाट्याला आलं. त्यात मुक्ताई सर्वात धाकटी असूनही सर्वांची आई झाली. समाजात मिळणारी वागणूक बघून, ज्ञानेश्वर महाराज अतिशय दुःखी झाले आणि झोपडीची ताटी (दरवाजा) बंद करून घेतला. सर्व भावंडांनी त्यांना बाहेर येण्याची विनंती केली. तर, मुक्ताईने आपल्या अभंगांमधून त्यांचे मन वळवले. तेच अभंग पुढे ताटीचे अभंग म्हणून प्रसिद्ध झाले.

***चिंता क्रोध मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥***
***विश्व रागे झाले वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ॥***
***शब्दशस्त्रे व्हावे क्लेष । संती मानावा उपदेश ॥***
***विश्वपट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥***
***संत तोची जाणा जगी । दया क्षमा ज्याचे अंगी ॥***
***लोभ अहंता न ये मना । जगी विरक्त तोची जाणा ॥***
***मिथ्या कल्पना मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥***

चिमुकल्या बहिणीने केलेली ही विनवणी माऊलींना टाळता आली नाही आणि ते बाहेर आले. संत कसा असावा? याचं अतिशय सुंदर विवेचन यात आहे. या शिवायही मुक्ताईच्या अनेक अभंग रचना प्रसिद्ध आहेत. तशीच कान्होपात्रा! ती कोण होती?काय? यावर विवेचन नको. ती फक्त विठ्ठलभक्त होती, स्त्रीसंत होती.

***नको देवराया अंत अता पाहू***
***प्राण हा सर्वथा जाऊ पाहे ॥***
***हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले***
***मजलागी जाहले तैसे देवा ॥***
***मोकलोनी आस जाहले उदास***
***घेई कान्होपात्रेस हृदयात ॥***

हा तिचा अभंग सर्वश्रुत आहे. संत बहिणाबाई! सांसारिक सुख तिला फारसं लाभलं नाही. जरठ नवयाशी संसार करावा लागला. त्यांचाही अभंग बघा.

***विरक्तीचे मूळ । प्रपंचाचा त्याग ॥***
***पाहताचि एक । गृह शैल ॥***

स्त्री ही मोक्षमार्गातली धोंड, ही आजवरची धारणा ! पण, घर हा परमार्थ मार्गातला स्त्रीच्या दृष्टीने फार मोठा टप्पा असल्याचे ती बोलून दाखवते. अशा अनेक स्त्रीसंत आहेत. त्यांचं साहित्यही विपुल आहे. मात्र, त्यात संत जनाबाई यांचं स्थान वेगळं आणि मोठं आहे.

संत जनाबाईंच्या अभंगात विठ्ठलाचं वर्णन आहेच. पण, त्यासोबतच स्त्रीचं वागणं, जगणं, तिची अगतिकता याचं खूप छान वर्णन आहे. त्यात स्त्रीच्या मुक्तीसाठी असलेल्या रचना तर आपल्याला अंतर्मुख करून जातात.'डोईचा पदर आला खांद्यावरी' हा अभंग हे त्यावरचं उत्तम उदाहरण आहे. आपल्या विपुल रचनेत 'नामयाची दासी जनी' ही नाममुद्रा धारण करणारी जनाबाई सर्व वारकरी स्त्री संतांमध्ये अतिशय लोकप्रिय आहे. ती महाराष्ट?ाच्या लोकजीवनाचा विशेषत: स्त्रीजीवनाचा एक भाग कायमचा बळकावून बसली आहे. विठ्ठलाने सगुणरूपाने तिच्याबरोबर दळणकांडण, धुणीभांडी, झाडलोट, शेणगोठा ही ग्रामीण कष्टकरी स्त्रीची नित्य कामे करीत राहणे, तिच्या फाटक्या गोधडीत झोपणे, तिच्यासोबत ताककण्या खाणे, तिची वेणीफणी करणे या प्रकारच्या वर्णनाच्या शेकडो ओव्या आजही ग्रामीण स्त्रीच्या मुखी गुंजत आहेत. महत्वाचे म्हणजे ही वर्णने जनाबाईंच्या अभंगांतूनही आली आहेत.

***तुळशीचे वनी, जनी उकलिते वेणी***
***हाती घेऊनिया लोणी, सेवा करी चक्रपाणी***

***इठ्ठलाच्या गं देवळात, मी होईन पारवा***
***देवाच्या नावाचा मी गं वेचीन सरवा***

अशा ओव्यांबरोबर जनाबाईच्या निमित्ताने, उपेक्षित श्रमकरी स्त्री आपल्या मानसविश्वात विठ्ठलाबरोबरच एक वेगळा प्रपंच थाटून, त्यात रंगून बसली असावी असे वाटते. अनेक स्त्रियांच्या मनात घर करून राहणारी जनाई, वास्तवात मात्र बेघर होती. तिचं वास्तव जीवन अत्यंत खडतर आणि उपेक्षित होतं.

दामाशेटकडे आल्यानंतर लगेचच तिचे आईबाप गेले. ही घटनाही जनाईच्या अभंगातून येते.

***माय मेली बाप मेला, आता सांभाळी विठ्ठला***
***मी तुझे गा लेकरू, नको मजसी अव्हेरू***

जनाईला संत नामदेव महाराजांबद्दल असलेला आदर आणि भक्तिभाव तिने परोपरीने वर्णन केलाच आहे. तेवढीच ज्ञानदेवांविषयी असलेली ओढ तिने व्यक्त केली आहे. ते तिच्या अभंगांमधून जाणवते. दासी शब्दाविषयी बोलायचे तर जनी किंवा नागी (नामदेवांची पुतणी) तिचाही उल्लेख दासी असाच आहे. दासीचा अर्थ शिष्या असा घ्यायला हरकत नाही कारण, खुद्द ज्ञानेश्वरांनी,'म्हणे निवृत्तीदासु' म्हणत आपले शिष्यत्व विनम्रभावे अधोरेखित केलेले आहे.

विठ्ठलाच्या लेकुरवाळेपणाचे खूप सुरेख वर्णन जनाबाई करतात.

***विठु माझा लेकुरवाळा, संगे गोपाळांचा मेळा ॥***
***निवृत्ती हा खांद्यावरी, चोखा जीवा बरोबरी ॥***
***बंका कडियेवरी, नामा करांगुली ही घरी ॥***



***जनी म्हणे गोपाळा, करी भक्तांचा सोहळा ॥***

जनाई संत नामदेवांच्या घरी त्यांची शिष्या म्हणून राहत असे.

'दळीता कांडिता...तुज गाईन अनंता' म्हणणारी जनाई आपल्याला कळते. जनाईला तिच्या प्रत्येक कार्यात विठ्ठलाने मदत केली. तोही अभंग फारच सुरेख आहे.

*माळ पदक विठ्ठल, विसरला भक्ताघरी*
*झाली पदकाची चोरी, आला आळ जनीवरी'*

संतसहवासाने तिला जो थोडाफार आधार मिळाला त्यात ती धन्यता मानते.

स्त्रीजन्म म्हणवूनी न व्हावे उदास, साधुसंती ऐसे मज केले

'विदुर सात्विक माझिये कुळीचा' असा ती उल्लेख करतेच. तसेच चोखामेळा, रोहिदास यांच्याविषयी तिला अभिमान वाटतो. संत आणि देव ती एकरूप मानते. जनाईचे देवाशी एवढे एकरूपत्व आहे की,

***'देव खाते, देव पिते,***
***देवावरी मी निजते,***

देवाविण नाही रिते॥ याचा साक्षात अनुभव ती घेते. जनाबाईला संतांनी आधार दिला असला तरी, जनसामान्यांनी तिच्या चारित्र्यावर आक्षेप घेतले असणारच. म्हणून अखेर निर्धाराने तिला सांगावेसे वाटते,

किंवा

***जनी बैसली न्हायाला, पाणी नाही विसणाला***
***हाती घेऊनी घागरी, देव निघाले तातडी***

ही लोकपरंपरेतील जात्यावरची एक ओवी! इथे आशय आणि रचनेत सारखेपणा आढळतो. गोदाकाठच्या गंगाखेड येथील दमा आणि करूंड या शूद्र भगवतभक्त दांपत्यांची जनी ही नवसाची लेक! पांडुरंगाच्या दृष्टांतानुसार ती पाच वर्षांची होताच तिला दामा शिंप्याच्या स्वाधीन केले. पुढे त्यांचा लेक नामा म्हणजेच संत नामदेव महाराज जे मोठे विठ्ठल भक्त झाले. त्याची दासी म्हणवून घेत जनाई जगली. जनाईचा जन्ममृत्यू काळ याबद्दल नेमके संदर्भ उपलब्ध नाहीत. पण, नामदेवांच्या बारशाला प्रत्यक्ष पांडुरंग रुक्मिणी, बाळंतविडा घेऊन आल्याचे ती वर्णन करते. म्हणजे, नामदेव महाराजांपेक्षा ती खचितच ५-७ वर्षांनी तरी मोठी असावी. पुढे इ.स.१३५० मध्ये संत नामदेव महाराजांसोबतच ती पायरीच्या चिऱ्यात अंतर्धान पावली, अशी लोकश्रद्धा आहे.'पंढरी पंढरी, विठुरायाची नगरी' म्हणून साद घालणाऱ्या ग्रामीण स्त्रीला पंढरपूर, विठ्ठल, रखुमाई, संतजन हा सर्व गोतावळा आपल्या जीवीचा माहेरचा जिव्हाळा वाटतो.

***रुक्मिणी कालविते, निरशा दुधामधी केळं***
***देवाला आवडतं, जनाचं ताक शिळं***

अशा ओवीतून विठ्ठल आणि जनाबाई यांच्या नात्याचे सूचन होते.

***आषाढीला मी नाही गेले, कर्तिकीला गं जाईन***
***देव पंढरीचा गं विठू, विटे उभा मी पाहीन***
***गोपाळपूरा जाया, जनाईला गं झालं ऊन***
***देवा या विठ्ठलानं, यानं लाविलं गं चिंचबन***

किंवा

***डोईचा पदर आला खांद्यावरी,***
***भरल्या बाजारी जाईन मी***
***हाती घेईन टाळ खांद्यावर विना,***
***आता मज मना कोण करी***
***पंढरीच्या वाटे मांडियले पाल,***
***मनगटावर तेल घाला तुम्ही***
***जनी म्हणे देवा मी झाले वेसवा,***
***रिघाले केशवा घर तुझे***

असं म्हणणारी जनाबाई ही मीराबाईचीच सखी वाटते. जननिंदेच्या भयापासून स्वतःला मुक्त करणारी जनाई! देहाची सुरक्षितता आणि त्यासाठी पाळावी लागणारी जनमर्यादा तिने कस्पटासमान मानली. ती जीवन्मुक्तच होती.

स्त्री ही विवाहित असली काय, अविवाहित किंवा विधवा असली काय? देहसंबद्ध असे तिचे चारित्र्य, लोकनिर्बंध, लोकसमज आणि लोकेच्छा हा एकूणच स्त्री जीवनातील एक मोठा अडसर होता, आहे आणि राहणार आहे. याच्या आधारे समाज स्त्रीला जीवनातून उठवू शकतो. हे लोकापवादाचे दडपण स्त्रीमनावर सतत टांगते असते. ते एक शस्त्र असते. सीता, द्रौपदीसह अनेक स्त्रिया याच मापदंडाने दंडिल्या गेल्यात. स्त्री संतांचेही तेच झाले. मुख्य म्हणजे त्यांचे संतत्व सिद्ध होईपर्यंतच्या वाटचालीचे काय? नंतर, याच समाजाने त्यांचा उदोउदो केला. म्हणूनच जनाई म्हणते, 'स्त्री जन्म म्हणवूनी न व्हावे उदास!'

अतिशय परखड पण मौलिक काव्यरचना करणारी संत जनाबाई म्हणूनच मला आवडते. भारतीय संत साहित्यात स्त्री मुक्तीच्या साहित्याची भर घालणारी ही संत स्त्री, तिचे काव्य, अभंग आणि विचारधन आजच्या काळालाही लागू आहेत.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## आधुनिक शेती व यांत्रिकीकरण जोपासणे गरजेचे : कांबळे

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तिसरे राज्यस्तरीय कृषिप्रदर्शन ळलातूर येथील मरवाडी राजस्थान प्रांगण येथे सुरू असून या ठिकाणी दररोज शेतकऱ्यांना विविध विषयांवर तज्ञांचे मार्गदर्शन होत आहे. त्याअंतर्गत आज दुसऱ्या दिवशी नीतीन कांबळे, तालुका कृषी अधिकारी रेणापूर यांनी शेतकऱ्यांनी पारंपारिक



शेतीपद्धती सोडून आधुनिक शेती व नवनवीन तंत्रज्ञान वापरणे गरजेचे असल्याचे प्रदीपदन केले. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सरचिटणीस व शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे, जिल्हासंसाधन व्यक्ती धनंजय पवार, जिल्हाध्यक्ष डॉ. नरसिंह भिकाने, शेतीतंत्रज्ञान तज्ञ संदीप हाराळे, मनोज अभंगे, भागवत कांदे, रोजगार स्वयंरोजगार राज्य सचिव सचिन सिरसाट, मनवीसे जिल्हाध्यक्ष किरण चौहान, प्रीती भगत, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष पांडुरंग कदम, बाळासाहेब मुंडे, रणवीर उमाटे आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### हणमंतराव पाटील यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

**दैठणा, दि.९ फेब्रुवारी -**

दैठणा (ता. शिरूर अनंतपाळ) येथील रहिवासी हणमंतराव विश्वनाथराव पाटील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हे मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेतून ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याबद्दल पाटील परिवारातर्फे साई भवन मंगल कार्यालय शिरूर अनंतपाळ येथे त्यांचा गौरात्मक सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास अण्णाराव पाटील, गणेश पाटील, ॲड. केशव पाटील, विठ्ठलराव पाटील, शीला पाटील, मंगलबाई पाटील व सत्कारमूर्ती हणमंतराव पाटील, पुष्पा पाटील यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. पाटील परिवारातील ॲड. विनयकुमार नकाते, वर्षा पाटील, पंकज पाटील, वीना पाटील, श्रीनिवास पाटील यांनी हणमंतराव पाटील यांच्या कार्याचा आपल्या मनोगतातून आढावा घेऊन भावना व्यक्त केल्या. सूत्रसंचालन देवदत्त मुंढे यांनी केले. तर आभार अमोल पाटील यांनी मानले.



### शारदा स्कूलमध्ये रमाई आंबेडकर जयंती साजरी

**लातूर, दि.९ फेब्रुवारी -**

रॉयल एज्युकेशन सोसायटी संचलित शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम.आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी माता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी माता रमाई यांच्या प्रतिमचे पूजन करण्यात आले. स्कूलचे प्राचार्य लक्ष्मण पुरी व माध्यमिक विभागाचे शिक्षक महेश सोनवणे यांनी रमाई आंबेडकर यांच्या जीवन कार्यालया उजाळा दिला. पूर्व प्राथमिक विभागाच्या शिक्षिका वर्षा कांबळे यांनी रमाई यांच्या जीवनाविषयी गीत सादर केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख दर्शना बोराडे यांनी तर प्रास्ताविक लिंबराज गायकवाड यांनी केले. आभार रोहिणी कदम यांनी मानले. यावेळी मुख्य समन्वयक अनघा पाटील, मानसी पाटील, अश्विनी पवार, रेणुका समुद्रे, समन्वयक रोहित जाधव आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### संगमेश्वर विद्यामंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात

**लातूर, दि.९ फेब्रुवारी -**

शहरापासून जवळच असलेल्या आर्वीच्या सोमवंशीनगरातील संगमेश्वर युवक मंडळ संचलित संगमेश्वर प्राथमिक विद्यामंदिरचे 'जल्लोष-२०२५' वार्षिक स्नेहसंमेलन बुधवारी उत्साहात पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अधिकारी एन. एम. जाधव उपस्थित होते. अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी.एन. केंद्रे होते. मंचावर राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेचे सहसचिव प्राचार्य राजेंद्र जायेभाये व संस्थेच्या कोषाध्यक्ष मुख्याध्यापिका कविता केंद्रे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक मुख्याध्यापक ए.बी. पवार यांनी तर सूत्रसंचालन ए.व्ही. माने यांनी केले. यशस्वितेसाठी जी.बी. मोरे, जे.जी. कावळे, डी.पी. दिवटे, एन.आर. मुंडे, आर.व्ही. डुकरे, डी.एस. भदभदे आदींनी परिश्रम घेतले.

# पुण्यातील विश्व मराठी संमेलनात लातूरच्या बालकलाकारांचा बोलबाला

## बालरंगभूमी परिषद लातूर शाखेच्या माध्यमातून ज्ञानप्रकाश संगीत विद्यालयाचा उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र शासनाच्यावतीने ३ रे विश्व मराठी संमेलन पुणे येथे आयोजित करण्यात आले होते. यात जगभरातून मराठी माणसे सहभागी झाली होती. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, खासदार, आमदारांसह अनेक विशेष निमंत्रित मान्यवर साहित्यिक, कलाकार, युट्युबर्स व भाषाप्रेमी विविध सत्रामध्ये मंचावर सहभागी होते.

तीन दिवस चाललेल्या या संमेलनात एक सत्र बालरंगभूमी परिषदेसाठी देण्यात आले होते. त्यात वरील दिग्गजांच्या रांगेत लातूरचे २५ बाल तबलावादक सहभागी झाले होते.

असा सामूहिक तबला वादनाचा अनोखा अनुभव पुणेकरांनी पहिल्यांदाच घेतला. ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्प द्वारा संचलित, ज्ञानप्रकाश संगीत विद्यालयाचा हा उपक्रम होता. मयूर येणगे यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या त्यांच्या शिष्यानी पुण्यात विश्व



मराठी संमेलनात लातूरचा झेंडा दिमाखात रोवला आहे.

लातूरच्या या कलाकारांना बालरंगभूमी परिषदेच्या महाराष्ट्राच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के व उपाध्यक्ष ॲड. शैलेश गोजमगुंडे यांच्या प्रयत्नातून ही संधी मिळाली. आणि मिळालेल्या संधीचं मुलांनी सोनं केले. या प्रसंगी सिने अभिनेते प्रविण तरडे, भाषा विभागाचे संचालक डॉ. शंकांत देवरे यांनी तबला वादनानंतर स्वतः हून मुलांशी संवाद साधला. त्यांचं कौतुक केले. या उपक्रमासाठी येणगे यांना सागर कोळी, अतुल जाधव, जीवन पांचाळ, अमोल शिंदे यांनी सहकार्य केले.

या उपक्रमाचे सर्वदूर कौतुक होत असून ज्ञानप्रकाशचे सतीश नरहरे, मुख्याध्यापिका सविता नरहरे, अशोक गुरधाळे, वनिता गोजमगुंडे, बालरंगभूमी परिषद लातूर शाखेच्या अध्यक्षा सुमती सोमवंशी, मयूर राजापूरे, प्रा. नवलाजी जाधव, हिरा वेदपाठक, सुवर्णा बुरांडे, रवी आघाव, श्री रणजित आचार्य, ॲड. बालाजी म्हेत्रे यांनी अभिनंदन केले आहे.

## स्वयंम शिक्षण प्रयोग संस्थेमार्फत महिलांची सेंद्रिय शेतीस भेट



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.९ फेब्रुवारी -**

स्वयंम शिक्षण प्रयोग संस्था लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने व एक्सीस बँक फाऊंडेशनच्या अंतर्गत तालुक्यातील शेती संलग्न महीलांना व्यावसायिक बनवण्यासाठी महीलांना घडविण्यासाठी महिला स्वावलंबी बनवण्यासाठी सहा दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येत आहेत.


प्रशिक्षणाच्या सातव्या दिवशी रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी देवणी तालुक्यातील जवळगा, धनगरवाडी, बोळेगाव आदी गावातील प्रशिक्षणार्थी महीलांना सेंद्रिय शेती करणारे तालुक्यातील महादेववाडी येथील शेतकरी ओमकार मसकल्ले यांच्या शेतीस भेट देण्यात आली. या उपस्थित महीलांना मार्गदर्शन कृषी भुषण पुरस्कार प्राप्त ओंमकार मसकल्ले यांनी मत्स्य व्यवसाय, बायोगॅस, गांडुळ खत, जिवामृत, अग्नी अस्त्र, ब्रम्हास्त्र, अंडासंजिवन आदींची सखोल माहीती दिली.

यावेळी अक्रम शेख, अहेमद पठाण, महेंद्र काळे, अजमत पठाण, विष्णू चामले, ज्योत्सना पोलकर व प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होते.

## संस्काराचा पहिला वर्ग आई : डॉ. रामकृष्ण बदने

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.९ फेब्रुवारी -**

आई वात्सल्याचा सागर आहे. आई वडिलांच्या सेवेत खऱ्या अर्थाने स्वर्ग आहे.



सामान्य माणसाबरोबरचं संत व महापुरुषांच्या जडणघडणीत आईचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. शाळेतून आपण शिक्षण घेत असलो, तरी लहानपणी शिस्त लावण्याचे काम आई वडील करीत असतात. एका अर्थाने संस्काराचा पहिला वर्ग आईचं आहे, हे विसरून चालणार नाही असे विचार प्रमुख वक्ते डॉ. रामकृष्ण बदने यांनी व्यक्त केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने बामणी ता उदगीर येथे बहि:शाल व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच राजकुमार बिरादार तर मंचावर ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर येथील हिंदी विभागातील प्रा.डॉ. रामकृष्ण बदने, प्रमुख डॉ. दत्ताहरी होनराव उपस्थित होते. समाजात मूल्य विचार रूजावेत. महामानवांच्या विचाराचा जागर व्हावा, या उद्देशाने सदरील व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रास्ताविकात डॉ. दत्ताहरी होनराव यांनी सांगितले. प्रमुख मार्गदर्शकांचा परिचय प्रा. शिवकुमार उस्तुरर्गे यांनी करून दिला. पुढे बोलताना डॉ. बदने म्हणाले, आईसमोर नतमस्तक झाल्यास कधीच अपयश येणार नाही. उपनिषदापासून तर अलीकडच्या एकविसाव्या शतकातील सगळ्यात साहित्यिकांनी आईविषयी भरभरून लिहिलेले आहे, असे सांगत त्यांनी संत ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा तसेच प्रासंगिकता लक्षात घेऊन अनेक उदाहरणे देत श्रोत्यांना अंतर्मुख केले.

यावेळी डॉ. मनोहर भंडारे, डॉ. विठ्ठल गोरे, डॉ. अमित कवठाळे, ग्रंथपाल प्रा. अजित रंगदळ, गावातील ग्रामपंचायत सदस्य नागरिक व महिला उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वीरभद्र बिरादर तर आभार डॉ.म.ई. तंगावार यांनी मानले.

### युवा स्वयंसेवक पदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर, दि.९ फेब्रुवारी -** केंद्र शासन व राज्य शासन संयुक्त विद्यमाने राज्यात ग्रीस्टॅक संकल्पनेच्या अंतर्गत डिजिटल क्रॉप सर्वे करण्यात येणार आहे. या कार्यासाठी नेहरू युवा केंद्र मार्फत कमीत कमी १५ दिवस व जास्तीत जास्त ३ महिने कालावाधीसाठी प्रति महिना रुपये ५ हजार मानधन तत्वावर राष्ट्रीय युवा स्वयंसेवकाची नियुक्ती करण्यात येणार आहे.

## पानगावात विविध स्टॉलच्या माध्यमातून बालविकासाचे धडे

### बाल विकासासाठी आकर्षण ठरले २२ स्टॉल

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.९ फेब्रुवारी -**

प्रत्येक बालकांची जन्मतः वाढ व विकासाची क्षमता ही आगळीवेगळी आसते म्हणून बालकांच्या सर्वांगीण विकासात पालकांचा सहभाग अत्यंत महत्वाचा असतो म्हणून पानगाव येथे एकात्मिक बाल विकास सेवा योजना रेणापूर वतीने दि.८ फेब्रुवारी रोजी एक आगळा वेगळा पालक मेळावा घेऊन पालकांना विविध सस्टॉल मधुन बालकांच्या विकासाचे धडे देण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने उप सरपंच प्रेमाला वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी



प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सदस्या रंजना गालफाडे, अंगणवाडी पर्यवक्षिका उज्वला देशपांडे, ग्राम बाल संरक्षण समितीचे बाबा हलकुडे, कलापंढरी संस्थेचे मधुकर गालफाडे, ए.बी. सुर्यवंशी, एस.आर. बनसोडे, के.डी. नागीमे आदींची उपस्थिती होती.

आयोजीत पालक मेळाव्यात पालकांना बालकांच्या विकासाच्या दृष्टीकोणातून काय आणि कोणत्या साहीत्याची गरज महत्वाचे आहे. कोणती साधने बालकांच्या विकासाला पोषक ठरतात, कोणती क्र ती बालकांच्या विकासाला चालना देते आदी विषयाचे एकूण २२ स्टॉलची मांडणी करण्यात आली होती. आणि या स्टॉलला माता पालकांनी भेट देतात प्रत्येक अंगणवाडी कार्यकर्ती प्रत्येक स्टॉल बालकांच्या विकासाला कसे पोषक आहेत. यातून बालकांचा कसा विकास होते. या विषयी सविस्तर माहिती सांगितली जात होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुनिता आरडले यांनी केले. तर आभार ग्रामबाल संरक्षण समितीच्या सचिव कालींदा आचार्य यांनी मानले.

## उदगीर येथे विश्व मराठी साहित्य संमेलन घेणार : संजय बनसोडे



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.९ फेब्रुवारी -**

आपले उदगीर हे शिक्षणाच्याभुमी बरोबरच आता साहित्य व सांस्कृतिक नगरी म्हणुन संबंध महाराष्ट्रात ओळख निर्माण झाली आहे. गेल्या ५ वर्षात विविध साहित्य संमेलने ही उदगीरला झाली. यामध्ये या नगरीमध्ये मराठवाडा साहित्य संमेलन, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यशस्वीपणे संपन्न झाले. भविष्यामध्ये उदगीर येथे विश्व मराठी साहित्य संमेलन घेणार असल्याची घोषणा माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी केली आहे.

यावेळी संमेलन अध्यक्ष इंद्रजीत भालेराव म्हणाले की, मराठवाड्यात माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख यांच्यानंतर सर्वस्तराचा विकास करण्यामध्ये कल्पक बुद्धिमत्तेचा राजकीय नेता म्हणून आमदार संजय बनसोडे यांचे कार्य दिसून येत आहे. बौद्धिक विकासाबरोबरच शैक्षणिक व साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्राला बळ देण्याचे त्यांचे काम हे जाणीवेच्या पुढचे असुन नेहमी साहित्याला पाठबळ देणारे आ. बनसोडे आहेत.

### संस्कृती मंडळ व रंगकर्मीच्या साहित्य संमेलनाचे उद्घाटन संपन्न

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी महाविद्यालयात आयोजित तिसरे लोकसंस्कृती साहित्य संमेलनाच्या उद्घाटन समारंभात ते उद्घाटक म्हणून बोलत होते. प्रसिद्ध साहित्यिक प्रा. इंद्रजीत भालेराव अध्यक्षस्थानी होते. यावेळी सिने अभिनेत्री अदिती सारंगधर, उर्मिला डांगे, अभिनेते चंद्रशेखर सांडवे, स्वागताध्यक्ष बस्वराज पाटील नागराळकर, कार्यवाह रामचंद्र तिरुके, साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य मार्तंड कुलकर्णी, भारत सातपुते, विलास सिंदगीकर, सतीश उस्तुरे, प्राचार्य रामकिशन मांजरे, रमेश अंबरखाने, बाळासाहेब पाटोदे, अनिल मदाळे, जॉनीमीया सय्यद, फैयाज शेख, ॲड. वर्षा कांबळे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

वृंदावनातील तुलसीला जल अर्पण करून या साहित्य संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. या साहित्य संमेलनासाठी सकाळी आठ वाजता अण्णाभाऊ साठे चौकातून भव्य ग्रंथ दिंडी काढण्यात आली. त्यानंतर भव्य चित्र प्रदर्शन, पुस्तक विक्रीच्या स्टॉलचे उद्घाटन,फँशन डिझाईन कलाकृतीच्या स्टॉलचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या संमेलनाच्या यशस्वितेसाठी रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठाणचे अध्यक्ष प्रा.बिभीषण मद्देवाड, सचिव प्रा.ज्योती मद्देवाड, उपाध्यक्ष सिध्दार्थ सुर्यवंशी, रामदास केदार, रसुल पठाण, लक्ष्मण बेंबडे, महादेव खळुरे, मारोती भोसले, बाबासाहेब मादळे, सचिन शिवशेट्टे, संदीप निडवदे, नागनाथ गुट्टे, हणमंत केंद्रे, आकाश कवडेकर, ज्ञानेश्वर बडगे, चंद्रदीप नादरगे, जहाँगीर पटेल, ॲड. महेश मळगे, निवृत्ती जवळे, प्रल्हाद येवरीकर, अंजली स्वामी, निता मोरे, विवेक होळसंबरे, विक्रम हलकीकर आदींनी परिश्रम घेतले.

यावेळी चित्रप्रदर्शन, हस्तकला प्रदर्शन, ग्रंथाचे विविध स्टॉल उभारण्यात आले होते.

# लातूर जिल्ह्यातील १५०० विद्यार्थ्यांचा 'महाआकाश दर्शन'मध्ये सहभाग

## अबब...चंद्रावर माझे वजन एवढे कमी! विद्यार्थ्यांना वाटले कुतूहल




**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.९ फेब्रुवारी -**

आकाशामध्ये एकूण पाच ग्रह एका रेषेत येत आहेत, ही ऐतिहासिक खगोलीय घटना विद्यार्थ्यांना पाहता यावी, यासाठी जिल्हा परिषदेचा प्राथमिक शिक्षण विभाग आणि लातूर स्टीम एज्यूकेशन सेंटरच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी राजस्थान विद्यालाच्या प्रांगणामध्ये 'महाआकाश दर्शन २०२५' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आकाशातील विविध ग्रह, तारे यांची माहिती घेताना आपल्या मनात डोकावलेले प्रश्न विचारून त्याबाबत माहिती जाणून घेतली. एका विद्यार्थ्याने चंद्राविषयी माहिती जाणून घेतला 'अबब...चंद्रावर माझे वजन एवढे कमी!' असे म्हणत त्याला वाटलेल्या कुतूहलातून चंद्राविषयी अधिक माहिती जाणून घेतली. शालेय विद्यार्थ्यांसाठी खगोलशास्त्र आणि आकाश निरीक्षणाच्या मूलभूत संकल्पनांची ओळख व्हावी, या हेतूने 'महाआकाश दर्शन २०२५' उपक्रमांतर्गत आकाश निरीक्षण आणि खगोलशास्त्रीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. विश्वाची निर्मिती कशी झाली, विश्वात कोणकोणते घटक आहेत, विश्वातील आपले स्थान काय, पृथ्वीबाहेर जीवसृष्टी असण्याची शक्यता किती आहे, याबाबत स्लाईड शोच्या माध्यमातून माहिती कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात देण्यात आली. त्यानंतर लेझरच्या सहाय्याने तारकासमूहांची ओळख आणि टेलिस्कोपच्या सहाय्याने विविध ग्रह आणि चंद्र दाखवण्यात आले. अत्याधुनिक प्लॅनेटोरियम डोम (तारांगण) सोबत, विविध ग्रहावरील मानवीय वजन पाहणे यासह वैज्ञानिकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

या उपक्रमात जिल्हाभरातून सुमारे १५०० विद्यार्थ्यांसह पाच ते सात हजार नागरिकांनी 'महाआकाश दर्शन २०२५' उपक्रमाला भेट दिली. प्रारंभी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. राजस्थान विद्यालय शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत कर्वा, प्रा. शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, मा. शिक्षणाधिकारी नागेश मापारी, स्टीम एज्युकेशन सेंटरचे अध्यक्ष ओमप्रकाश झुरूळे, खगोलशास्त्रज्ञ मयुरेश प्रभूणे, राम स्वामी, अमोल चव्हाण, प्रमोद भोयेरेकर, विजय सहदेव, स्टीम एज्यूकेशन सेंटरच्या प्राचार्य उमा माने, रूपा सिरसेकर, राजस्थान मुख्याधापक खरोसेकर यावेळी उपस्थित होते. महाकुंभ पर्वामध्ये पाच ग्रह एकाच रेषेत येण्याचा ऐतिहासिक क्षण जिल्हा परिषद शाळेच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी आयोजित या उपक्रमाचे जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी सागर यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अंगद महानुरे, सुनिल राजुरे, दत्तात्रय माळकर, चंद्रकांत ठाकरे, स्टीम एज्यूकेश सेंटरचे कर्मचारी, माउंट कार्मेल इंटरनॅशनल स्कूलचे कर्मचारी, मारवाडी राजस्थान विद्यालयाचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.